रविवार, 21 ऑगस्ट 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी · दैनिक
वर्ष - 02 · अंक - 26
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 21 AUGUST 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-26 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-14 ● PRICE-5

# त्यांनी मुंबईला वाऱ्यावर सोडले

## बाळासाहेबांनी पाहिलेले मुंबईचे स्वप्न आता पूर्ण करायचे : फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : जे स्वप्न मुंबईकरांच्या मनातील मुंबईकरीता हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी बघितले होते ते स्वप्न पूर्ण करायचे ही जबाबदारी आपली आहे. कारण त्यांचे नाव सांगून जे निवडून आले त्यांनी त्यांचे स्वप्न धुळीस मिळवले. ते स्वप्न पूर्ण करू शकले नाहीत, ते इतके आत्ममग्न होते, इतके आत्मकेंद्रीत होते की, स्वतःच्या पलीकडे ते पाहू शकले नाहीत. या मुंबईकराकडे त्यांनी कधीही बघितले नाही. आता मुंबईकरांसाठी काम करणाऱ्यांना आपण निवडून आणायचे आहे आणि मुंबईकरांनी जे स्वप्न पाहिले आहे, जे स्वप्न वंदनीय बाळासाहेब ठाकरेंनी पाहिले आहे, ते पूर्ण करण्याचे काम आता आपल्याला करायचे आहे त्यासाठी कामाला लागा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

मागच्यावेळीच भाजपचा महापौर झाला असता. पण शिवसेनेसाठी आम्ही दोन पावले मागे आलो, असा गौप्यस्फोटही देवेंद्र फडणवीस यांनी केला. तसेच जे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नावावर निवडून आले त्यांनी मुंबईला वाऱ्यावर सोडले. आपल्याला बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण करायचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

तुम्ही क्रिकेट खेळणारे आहात आणि जाणाणारे आहात. त्यामुळे तुम्हाला ट्वेंटी ट्वेंटी कशी खेळायची आणि जिंकायची तुम्हाला माहीत आहे. हा सामना तुम्ही जिंकणारच असेही फडणवीस आशिष शेलारांना म्हणाले. एमसीएमध्ये शेलारांनी मुंबई प्रीमीयर लिग सुरू केली आहे. आता पालिकेत मुंबई महापालिका विकास लीग तयार करायची आहे.

निवडणूक जवळ आल्यावर भावनिक मुद्दे सुरू होतील. मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे षडयंत्र असा आरोप होईल. त्यांना माहीत आहे, मुंबईला महाराष्ट्रापासून तोडले जाणार नाही. कारण संविधान आहे. पण मुद्दाम भ्रम तयार केला जात आहे.

**मुंबई दिल्लीसमोर झुकणार नाही**


मुंबई मुंबई आहे. मुंबई आर्थिक राजधानी आहे. दिल्ली दिल्ली आहे. देशाची राजधानी आहे. मुख्यमंत्री दिल्लीत गेले तर दिल्लीश्वरांसमोर झुकले. अरे एवढे दिवस काँग्रेसचे मुख्यमंत्री, मनोहर जोशी मुख्यमंत्री होते. तेही दिल्लीत जायचे. जावच लागते दिल्लीत. ती राजकीय राजधानी आहे. दिल्ली राजकीय राजधानी असेल तर दिल्लीत जावेच लागेल. त्याशिवाय प्रकल्प कसे पूर्ण होतील? तुम्ही दिल्लीत गेला. पण सोनिया गांधींसमोर नतमस्तक होण्यासाठी गेला. काही झाले तरी चालेल पण मुंबई दिल्लीसमोर झुकणार नाही. पण मुंबईकरांच्या हितासाठी मुख्यमंत्री आणि मला जितकी वेळा जावे लागेल तितके वेळा जाऊ आणि मान्यता आणू असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### मोदी पर्व संपत आल्याची नांदी : उद्धव ठाकरे

देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत भाषण करताना आपल्याला बाळासाहेबांच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेत सत्ता मिळवायची आहे म्हणत त्यांच्या नावाने मते मागायचा केविलवाणा प्रयत्न केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता मोदींच्या नावाने मते मागून उपयोग होणार नाही हेच एकप्रकारे अधोरेखित केले आणि मोदी पर्व संपल्याचीच ही नांदी, कबुली आहे, असे म्हणत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर घणाघाती टीका केली. भाजपच्या धोरणानुसार वापर संपला की नवीन नाव शोधायचे आणि त्यांच्या नावाने मते मागायची आणि आपली सत्तेची तळी भरायची असाच हा प्रकार आहे.

## महत्त्वाची बातमी

### उत्तर प्रदेशमध्ये भूकंपाचे धक्के



आधुनिक केसरी न्यूज

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील लखनऊ आणि सीतापूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये रात्री उशिरा भूकंपाचे धक्के जाणवले. मध्यरात्री १.१६ च्या सुमारास जाणवलेल्या या भूकंपाची तीव्रता ५.२ रिश्टर स्केल इतकी होती. त्याचा केंद्रबिंदू लखनऊच्या १३९ किमी उत्तर-ईशान्य भागात ८२ किमी खोलीवर होता.

सुदैवाने अद्याप कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. भूकंपाच्या धक्क्यामुळे झोपेत असलेले नागरिक खडबडून जागे झाले आणि त्यांनी घराबाहेर पळ काढला. शहरात गोकुळाष्टमीचा उत्सव उत्साह साजरा करण्यात येत होता. भूकंपाचे धक्के बसताच भाविक मंडपामधून बाहेर पळत रस्त्यावर येऊन उभे राहिले. नागरिकांच्या म्हणण्यानुसार हे धक्के एवढे जोरात होते की, घरातील फ्रिजसह अनेक वस्तू जोरजोरात हलत होत्या. मध्यरात्री १.१६ च्या सुमारास सीतापूरमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. धक्क्यांमुळे नागरिकांमध्ये भीतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महत्त्वाची बातमी

### मथुरेतील 'बांके बिहार' मंदिरात चेंगराचेंगरी



आधुनिक केसरी न्यूज

**मथुरा :** श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी उत्तर प्रदेशमधील मथुरेतील 'बांके बिहार' मंदिरात चेंगराचेंगरी झाल्याची घटना घडली. या घटनेत २ भाविकांचा मृत्यू झाला असून अनेक भाविक जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मंदिरातील प्रसिद्ध मंगला आरतीदरम्यान ही घटना घडली.

कृष्ण जन्माष्टमीनिमित्त मुथरेतील बांके बिहार मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. मंदिरात होणारी मंगला आरती वर्षातून एकदाच केली जाते. साधारण पहाटे ३ ते ४ च्या सुमारात ही आरती केली जाते. जगभरात ही आरती प्रसिद्ध आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने भाविक आरतीसाठी उपस्थित होते. अचानक भाविकांमध्ये चेंगराचेंगरी झाली आणि या घटनेत दोन भाविकांचा मृत्यू झाला तर ६ पेक्षा अधिक भाविक जखमी झाले आहेत. कृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही मथुरेत जाऊन श्रीकृष्णाची पूजा केली. जन्माष्टमी साजरी करण्यासाठी सुमारे ५० लाख भाविक मथुरेत दाखल झाले होते.



पोळा सणासाठी बाजारसावंगी येथील शुक्रवारचा आठवडे बाजार सजला असून कोरोना महामारीपासून सर्वच सण, उत्सवांवर निर्बंध होते. निर्बंध शिथिल होऊनही काही प्रमाणात नियमांमुळे बंधनात राहून सण साजरे करावे लागले होते. मात्र मोठ्या प्रतीक्षेनंतर आता निर्बंधाविना सण साजरे करता येणार असल्याने नागरिकांत प्रचंड उत्साह दिसून येत आहे. पोळा हा सण जवळ येऊन ठेपल्याने तो अगदी जोरात, उत्साहात साजरा करण्यासाठी त्याची तयारी करण्याची लगबग दिसून येत आहे. पोळा सणासाठी लागणारे साहित्याचे दुकाने बाजार पेठेत सजल्या आहेत. बाजार सावंगी येथील बाजारपेठ रंगमय होऊन सजली होती व ते खरेदीसाठी शेतकरी राजाचा उत्साह, लगबग दिसून आली. छायाचित्र : सचिन गवळी, खुलताबाद

# हिमाचल प्रदेशात पावसाचा हाहाकार

आधुनिक केसरी न्यूज

**सोलन/चंबा :** हिमाचल प्रदेशसोबतच उत्तराखंडमध्ये पावसाने थैमान घातले आहे. पावसामुळे या भागातील यंत्रणा पूर्णपणे विस्कळीत झाली असून हिमाचलमधील अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. पावसाच्या या हाहाकारामुळे हिमाचलमधील सर्वच नद्या दुधडीभरून वाहत आहेत.

परिणामी मुसळधार पावसामुळे कांगडा जिल्ह्यात पंजाब आणि हिमाचलच्या सीमेवरील चक्की नदीवर उभारण्यात आलेल्या ८०० मीटर लांब रेल्वे पूल कोसळल्याची घटना घडली आहे. पूल कोसळताचा व्हिडिओही व्हायरल झाला आहे. व्हिडिओमध्ये ९० वर्ष जूना पूल पत्त्यासारखा कोसळताना दिसत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चक्की नदीला अचानक आलेल्या पुरामुळे रेल्वे पुलाचे खांब खिळखिळे झाले होते आणि त्यामुळे हा पूल कोसळला. सुदैवाने हा पूल कोसळला तेव्हा यावर कोणीही नव्हतं. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. पुलाचे बांधकाम होईपर्यंत पठाणकोठ ते जोगिंदरनगर दरम्यान नॅरोगेज रेल्वे सेवा बंद राहणार आहे. १९२८ मध्ये ब्रिटिशांनी हा नॅरोगेज रेल्वे मार्ग सुरू केला. या पुलावरून ७ रेल्वे गाड्या धावत होत्या.



**उत्तराखंडमध्ये ढगफूटी**

हिमाचल प्रदेशातील कांगडा, चंबा, बिलासपूर, सिरमौर आणि मंडी या पाच जिल्ह्यांमध्ये पुढील काही तासांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कुल्लूमध्येही मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती असून येथील सर्व शाळाही बंद करण्यात आल्या आहेत. याशिवाय उत्तराखंडमध्ये सकाळी झालेल्या ढगफुटीमुळे पुराचा धोका वाढला आहे.

मंडी येथे मुसळधार पावसामुळे एक घर भूस्खलनामुळे जमीनदोस्त झाले आहे. कुटुंबातील आठ सदस्य मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या स्थानिक लोक अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत.

# तब्बल दीड तास गंगापूर-वैजापूर महामार्ग बंद

## वाल्मीक शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन


आधुनिक केसरी न्यूज

गंगापूर : शेतकऱ्याच्या विविध मागण्यांसाठी स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष वाल्मीक शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांकडून मांजरी फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सरासरीपेक्षा दुप्पट पाऊस झाला असून खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार हेक्टरी भरपाई देण्यात यावी अशी मागणी करत शेकडो शेतकऱ्याच्या उपस्थितीत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.आंदोलनामुळे गंगापूर वैजापूर महामार्गावर काही काळ वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

गंगापूरहुन वैजापूर कडे जात असताना मांजरी फाटा येथे सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाला विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी भेट दिली. याप्रसंगी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, एन डी आर एफ च्या निकषानुसार जाहीर झालेली मदत ही फसवी आहे. शेतकऱ्याच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम हे सरकार करत आहेत. काही भागात प्रचंड पाऊस झाल्याने पिकांचे नुकसान झाले आहे तर काही भागात कमी पाऊस आहे, पर्जन्यमापक यंत्रणा असल्याने पावसाची नोंद होऊ शकली नाही. याला शासनाची धोरणे जबाबदार आहे. विधिमंडळात शेतकऱ्यांचा समस्या घेऊन सरकारला जाब विचारनार असल्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले.

यावेळी शिवसेनेचे कृष्णा पाटील, लक्ष्मण सांगळे, कृष्णा पाटील डोणगावकर, मा.आमदार अण्णासाहेब माने, तहसीलदार सतीश सोनी, सार्वजनिक बांधकामचे मारपल्ली, कृषी अधिकारी, तारगे, सुभाष कानडे, आंदोलनासाठी खरेदी-विक्री संघाचे माजी सभापती सुभाष पाटील धोत्रे, अनिल धोत्रे, अनंता भडके, ऋषिकेश मनाळ, शरद कोळसे, कृष्णा कारभार, अशोक वालतुरे, चंद्रकांत जाधव, अरुण ठोकळ, काकासाहेब जाधव, गोविंद जाधव, अशोक साळुंके, बापूसाहेब साळुंखे, सत्यजित क्षीरसागर, अनिल शिंदे, अनिल भागवत, विठ्ठल मिसाळ, जोसेफ माघाडे, सोमीनाथ शिंदे, गणेश वाघ, अनिल म्हस्के, योगेश म्हस्के, पोपट म्हस्के, अरुण शेळके, सादेक शेख, संजय रोकडे, भगवान सोनवणे, भागिनाथ मोरे, महेश कोतकर, नानाभाऊ लांडे, युनूस, सुवर्णाताई जाधव, वैजयंती शिरसाठ, संगीता वाघ, अंजली शिरसाठ, लीलाबाई बर्डे आदींसह महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# ‘ ये राखी बंधन है ऐसा ...

स्वामी विवेकानंदांनी जेव्हा शिकागोच्या धर्मपरिषदेत पहिल्यांदाच सगळ्यांना ‘ MY BROTHERS AND SISTERS OF AMERIKA ‘ असे आवाहन केले तेव्हा भारतासकट सगळ्या जगातील स्त्रिया या भगिनी झाल्या आणि सगळी माणसे बंधू..! केवढी विशालता...! केवढा मनाचा मोठेपणा...! आपणही आता शाळेतील विद्यार्थ्यांना जेव्हा प्रतिज्ञा शिकवतो तेव्हा म्हणतो, ‘ भारत माझा देश आहे आणि सारे भारतीय माझे बांधव आहेत. ‘ पण प्रतिज्ञा म्हणणे हा बऱ्याच वेळा एक उपचार फक्त होतो. त्यातील अर्थ बाजूलाच राहतो. अनेक वक्ते आपल्या



भाषणाची सुरुवात ‘ बंधू आणि भगिनींनो ...’ असे आवाहन करून करतात. नेतेही करतात. पण या गोष्टी बोलण्यापुरत्याच राहतात. कारण तसे असते तर आज जी जाती, धर्म, प्रदेश, भाषा इ. वरून भांडणे सुरु आहेत ती दिसली नसती. बोलायला आम्ही खूप मोठ्या गोष्टी बोलतो. पण त्या बोलण्याला, त्या शब्दांना जोपर्यंत आचरणाची जोड दिली जात नाही तोपर्यंत ते बोल म्हणजे केवळ शब्दांचे बुडबुडे ठरतात !

नुकताच आपण मैत्री दिन साजरा केला. मैत्री दिनाचे कितीतरी संदेश आपल्या त्या छोट्याशा हातात मावणाऱ्या भ्रमणध्वनीवर आले. ‘ जणू काही करलो दुनिया मुठ्ठी में..’ पण हे संदेश आणि आज येणारे HAPPY RAKSHABANDHAN चे शेकडो संदेश आपल्याला येतील. पण जोपर्यंत आपण ते खऱ्या अर्थाने मनापासून पाळत नाही तोपर्यंत ते केवळ औपचारिकता ठरतात. आजच्या काळात राखी पौर्णिमा खऱ्या अर्थाने ग्लोबल झाली आहे. विश्वव्यापक झाली आहे. काही वर्षांपूर्वी भारतातून काही राख्या अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनाही पाठवण्यात आल्याचे मी वाचले होते. आता डोनाल्डभाऊंना राखी पौर्णिमेची परंपरा माहित असण्याचे काही कारण नाही. ते त्यांना कोणीतरी समजून सांगावे लागेल तरच राखी म्हणजे काय, हे त्यांना कळेल. जसे सिकंदराला सावित्रीने राखीचे महत्त्व सांगितले होते. नाही माहिती ? सिकंदर उर्फ अलेक्झांडर द ग्रेट भारत जिंकण्यासाठी आला, झेलम नदीपर्यंतचा प्रदेश त्याने जिंकला. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# समुपदेशकाचा सल्ला मोलाचा

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील गेलेल्या क्षणांना आपण कितीही ठरवले तरीही विसरू शकत नाही. त्या गतकाळातील आठवणीचा प्रत्येक क्षण आपल्याला काहीवेळा नवी उभारी देत असतो, तर काहीवेळा नैराश्यात देखील घेऊन जात असतो. भूतकाळात घडलेल्या प्रत्येक घटनेचा, घडामोडीचा संबंध आपण आपल्या वर्तमानातील जीवनाशी जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमीच करत असतो. जो गेला तो भूतकाळ होता, त्यांत किती गुरफटून राहायचे, ह्याचे कित्येकवेळा आपल्याला भानच रहात नाही. तो काळ आपण कितीही ठरवला, तरीही विसरूच शकत नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

खरे म्हणजे भूतकाळात रममाण होण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थिनुसार भविष्य उज्वल करण्याचा आपण प्रामुख्याने आणि प्राधान्याने विचार केला पाहिजे.

आपण अनेकदा भूतकाळातून अंतर्मनाने बाहेर पडत नाही आणि वर्तमानातील आनंद मिळवू शकत नाही, केवळ आपल्या नशिबाला आणि भविष्याला दोष देत बसतो. खरे म्हणजे, नशिबाच्या खेळामुळे नाराज होऊ नये. जीवनांत काहीही झालं तरी उदास होऊ नये. हातांवरच्या रेषांवर कधी भविष्य पाहू नये आणि विश्वासही ठेवू नये. कारण, भविष्य तर त्यांना देखील असते, ज्यांना हातच नसतात. आपल्या नशिबातले योग आपणच आणायचे असतात. त्यासाठी हातापेक्षा सकारात्मक विचार आवश्यक असतात. आपले विचार बदलेले तर नशीब बदलतेच. आयुष्याचे भविष्य आपल्या वैचारिक प्रगल्भतेत सामावलेले असते. अनेकांच्या सल्ल्यांमुळे मनांत संभ्रम निर्माण होत असतात. अशावेळी स्वतःची वैचारिक बैठक बिघडते त्यामुळे विचार, वर्तन आणि व्यवहारांत नकारात्मकता वाढत जाते. अशावेळेला मानसशास्त्रीय समुपदेशकाचा सल्ला मोलाचा ठरतो.

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-35

# मोठ्यांच्या मोठेपणातच लहानांचा नाश असतो...

आधुनिक केसरी

ज्याप्रमाणे मोठ्या डेरेदार वृक्षाखाली जर एखादे लहानसे रोपटे उगवले तर त्याची वाढ होत नाही. सतत त्याच्यावर सावली असते.त्या रोपट्याला नीटसा वारा, पाऊस,ऊन मिळत नाही. परिणामी त्याची वाढ होत नाही. त्याची वाढ खुंटते. ते हिरवे राहण्याऐवजी पिवळे पडते. व कालांतराने जळून जाते. नष्ट होते. मोठ्या वृक्षाला वाटते मी त्याला सतत सावली दिली. पण ती त्या रोपट्याला नको होती. त्याला सुद्धा ऑक्सिजन हवा होता. मोकळी हवा हवी होती. वाऱ्याबरोबर त्याला डोलायचे होते . कोवळ्या उन्हात बागडायचे होते. मग त्याची वाढ निकोप झाली असती .मोठ्या झाडाखाली त्याचे बोन्साय झाले.

ते पारतंत्र्यात राहिले. परिणामी नष्ट झाले. स्वतःचे काहीच अस्तित्व उरले नाही. असे माणसे सुद्धा वागतात. कधीकधी आपल्या मोठेपणाच्या धुंदीत मुलांच्या भावनांचा काय व किती कोंडमारा होतो याची जाणीव या लोकांना नसते. बस फक्त आणि फक्त आपला मोठेपणा ,शान, शौक, नोकर-चाकर यातच हे लोक आयुष्य खर्ची घालतात.

व साऱ्या जीवनाचा आनंद गमावून बसतात आणि अगदी जर्जर झाल्यावर कुत्र्याची शेपटी आपोआप त्याच्या तोंडात येते तसं यांचं होतं .पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. वाळूचे कण हातातून निसटावे तसे आनंदी क्षण निसटुन गेलेले असतात. धगधगत्या आगीत हात होरपळून निघावे तसे मन, हृदय होरपळून जाते. पण काही लोक एवढे मुज्जोर असतात की त्यांना काडीचाही पश्चाताप होत नाही. आपले मुलं या दोन्ही वर्गाच्या लोकात बसवायचे नाही. चला तर मग आपण एक आदर्श मुलं घडवू या....



आधुनिक केसरी

# वैकुंठ दर्शन

नृसिंहवाडी येथे पुराण सुरु होते आणि विषय होता वैकुंठ भुवन. कार्तवीर्याची तक्रार घेऊन इंद्रादी देव भगवान विष्णूंकडे जातात तेव्हाचे वैकुंठाचे वर्णन दत्त माहात्म्यात आले आहे. थोरल्या महाराजांची रसाळ वाणी आपल्याला प्रत्यक्ष वैकुंठात असल्याचा प्रत्यय देते. ते म्हणतात, हे वैकुंठाचे स्थान म्हणजे आनंद भुवन असून अभागी मनुष्याला स्वप्नात देखील याचे स्मरण होणार नाही. सूर्यादिकांच्या प्रकाशाची गरज नसलेले, रोग, चिंता आणि क्लेश यांच्यापासून पूर्णतः मुक्त असलेले असे ते वैकुंठ आहे. शोक आणि मोह नसल्याने सर्वकाळ सुखावह आणि केवळ आनंद सर्वत्र भरला आहे अशा वैकुंठात कल्पवृक्षांची वने,अमृताची सरोवरे असून कामधेनू येथे फिरत असतात. भव्य अशा भवनांना सुवर्णाच्या भिंती आणि त्याही रत्नजडित आहेत. यात लावलेली चित्रे हि जिवंत असल्याचा भास होतो आणि ह्या भगवान विष्णूंच्या निवासावर दोन द्वारपाल कायम उभे असतात. त्यांची नावे जय आणि विजय असून तेही थेट भगवान विष्णूंसारखेच दिसतात. (चतुर्भुज, घननीळ) पुराण संपताच मी पुराणिक बुवांना गाठून प्रश्न केला ,थोरल्या महाराजांनी काय सुरेख वर्णन केले आहे वैकुंठाचे !! त्यांना हे सर्व वर्णन कसे माहीत असेल? त्यावर माझ्याकडे एक क्षुद्र कटाक्ष टाकून बुवा उत्तरले, आचार्य, अहो आपल्या घराचे वर्णन करायला संदर्भ लागत नाहीत.

**-अभय आचार्य**

# “निरुपण”

आधुनिक केसरी


**आमीलिताक्षमधिगम्यमुदामुकुन्दम्**
**आनन्दकन्दमनिमेषमनङ्गतन्त्रम् ।**
**आकेकरस्थितकनीनिकपक्ष्मनेत्रं**
**भूत्यै भवेन्ममभुजङ्गशयाङ्गनायाः ॥४॥**

शेषशायी भगवान विष्णूंच्या धर्मपत्नी श्रीलक्ष्मीचे ते नेत्र आम्हाला ऐश्वर्य प्रदान करणारे होवो, ज्याच्या पुतळी आणि भुवया प्रेमवश अर्धोन्मीलित आणि एकटक आपल्याकडे पाहणाऱ्या आनंदकंद श्रीमुकुंद आपल्या समीप आहेत, हे पाहून काहीशा तिरप्या होतात. || ४ ||



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ।। दासबोध स्तवन ।।



# सगुणभजन

आधुनिक केसरी

आत्मसाक्षात्काराने अंतिम सत्याचे दर्शन होते. तसा विचार केला तर किंवा हे खरे मानले तर सगुणोपासनेला परमार्थात स्थान रहात नाही अशी शंका येते आणि या शंकेचे निरसन समर्थानी या समासात केले आहे.

श्रोता विचारतो, आत्मज्ञान झाल्यावर हे सगळे द्रुष्य विश्व खोटे आहे असा अनुभव येतो तर भजनपूजन का करायचे?भजनपूजन केल्याने काय मिळते?आत्मज्ञानाहून जर दुसरे काही श्रेष्ठ नाही तर मग उपासना कशाला पाहिजे. ?उपसना करून काय मिळते?जर अंतिम सत्य निर्गुण आहे आणि तिथे सगुणाला स्थान नाही?तर सगुणाचे भजन केल्यावर काय विशेष गुणप्राप्त होतात.ते मला सांगा. जग जर नाशवंत आहे तर नाशवंत सगुणाच्या भजनाचे कारण काय?निर्गुण सत्य सोडून सगुण असत्याचे भजन कोण करणार?चौथ्या ओवीत प्रश्न कर्ता विचारतो की द्रुष्य असत्य आहे असा प्रत्यक्ष अनुभव आल्यावर मग सगुण देवाच्या भजनपूजनाचा नियम कशाला लागून घ्यायचा? सत्य बाजूला सरकवून असत्य भजनपूजनाचा गोंधळ पसारा कशाला करायचा?निर्गुणाने आपण मोक्षपदास पोहचतो असा अनुभव येतो म्हणून सगुणोपासनेपासून काय प्राप्त होते ते स्वामी आपण मला सांगा.आपण एकीकडे म्हणतो की,सगुण नाशवंत आहे आणि लगेच पून्हा म्हणतो की सगुणाचे भजन करावे, तर मी कशासाठी भजन करू?माणूस अतिशय गोंधळलेल्या अवस्थेत असल्यावर असे बोलतो. अशी अवस्था बहुतेक प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी येतेचं त्याचे ऊत्तर म्हणजे हा समास आहे ते.लक्षपूर्वक अभ्यासा.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

# वज्र हनुमान मारुती

रामदास म्हणजे समर्थ रामदास स्वामी! त्यांनी संपूर्ण कार्य करताना हनुमंताची, मारुतीरायाची मंदिरं जागोजागी स्थापन केली. भारतात अनेक ठिकाणी समर्थ स्थापित हनुमंताची मंदिरं आजही दिसतात. सुमारे अकराशे मारुती मंदिरं समर्थांनी निर्माण केली.

त्यामधील तेलंगणमधील श्रीक्षेत्रबासरपासून ४० कि.मी. अंतरावर 'सारंगपूर' गाव आहे. या ठिकाणी रामदास स्वामींनी हनुमंताची मूर्ती स्थापन केलेली आहे. सारंगपूरला मारुती मंदिराची स्थापना का केली असावी? यामागे घडलेली एक घटना आहे.

सारंगपूरजवळ एक तलाव आहे. यवन बादशाह इथे जुलूम करीत होता. त्याच्या राज्यात दुष्काळ पडला, पर्जन्यवृष्टी झाली नाही. पाऊस पडावा यासाठी या यवन राजाने ६० ब्राह्मणांना पकडून आणलं. त्यांच्या मुसक्या आवळल्या. त्यांना फर्मान सोडलं, तुम्ही असे मंत्र म्हणा की पाऊस पडला पाहिजे. पाऊस पडला नाही तर तुमची डोकी उडविली जातील.

तलावाच्या काठावर त्या ६० ब्राह्मणांना उपाशी ठेवण्यात आलं. तहान-भुकेनं व्याकूळ झालेले ब्राह्मण वेदांमधील 'पर्जन्यसूक्त' अखंड म्हणत होते. जीवाच्या भितीने व भुकेने त्रस्त झाले होते. पाऊस काही केल्या पडत नव्हता. यवन राजा सतत त्रास देत होता. अशा संकटसमयी ते भगवंताची करुणा भाकू लागले.



त्यावेळी रामदास स्वामी आपले लाडके शिष्य उद्धव स्वामींसह त्या भागातून जात होते. त्यांना ब्राह्मणांनी सगळी हकीकत कथन केली. रामदास स्वामींना ब्राह्मणांची दया आली.

समर्थ रामदास स्वामींनी एका शिलेवर कोळशाने हनुमंताचे चित्र रेखाटले. समर्थ रामदास स्वामी चांगले चित्रकार होते. त्या शिळेवर आपली छाटी घातली. त्यावर ब्राह्मणांना रुद्राभिषेक करायला सांगितला आणि काय आश्चर्य! आकाशामधून धो... धो पाऊस तप्त भूमीवर बरसू लागला. सर्व धरती पाण्याने भरुन गेली. दुष्काळ संपला. ब्राह्मणांनी रामदास स्वामींच्या पायावर लोटांगण घातली.

तेवढ्यात यवन राजा आला. तो ब्राह्मणांवर खूश झाला. तेव्हा ब्राह्मणांनी विन्रमपूर्वक कथन केलं की, ही शक्ती आमची नाही. हे सामर्थ्य समर्थाचे आहे. त्यांच्या शक्तीमधून पर्जन्यवृष्टीची करामत घडलेली आहे.

हा यवन राजा समर्थांच्या दर्शनाला आला. इतकंच नव्हे तर त्याने रामदास स्वामींचे यथासांग पूजन केले. शीलेवर समर्थांनी रेखाटलेल्या मारुतीच्या चित्राचे मूर्तीत आपोआप रुपांतर झाले. बादशाहने हनुमंताच्या मंदिरासाठी जागा देऊ केली.

समर्थ रामदास स्वामींनी एक तप (१२ वर्ष) नंदिनी-गोदावरी नदीच्या संगमात कमरेएवढ्या पाण्यात उभे राहून ''श्रीराम जयराम जय जय राम'' या त्रयोदशाक्षरी मंत्राचा जप केला. नदीकाठावर गायत्री मंत्र जपला.

या काळामध्ये एक दिवस एक महाकाय वानर समर्थांच्या पुढे येऊन वाट अडवून उभे राहिले. समर्थांना काही कळेना! ते वानर वेगाने समर्थांच्या समीप आले व त्यांना आलिंगन दिले. हे वानर म्हणजे दुसरं कोणीही नसून प्रत्यक्ष मारुतीराया -हनुमंतराय होते.

रामदास स्वामींना आलिंगन देऊन शक्तिसंपन्न केलं. त्यावेळी रामदास स्वामींच्या मुखातून सगळ्यांना सुपरिचित असणारं स्तोत्र स्फुरलं.

# वर्चस्व गाजविण्यासाठी नव्हे तर जगाला प्रेरणा देण्यासाठी भारताचा उदय

## नारद पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्यात खा.डॉ. सुधांशू त्रिवेदी यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** स्वातंत्र्याच्या या अमृतकाळात नव्या भारताचा उदय होत असून भारताचा हा उदय अन्य राष्ट्रांवर वर्चस्व गाजविण्यासाठी नाही तर जगाला प्रेरणा देण्यासाठी होत आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते, खासदार डॉ. सुधांशू त्रिवेदी यांनी शनिवारी केले.

विश्व संवाद केंद्र आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या आद्य पत्रकार देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्काराचे वितरण खा. त्रिवेदी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी पत्रकारिता आणि राष्ट्रीय चारित्र्य या विषयावर प्रमुख वक्ता म्हणून ते बोलत होते. यावेळी विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी उपस्थित होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या परिषद व नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फीथिएटरमध्ये झालेल्या या पुरस्कार उपक्रमाचे हे ११वे वर्ष असून देवर्षी नारद जयंतीच्या निमित्ताने हे पुरस्कार दरवर्षी देण्यात येतात. पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या चार पत्रकारांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. कोरोना महामारीमुळे गेली २ वर्षे हा पुरस्कार कार्यक्रम न झाल्यामुळे २०२०, २०२१ आणि २०२२ या तीन वर्षांचे पुरस्कार एकत्र देण्यात आले. प्रत्येक वर्षासाठी ज्येष्ठ पत्रकार, आश्वासक पत्रकार, छायाचित्रकार/व्यंगचित्रकार आणि सोशल मीडिया या वर्गातून पुरस्कार देण्यात आले. ज्येष्ठ पत्रकारांना २१ हजार रुपये तर अन्य तीन पुरस्कार ११ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

या प्रसंगी 'लोकमत'चे समूह संपादक विजय बाविस्कर, 'टाईम्स ऑफ इंडिया' पुण्याचे उप निवासी संपादक अभिजित अत्रे आणि नाशिक येथील दैनिक 'देशदूत 'च्या संपादक वैशाली बालाजीवाले यांना ज्येष्ठ पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'केसरी'च्या कोल्हापूर ब्यूरो चीफ अश्विनी टेंबे, 'महाराष्ट्र टाईम्स' पिंपरी-चिंचवडचे विशेष प्रतिनिधी सुनील लांडगे आणि 'सकाळ' पुणेच्या कार्यकारी संपादक शीतल पवार यांना आश्वासक पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला. लोकमत कोल्हापूरचे आदित्य वेल्हाळ आणि पुण्यातील 'टाईम्स नाऊ वाहिनी'चे व्हिडियो जर्नलिस्ट रूख्मांगद पोतदार यांना छायाचित्रकार तसेच पुण्याचे घनश्याम देशमुख यांना व्यंगचित्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिक येथील द 'फोकस इंडिया'चे संपादक विनायक ढेरे, पुण्यातील अमित परांजपे आणि सांगली येथील विनीता तेलंग यांना सोशल मीडिया इन्फ्ल्यूएंसरचा पुरस्कार देण्यात आला.

यावेळी खा. त्रिवेदी म्हणाले की हा अमृतकाळाच्या उषःकिरणांचा काळ आहे. आपल्याला 75 वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळाले मात्र 'स्व'चे तत्त्व बाकी होते. ते आता साकार होऊ लागले आहे. या काळात प्रचार माध्यमांनी संभ्रम निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. स्वातंत्र्य प्राप्त करण्यात सर्वांचे योगदान होते आणि राजकीय चळवळी, क्रांतिकार्य आणि सैन्य अभियान हे त्याचे तीन अंग होते. मात्र प्रसार माध्यमांमध्ये याला महत्त्व देण्यात आले नाही. पुस्तके आणि चित्रपट हेही प्रसार माध्यमांचेच अंग आहे. या माध्यमांतून भारतीय संस्कृतीच्या विरोधी विचार तीन पिढ्यांच्या मनात रूजवले गेले. मात्र प्रसार माध्यमांनी निर्माण केलेल्या वातावरणावर आता तंत्रज्ञान मात करत आहे.

भारतीय संस्कृतीबद्दल बोलताना ते म्हणाले, की प्राचीन काळापासून आजपर्यंत अखंड चालत आलेली आपली एकमेव संस्कृती आहे. आपल्यामध्ये एक बहुमीतीय सचेतन (मल्टीडिमेंशनल कॉन्शियस) ऊर्जा आहे. ती आपल्याला टिकून राहण्यास मदत करते. राजकीय दृष्ट्या जमिनीचा तुकडा कोणाकडेही असला तरी या राष्ट्राला समाप्त करणे सोपे नाही. आपण जगाला ईश्वराचा मार्गही सुचवू शकतो आणि भौतिक उपायही देऊ शकतो.

प्रास्ताविक करताना विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी म्हणाले की आपल्याकडे जी शाश्वत मूल्ये आहेत त्यांबद्दल आपण बोलत नाही. आपल्या सर्वच प्रेरणा विदेशी असायला हवेत, असे नाही. देवर्षी नारद यांना आम्ही आद्य पत्रकार मानतो. आधुनिक पत्रकाराला हवे असलेले सर्व गुण नारदांमध्ये होते. त्यामुळेच आम्ही नारदांच्या नावाने पुरस्कार देतो. गेल्या 10 वर्षांत विश्व संवाद केंद्राच्या वतीने 30 माध्यमकर्मींना सन्मानित करण्यात आले आहे. कोरोना काळात माध्यमकर्मींनी जीवावर उदार होऊन आणि निष्ठेने काम केले. त्यामुळे यंदाचे पुरस्कार विशेष आहेत.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे यांनी संस्थेच्या वाटचालीची आणि तिच्या उज्ज्वल इतिहासाची माहिती दिली. तसेच पत्रकारांच्या मागे आपली संस्था उभी असल्याची ग्वाही दिली. आरंभी दीपा भंडारे यांनी नारद स्तवन केले. वसुंधरा काशीकर यांनी सूत्रसंचालन तर डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सचिव धनंजय कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

**उमेद देणारा पुरस्कार**

सध्या समाजात खूप आव्हाने आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी बळ देणाऱ्या लेखणीचा हा सन्मान आहे, असे पुरस्कार प्राप्त पत्रकारांच्या वतीने मनोगत व्यक्त करताना वैशाली बालाजीवाले म्हणाल्या. अभिजित अत्रे म्हणाले की असे पुरस्कार बळ देतात आणि जबाबदारीही वाढवतात. दैनंदिन वार्तांकन करताना पत्रकारांना कौतुक आणि टिकेलाही सामोरे जावे लागते. मात्र आपण ज्या वाटेवर चाललो आहोत ती वाट बरोबर आहे हे दाखवणारे असे पुरस्कार असतात. विजय बाविस्कर यांनी पुरस्काराच्या रकमेत आणखी भर घालून विश्व संवाद केंद्राला देणगी देण्याची घोषणा केली. ते म्हणाले की हा पुरस्कार ही गुणवत्तेची तीर्थयात्रा आहे. पत्रकार केवळ समाजातील दोष दाखवत नाहीत तर ते चांगली बाजूही मांडतात. मात्र कोणतीही भूमिका एकांगी असू नये, असा सल्लाही त्यांनी नागरिक तसेच नवीन पत्रकारांना दिला.



# आयुक्तांच्या दालनाला मनसेने बांधली धुळेकरांच्या समस्यांची हंडी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील नागरिक गेल्या अनेक दिवसांपासुन विविध समस्यांमुळे त्रस्त झाले आहेत. वांरवांर तक्रारी करून, निवेदने देवूनही सत्ताधाऱ्यांसह अधिकाऱ्यांकडून कुठल्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. त्यामुळे आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्तांच्या दालनाला समस्यांची हंडी बांधली. त्यानंतर प्रशासनाला ही हंडी भेट दिली. आंदोलनाची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

याप्रसंगी मनसेचे धुळे महानगराध्यक्ष संजय सोनवणे, वाल्मीक जाधव, रविराज जोशी, सुनिल बावीस्कर, भुषण वाडीकर, गणेश सोनवणे, उन्मेश शिंपी, सागर दहिहांडे, निलेश नंदन, राहुल मराठे, राहुल वाघ, दिनेश चौधरी, गणेश जाधव, विक्की सोनार आदी उपस्थित होते. याबाबत आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरात स्वच्छता, रस्ते, अवेळी पाणी पुरवठा व दूषित पाणी पुरवठा, उघड्यावर साचलेली घाण, मोकाट जनावरे, पिसाळलेल्या कुत्र्यांचा धुमाकूळ, वाढीव घरपट्टी यासह आता डेंग्यु, मलेरीया सारखे आजारही डोके वर काढत आहेत. कामचुकार अधिकारी, कर्मचारी व सत्ताधारी, लोकप्रतिनीधींच्या हलगर्जी पणामुळे मुलभुत समस्यांचे निराकारण होवु शकत नाही. त्यामुळे जनता वैतागली आहे.


कायदा व सुव्यवस्थेला बाधा उत्पन्न होवु शकते. म्हणुन वेळीच या सर्व प्रकारावर आयुक्तांनी कार्यवाही करून जनतेला या त्रासातुन मुक्त करावे, अशी मागणी करण्यात आली. प्रसंगी अशा धुळेकर नागरीकांच्या समस्यांची हंडी आयुक्तांना देण्यात आली. या समस्यांची हंडी आपल्या हातुन फोडुन धुळेकर जनतेला या त्रासातुन मुक्त करावे, असेही निवेदनात म्हटले आहे. या सर्व समस्यांवर वेळीच तोडगा न काढल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना धुळे महानगरातर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# सावळदबारा-गोद्री फर्दापूर या नवीन रस्त्याला निसर्ग प्रेमी संघटनेचा विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा ते फर्दापूर नवीन रस्ताला या होऊ घातलेल्या रस्त्यात जामनेर जिल्हा जळगावच्या हद्दीतील साग माळ ते सावळदबारा या अजिंठा वन क्षेत्रातुन जाणाऱ्या रस्त्यात साग, मोई, धामोडी, सादळा, आसन, सलाई, पळस आदी देशी प्रजातीची २० ते ३० वर्षे वयाची हजारो झाडे या कामात तोडली जाणार आहेत.

या परिसरात मोठी वन संपदा आहे सोबतच बिबट्या, खवले मांजर, अस्वल, मोर, रान डुक्कर आदी ३० हुन अधिक वन्यजीव, कित्येक पक्षी, दुर्मिळ होत चाललेकी सफेद व काळी मुसळी, सदामस कंद आदीसाठी वाचविण्यासाठी वृक्ष तोड होऊ नये. निकोप अधिवास इथे आहे. हा अधिवास राजस्थानमध्ये अमृतादेवी व ३६३ पर्यावरण प्रेमी बिष्णोई यांनी खेजडीचे. विकास गरजेचा आहे मात्र मार्ग विकास गरजेचा आहे मात्र मार्ग मी बदलावा यासाठी तोंडापुर, गोद्री येथील पर्यावरण प्रेमींनी केंद्र सरकार वन्यजीव व पर्यावरण प्रेमींनी



केंद्र सरकार व राष्ट्रीय हरित लवादाकडे याबाबत पत्राद्वारे विनंती केली आहे. वृक्षतोडीस विरोध म्हणून गुरुवारी सदर डोंगरात लाक्षणिक चिपको आंदोलन केले आहे. झाडे वाचवण्यासाठी झाडांना मिठी मारून झाडे तोडीस विरोध केला होता म्हणून राजाच्या सैनिकांनी ३६३ निसर्ग रक्षकांची क्रूर हत्या केली होती. झाडांना मिठी मारुन सुंदरलाल बहुगुणा यांनी ही चिपको आंदोलन उभारले होते.

त्याच अनुषंगाने मी अमृता असे लिहिलेले, अमृतादेवीच्या कार्यापासून प्रेरणा घेत सर्प मित्र व निसर्ग रक्षक भूषण कानडजे यांचे नेतृत्वाखाली तोंडापुर, गोद्री येथील भाऊसाहेब पाटील, राहुल जगताप, राकेश कुमार, विजय गोरे, भिकन पाटील या तरूणांनी गुरुवारी झाडांना मिठी मारून चिपको आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधले आहे.

# तुकाराम महाराजांच्या अभंगातून आदर्श घेण्याची गरज : ज्ञानेश्वर महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** नादरपुर ता कन्नड येथे मारुती महाराज अखंड हरिनाम सप्ताह दि. 13 जुलै ते 30 जुलै पर्यजत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. यामध्ये कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

यामध्ये वृक्षारोपण करणे, कीर्तनकार यांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरी मधील सतराव्या अध्यायाचा संदर्भ देऊन व तुकाराम महाराजांच्या अभंगातून वृक्षवल्ली आम्हा सोयरे हा अभंग ग्रामस्थांसमोर संदर्भ देऊन उत्कृष्टरित्या सादर केला. दारूबंदी व्यसनमुक्ती वर जनजागृती केली. या सर्व बाबींचा ग्रामस्थांनी मनावर घेऊन आज दिनांक 20/08/2020 रोजी 15 ग्रामस्थांनी तंबाखू खाणे बंद करण्याचा संकल्प केला. तसेच दोघांनी दारूबंदीचा संकल्प केला इतर ग्रामस्थांनी ज्याच्या त्याच्या शेतात वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला. यामुळे अखंड हरिनाम सप्ताह खऱ्या अर्थाने पूर्ण झाला. ग्रामस्थांनी बोध घेतल्याने त्यांचे गुरुवर्य नरेंद्र महाराज आनंदे देवगिरीकर यांनी आभार मानले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नादरपूर यांच्यावतीने शाळेच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून दररोज एक तास अतिरिक्त घेण्याचा निर्णय घेतला. त्याची ग्रामस्थ ग्रामपंचायत शालेय समितीने आभार व्यक्त केले.

त्याप्रसंगी आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष सुभाष पाटील निकम यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी 51 हजारांचा धनादेश ग्रामपंचायत सुपूर्त केला. व रघुनाथ आबा निकम यांनी मारुती मंदिराच्या रंग कामासाठी अकरा हजार रुपये रोख दिले. त्यांची ग्रामस्थ ग्रामपंचायत व शालेय समितीच्या वतीने आभार मान्यता आले. यावेळी नादरपुर येथील सरपंच श्रीमती सविता निकम, उपसरपंच सागर निकम, ग्रामपंचायत कर्मचारी बळी, यांच्यासोबत ग्रामस्थांची मोठ्या संखेने उपस्थिती होती.






**।। व्दितीय स्मृतिदिन ।।**



**कालकथित लिलाबाईभिमराव साबळे**

(स्मृतिशेष-२१ ऑगस्ट २०२०)

आठवण येते त्या प्रेमाची
जे प्रेम तुमच्या प्रत्येक ओरडण्यामागे होते,
आठवण येते त्या प्रत्येक क्षणाची
जे क्षण तुमच्या सहवासात घालवलेले होते
तुमचं हसणं सर्व काही होतं
आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं
आज सर्व काही असल्याची जाणीव होते
पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे.

**शोकाकुल**


आयु. सौ. छाया दादासाहेब साबळे (सून-मुलगा)
आयु. सौ. संगीता हिरालाल साबळे (सून-मुलगा)
आयु. सौ. रेखा महादेव साबळे (सून-मुलगा)
आयु. सौ. मीना साहेबराव जाधव (मुलगी-जावई)
आयु. सौ. रंजना सुखदेव पगारे (मुलगी-जावई)
आयु. श्रीमती अंजली भाऊसाहेब भुईगड (मुलगी-जावई)
प्रथमेश साबळे, प्रतीक साबळे, सरणम साबळे,
मानस साबळे (नातू)

**समस्त साबळे परिवार**

निवास : नागसेननगर, गल्ली नं. 3, उस्मानपुरा, औरंगाबाद.
मो. ९३७०९२३५४३, ८८०५९९९५९५

विश्लेषण

# पंतप्रधान मोदींचे लाल किल्ल्यावरील भाषण



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**घराणेशाही जोपासणारे कोणतेही कार्यक्षेत्र व्यापक विचार करूच शकत नाही. ते फक्त सतत आपल्याच कुटुंबाचा, परिवाराचा विचार करतात. त्यांना देश, राष्ट्र, विकास, प्रगती, सुरक्षितता, समृध्दी, संपन्नता, विविधता, यांचेशी काहीही देणेघेणे नसते. ते फक्त स्वार्थ जोपासणारे असतात. आणि हा त्यांचा मुद्दा तंतोतंत खरा आहे. अगदी करूणानिधी परिवार असो, नाही तर शेख अब्दुल्ला परिवार. ममता बॅनर्जी असो नाही तर नेहरू गांधी परिवार, लालूप्रसाद यादव असो नाहीतर मुलायमसिंह यादव, चौटाला परिवार असो नाहीतर चौधरी परिवार, टी. चंद्रशेखर असोत नाही तर देवेगौडा परिवार, किंवा आपला पवार परिवार. या परिवारवादी लोकांचा ठाम समज असतो की सरकार चालवण्याची, शासन करण्याची, देशातल्या प्रश्नांची जाण फक्त यांच्या परिवारातील सदस्यांनाच असते. सर्वसामान्य माणूस आणि कुटूंबा बाहेरचे लोक नालायक असतात. नरेंद्र मोदींनी या अशा घराणेशाही जोपासणाऱ्या पक्षांवर आसूड ओढले. त्याचे दुष्परिणाम विस्ताराने विषद केले.**

या वर्षी 15 ऑगस्ट 2022 रोजी भारताचे जनप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना मांडलेले व्यापक विचार आणि त्यांच्या विचारातील बदलता भारत हे मनोगत ऐकण्यासारखे होते. हे त्यांचे झेंडावंदना नंतरचे पंतप्रधान म्हणून नववे जन संबोधन होते. यावर्षी आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत होतो. 75 वर्षे पूर्ण झाली भारताला स्वातंत्र्य मिळून. 1947 मध्ये 14 ऑगस्टला भारताचे तुकडे झाले आणि पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान अस्तित्वात आले. आणि पंधरा ऑगस्टला आपण पारतंत्र्यातुन मुक्त झालोत.

2014 मध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात बहुमताने विराजमान झाले ते नरेंद्र दामोदरदास मोदी यांच्या खंबीर, पोलादी, आणि दृढनिश्चयी नेतृत्वाचे अधिपत्याखाली. 2013 मध्ये त्यांचे नांव प्रमुख प्रचारक म्हणून जाहीर झाल्यापासून झपाटल्यासारखे ते काम करत आहेत. गेली सत्तेतील आठ वर्षे आणि आधीचे 2013-14 हे नववे वर्ष नरेंद्र मोदी राष्ट्रीय पातळीवर सतत कार्यरत आहेत. त्यापूर्वी तेरा वर्षे त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून यशस्वी कारकीर्द गाजवली आहे. न सुट्टी, न आजारपण, न थकवा न वैयक्तिक काम, फक्त देशाचा विकास, अंतरराष्ट्रीय स्तरावर अनमोल काम, आणि सक्षम अखंड भारताचे स्वप्न साकार करण्याची धडपड.

बरे हे अवाढव्य काम करताना वेळेचा योग्य वापर करण्याचे कसब आहे त्यांच्यात. प्रवासातही काम चालूच असते. शक्यतो प्रवास रात्रीचा करायचा आणि दिवसभर काम करायचे असे अविश्रांत काम करत आहेत. कधी कोणाची तक्रार करणे नाही, कोणाला दुषणे देणे नाही. घराणेशाहीवर हल्ला करणे, भ्रष्टाचारा विरुद्ध लढने चालूच आहे. त्यांचे म्हणने असते की, जे शंभर टक्के सत्यही आहे. अनुभवसिध्द पण आहे. घराणेशाही जोपासणारे कोणतेही कार्यक्षेत्र व्यापक विचार करूच शकत नाही. ते फक्त सतत आपल्याच कुटुंबाचा, परिवाराचा विचार करतात. त्यांना देश, राष्ट्र, विकास, प्रगती, सुरक्षितता, समृध्दी, संपन्नता, विविधता, यांचेशी काहीही देणेघेणे नसते. ते फक्त स्वार्थ जोपासणारे असतात. आणि हा



त्यांचा मुद्दा तंतोतंत खरा आहे. अगदी करूणानिधी परिवार असो, नाही तर शेख अब्दुल्ला परिवार. ममता बॅनर्जी असो नाही तर नेहरू गांधी परिवार, लालूप्रसाद यादव असो नाहीतर मुलायमसिंह यादव, चौटाला परिवार असो नाहीतर चौधरी परिवार, टी. चंद्रशेखर असोत नाही तर देवेगौडा परिवार, किंवा आपला पवार परिवार. या परिवारवादी लोकांचा ठाम समज असतो की सरकार चालवण्याची, शासन करण्याची, देशातल्या प्रश्नांची जाण फक्त यांच्या परिवारातील सदस्यांनाच असते. सर्वसामान्य माणूस आणि कुटूंबा बाहेरचे लोक नालायक असतात. नरेंद्र मोदींनी या अशा घराणेशाही जोपासणाऱ्या पक्षांवर आसूड ओढले. त्याचे दुष्परिणाम विस्ताराने विषद केले.

या संभाषणात तब्बल सात हजार पाहूण्यांसमक्ष भारताचे व्हिजन, पूढील वाटचाल, अपूर्ण राहीलेली कामे, प्रकल्प, भारत विश्वगुरू होण्यातील वसुधैव कुटूंबकम् ही विचारसरणी आणि भारताचे भौगोलिक महत्व, शेजाऱ्यांनी कसे वागणे अपेक्षित आहे. ते तसे न वागल्यास आपली काय तयारी आहे. हे सर्व विस्ताराने विषद केले. जनसागर आणि सन्माननीय पाहूणे मंत्रमुग्ध होऊन शांतपणे, एकाग्रतेने ऐकत होते. सैन्यदलांची सलामी स्वीकारल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी दिमाखात उभे राहिले आणि भारतमातेच्या सूपत्रांशी आणि आलेल्या पाहुण्यांशी सहज संवाद साधला. लिखीत भाषण वाचले नाही. तरीही अतिशय सूत्रबध्द, ओघवत्या शैलीत त्यांनी सर्वांना प्रभावित केले.

भारत शस्त्रास्त्रे तयार करतो आहे आणि भारताच्या ब्रम्होस ला अनेक देशांमधून मागणी आलेली आहे, आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत भारतीय तरूण उद्योजकांनी स्टार्ट अप योजनेच्या मदतीने अनेक प्रकारची आणि दर्जेदार शस्त्रे ( युध्द सामग्री) निर्मितीत यश मिळवले आहे. स्वतंत्र भारतात प्रथमच भारत शंभर टक्के शस्त्रे आता आयात करीत नाही, बरीच महत्वाची आणि बल्क मध्ये लागणारी युध्द सामुग्री भारतातच तयार होत आहे. कोविड-19 वर यशस्वी मात करून जगाच्या पाठीवरील अनेक देशांना आपण लस पुरवली. एवढेच नाही तर गरीब देशांना मोफत दिली. भ्रष्टाचार वरिष्ठ पातळीवरचा बऱ्याच मोठ्या प्रमाणात काबूत आणला आहे.

रस्ते वाहतूक आणि रोडचे जाळे देशभर उभारण्याचे काम लक्षणीय वेगात चालू आहे. जल वाहतूकही उपलब्ध करून दिली आहे. सैन्यदले, अत्याधुनिक शस्त्रे अस्त्रे संपन्न झाली असून सैनिकांना चिलखत ही पुऱ्याशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वन रॅंक वन पेन्शन योजना लागू झाली आहे. अग्नीपथ योजने अंतर्गत भरती सुरू झाली आहे.

जातपात विसरून मतदान करून देशातील लोकशाही बळकट करण्याचे आवाहन केले आहे. देशाचा पैसा हडप करणाऱ्या एकाला ही मी मोकळा सोडणार नाही. असे ठामपणे सांगताना भ्रष्ट विरोधी पक्ष नेत्यांच्या उरात धडकी भरवली आहे. श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, या शेजारी देशांना भारत सढळ हाताने मदत करत आहे. पाकिस्तानला कोणतीही दहशत न दाखवता भारताने कुटनितीने त्याला जर्जर केलेले आहे. तरुणांना आवाहन करताना जगातील सर्वात तरूण देश असल्याचा फायदा घेऊन विविध क्षेत्रात भरारी घ्यायला प्रेरित केले. शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवण्याचे संकेत दिले. विशेष म्हणजे जम्मु काश्मीर मुख्य प्रवाहात येण्याची प्रक्रिया वेग घेत आहे हे ही अवर्जून सांगितले. जगाला संदेश देताना आपापल्या देशाच्या प्रगती कडे, विकासा कडे तसेच शांतते कडे लक्ष द्या. युध्द हे कशावरचेच उत्तर नाही.

हे ठणकावून सांगताना प्रगत शक्तिशाली देशांना खडे बोल सुनावले. या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात जगासमोर अनेक क्षेत्रातील मापदंड बनण्याची भारतात क्षमता आहे. आणि आम्ही सिध्द करून दाखवूच हे ही आत्मविश्वासने जाहीरपणे सांगून आपले प्रभावी भाषण थांबवले. विविध राज्यातील मुलामुलींनी आकर्षक भारताच्या नकाशाची प्रतिमा तयार केली होती. ती पाहण्यासाठी स्वतः त्यांच्यात मिसळले. पंजाबी तरूण तरूणींना भांगडा करायला लाऊन उत्साहीत केले. आणि हा भारावून टाकणारा भारताचा राष्ट्रध्वज दिमाखात फडकवणारा कार्यक्रम संपन्न झाला.



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# मनगाव

आधुनिक केसरी

**संस्कार, संस्कृती, सभ्यता हे शब्द आता वापरून इतके गुळगुळीत झाले आहेत की, त्याबद्दल कोणास काही वाटण्याच्या पलीकडे आपण गेलो आहोत का, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हमाम मे सब नंगे हेच खरे की काय अशी अवस्था. स्त्रीला आदिमाया, शक्तीरुप म्हणून पुजायचे आणि दुसरीकडे बुभुक्षितपणे, वासनांध नजरेने वावरायचे. संधीविना ब्रह्मचारी अशी अवस्था. ज्या देशात रस्त्यावरच्या मनोरुग्ण, विकलांग स्त्रीला देखील कोणाच्या वासनेची बळी ठरावी लागत असेल तर आमची आम्हाला लाज वाटायला पाहिजे.**

यत्र नार्येस्तू पुज्यंते रमन्ते तत्र देवतः अशी या संस्कृतीची खरेच ओळख आहे का? हा प्रश्न पडावा अशी चोहीकडे परिस्थिती असताना काही व्यक्ती उच्च ध्येयाने प्रेरित होऊन काम करतात. आईच्या प्रेमळ मायेने आणि वडिलांच्या आश्वासक हाताने काम करणारे दांपत्य म्हणजे डॉ. राजेंद्र धामणे आणि डॉ. सुचेता धामणे. अहमदनगर पासून अगदी वीस किलोमीटर अंतरावर वसलेले मनगाव म्हणजे आपण अजून माणूस म्हणून घ्यायला नालायक आहोत, असे ठासून सांगणारे निराधार, मनोरुग्ण, बलात्कारपीडित माता-भगिनींचे आश्रयस्थान. कोणताही माणूस नात्यागोत्यांनी चहूबाजूने वेढलेला असणे गृहीत धरले जात असताना कोणी निराधार कसा असू शकतो? असा प्रश्न आपणास कदाचित पडणार देखील नाही. ज्याचे सर्व व्यवस्थित आहे त्याला सर्व काही आहे; परंतु ज्याचे मानसिक, शारीरिक पातळीवर काही बिघडले की हाच करुणामय असणारा समाज त्या व्यक्तीला खड्यासारखा बाजूला फेकून देतो. त्यात ती व्यक्ती स्त्री असेल तर तिच्या दुःखाला आणि संकटांना पारावार असत नाही. जणू काही ती स्त्री म्हणजे आपल्या वासनापूर्तीचे साधनच जणू! कुपोषित, मनोरुग्ण, वासनेचा शिकार झालेल्या अशा स्त्रीयांचा आधारवड बनलेले डॉ. धामणे दांपत्य म्हणजे निराश्रितांसाठी आई-बाबा. या प्रकल्पामध्ये केवळ अहमदनगर जिल्ह्यातीलच नव्हे तर सबंध महाराष्ट्रातून अनेक निराश्रीत महिला आश्रयाला आहेत. प्रत्येक महिलेची एक स्वतंत्र कहाणी आहे. एवढं उघडं नागडं सत्य स्वीकारायची आपली मानसिक स्थिती नसते. जीव गुदमरतो, घालमेल होते. साधारण चारशे भगिनी आणि पस्तीस अजाण बालके आज या संस्थेत आपले हक्काचे घर समजून राहतात. नव्हे तसा हक्कच डॉक्टरांनी त्यांना मिळवून दिला आहे. आज-काल धावपळीच्या काळात एक कुटुंब चालवायचे म्हटले तर आपली दमछाक होते. त्या ठिकाणी डॉक्टरांनी एवढा मोठा संसार उभा केला आहे. आज ही संस्था चांगल्या प्रकारे नावा रूपाला आलेली असली तरी अजूनही तुमच्या आमच्याकडे मोठ्या अपेक्षेने ही संस्था, येथील माता भगिनी पाहतात. कारण समाजाच्या दातृत्वाशिवाय कोणत्याही व्यक्तीचे कर्तृत्व म्हणावे




तसे भरारी घेऊ शकणार नाही. आपल्यातील अनेक सकारात्मक मूल्य आणि चांगुलपणा सोबतच काही नकारात्मक आणि वाईट मूल्य देखील आदिमावस्थेपासून आपण जोपासत आलेलो आहोत. आमचे शिक्षण देखील केवळ पोटापाण्याचा विचार करायला भाग पाडणारे आणि त्या भोवतीच फिरणारे असल्यामुळे माणसातील सकारात्मक विचार वाढीस लावणारे, खरी मूल्य रुजवणारे, एकमेकांवर प्रेम करायला लावणारे असे होऊ शकले नाही. डॉ. धामणे यांच्या मनगाव येथील संस्थेत अशिक्षित महिलेपासून ते अत्यंत उच्चशिक्षित महिलेपर्यंतच्या सर्व माता भगिनी आश्रयाला आहेत. दरम्यानच्या कोरोना काळात होऊन गेलेल्या घटनेबद्दल डॉक्टर साहेब बोलत होते. या काळात एक अत्यंत उच्च शिक्षित महिला खाजगी शिकवणी घेऊन आपला चरितार्थ कशीतरी चालवायची; परंतु कोरोना महामारीच्या काळात सर्व व्यवहार ठप्प झाल्यामुळे आणि आपले जवळचे कोणीच नसल्यामुळे अक्षरशः अस्थिपंजर अवस्थेत या महिलेस ज्यावेळी माऊली प्रतिष्ठान मध्ये आणण्यात आले, त्यावेळेस शरीरात अन्नाचा कण तर सोडाच पण रक्त देखील शिल्लक राहिले नव्हते. केवळ दोन टक्के हिमोग्लोबिन होता. शर्थीचे प्रयत्न करून देखील या भगिनीस आम्ही वाचवू शकलो नाही, ही खंत डॉक्टर दांपत्यांना अजूनही आहे. अशी कितीतरी उदाहरणे घडलेली आहेत. एक माणूस म्हणून, समाज म्हणून आपण केवळ हळहळ व्यक्त करण्यापलीकडे दुसरे काही करत नाही. माऊली प्रतिष्ठानने उभारलेले मनगाव हे आपल्या संस्कृतीच्या नकारात्मकतेचे प्रतीक म्हणून आपल्यासमोर उभे आहे. अहमदनगर ते शिर्डी रस्त्यावर अनेक लोक ये जा करत असतात. अनेक जण अनेक ठिकाणी देव दर्शनाला पण जातात. रांगेत उभे राहून शे पाचशे रुपयाचे तिकीट देखील काढतात. परंतु दगडाचा देव करून त्यात देवत्व शोधत बसण्यापेक्षा माणसांमध्ये आपण देव कधी पाहणार आहोत? हा खरा प्रश्न आहे. समाजसेवा हीच खरी ईश्वरसेवा हा बोध आणखी आपल्या प्राणांमध्ये उतरलेला नाही. याचे द्योतक म्हणजे आपले अशा व्यक्तींकडे, अशा कार्याकडे दुर्लक्ष करणे होय. काही माणसांना अगदी मनापासून हे सर्व बदलावे, समाज गुण्यागोविंदाने नांदावा आणि कोणालाच कोणत्याही प्रकारची समस्या असू नये, असे वाटते; परंतु शिवाजी राजे जन्मावेत ते दुसऱ्याच्या घरी, ही भावना आपणास अशा प्रकारचे कार्य करू देत नाही. कोणी कशात देव पाहावा, कुठे फिरायला जावे हा ज्याचा त्याचा प्रश्न असला तरी संवेदनशील माणूस म्हणून आपण अशा सामाजिक प्रश्नांकडे कधी पाहणार आहोत की नाही? समाजात आजही अनेक चांगली मनं घेऊन चालणारी माणसे आहेत म्हणून हे मनगाव आज अनेक निराधारांचा आधार बनलेले आहे. गरज आहे ती वाचकहो, आपल्या मदतीची, दातृत्वाची आणि अशा प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून ते प्रश्न आस्थेने समजून घेण्याची.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

### बोंबाबोंब कशासाठी?

**शोषित, निराश्रीत, निराधार, अत्याचारग्रस्त, बलात्कार पीडित यांच्याकडे केवळ सहानुभूतीने पाहून हा प्रश्न मिटणार नाही. तर समाजाची एकूणच नैतिक आणि वैचारिक पातळी कशी वाढेल? यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज आहे. समाजात अशा काही घटना घडल्यास तर त्या पीडित व्यक्तींचे पुनर्वसन संपूर्ण समाज म्हणून आपण करायला मागेपुढे पाहू नये. अनेक कारणांमुळे आपणास व्यक्तिशः असे कार्य करणे जमत नाही; परंतु आपल्यातीलच जर कोणी अशा स्वरूपाचे कार्य करत असेल तर त्यांना सढळ हाताने मदत करणे एवढे तरी नक्कीच जमू शकते.**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# “तुम्हें याद करते करते...”

आधुनिक केसरी

**ती जेव्हा 'ढूँढो ढूँढो रे साजना...' म्हणते तेव्हा तिच्या कानातील बाळी शोधायचा मोह नकळत आपल्यालाही होतो. आणि ती जेव्हा 'दो हंसों का जोड़ा...' गावू लागते तेव्हा आपल्याही डोळ्यांतली आसवं घरंगळू लागतात. एकोणीसशे अठ्ठावन्नला आलेल्या तिच्या 'मधुमती'ने तर चाहत्यांचं काळीजच चोरुन नेलं. बिमल रॉयचं दिग्दर्शन लाभलेल्या या चित्रपटात दिलीप कुमारच्या साथ-संगतीने वैजयंतीचा अभिनय रानोमाळ बहरला.**




तिची एकेक नृत्य अदा, पावलापावलांचे हळुवार पदन्यास इतके काही लोभस आणि चित्ताकर्षक होते की, आनंदाने बेभान होत पिसारा फुलवून एखादा मोरच थुईथुई नाचतोय असं वाटावं! मलमली तारुण्य काय असतं अन सौंदर्याची परिसीमा काय असते, हे त्या 'आम्रपाली'ला पाहिल्यावरच मला कळल्लं ! सौंदर्य; हे नुसतं देहात बघायचं नसतं तर, निमिषांत बदलणाऱ्या नजरेच्या हरकती या पण सौंदर्याच्याच खाणी आहेत. आणि त्या खाणी; बेमिसाल अभिनयासोबत 'नील गगन की छाँव में...' या गाण्याच्या वेळी चाहत्यांना दिसल्याच होत्या की! 'आम्रपाली' चित्रपटातील वैजयंतीचं 'नील गगन की छाँव में...' हे गाणं चिरंजीव झालं ते तिच्या नृत्यामुळेच! प्रत्यक्षातली आम्रपाली सुद्धा इतकी लावण्यसुंदर आणि प्रतिभासंपन्न नसेल कदाचित! 'सैनिका'ची (सुनील दत्त) वाट पाहाण्यातली 'आम्रपाली'ची ती बेचैनी, आणि 'सैनिक' आल्यानंतरचं तिचं ते चैतन्य-तांडव निव्वळ अफलातून होतं. वैजयंतीच्या अभिनय कौशल्याचा आणि नृत्य साधनेचा बेजोड अविष्कारच होता तो! “तुम्हें याद करते करते...” म्हणताना तर साक्षात मदनच वाटते ती! रुद्रवीणेच्या तारा छेडतांनाचं तिचं ते मुग्ध हासू, घायाळ करणारी तिची ती नजर, घट्ट-मिट्ट कचसांभार, पावलापावलांतला डौल, आणि पहाडातल्या एखाद्या हिरव्या वाटेसारखा तिचा तो बांधा... डोळ्यांत न सामावणारं उफाळतं यौवन, हे सगळं सगळं एखाद्या निष्णात चित्रकाराची चित्रकारीच होती जशी!

त्याच गाण्यातल्या, “मुझे ऐसे मत जलाओ, मेरी प्रीत है कुवाँरी...” या ओळी लिहिताना शैलेन्द्रची लेखणी जणू शृंगाररसात ओथंबलेली होती जशी. 'आम्रपाली' हा ऐतिहासिक युद्धपट असूनही लताचा लडिवाळ आवाज, शंकर-जयकिशनचं अप्रतिम संगीत आणि वैजयंतीच्या अफलातून नृत्यामुळे अभिजात चित्रपटांच्या श्रेणीत जावून बसला.

'ज्वेल थीफ'च्या 'आसमां के नीचे...' गाण्यातील,
“कह दो बहारों से आये इधर
उन तक उठकर हम नहीं जानेवाले...” हे गाणं गातांनाचा वैजयंतीचा तोरा फक्त आणि फक्त तिलाच शोभला. बोलण्यात मंजुळ खनक असलेली ती, वेगवेगळ्या भुमिका सशक्तपणे साकारणारी ती... ती कधी 'देवदास'ची चंद्रमुखी होती, कधी 'मधुमती'ची माधवी, 'साधना'तली चंपाबाई, तर कधी संगम'ची राधा, 'संघर्ष'मधली मुन्नी, तर कधी 'गंगा जमना'ची धन्नो!

वैजयंतीचा पहिला चित्रपट 'गंगा जमना' हा मी भुसावळच्या 'अमर दीप' थियेटरला पाहिला होता. 'अमर दीप' एकदम रद्दड थियेटर होतं त्यावेळी! पण आपल्या आवडत्या हिरोईनचा चित्रपट आहे म्हटल्यावर, तिकीट मिळेल तिथं आम्ही सिनेमा पाहायचो, जमेल त्या बाकावर बसायचो, डोळे मात्र मग्न असायचे ते त्या लावण्यवतीचं अभिनय-सौंदर्य काळजात भरुन घेण्यात.

भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिली मेगास्टार म्हणून ओळखली जाणारी वैजयंती, एक प्रसिद्ध अभिनेत्री तर होतीच! शिवाय; भरत नाट्यम नर्तिका, नृत्य दिग्दर्शिका, कर्नाटक गायिका आणि संसद सदस्य




देखील होती. (आजही आहे) वैजयंतीचा जन्म १३ ऑगस्ट १९३६ला मद्रास जवळच्या (आताचं चेन्नई) ट्रिप्लिकेनमध्ये पार्थसारथी मंदिराजवळ, एका अय्यंगर ब्राम्हण परिवारात झाला. तिच्या वडिलांचं नाव मंडण घाटी रमण आणि आईचं नाव वसुंधरादेवी. वसुंधरादेवी ही दक्षिण चित्रपटसृष्टीतील (तामिळ) एक आघाडीची नायिका. सेक्रेड हार्ट या उच्च माध्यमिक विद्यालयात वैजयंतीचं शिक्षण झालं. गुरु वाझुवूर रमैह पिल्लईकडून तिनं भरतनाट्याचं प्रशिक्षण घेतलं होतं. आणि मनक्कल शिवराजा अय्यर यांच्याकडून संगीताचे धडे गिरविले होते. वयाच्या सोळाव्या वर्षीच, १९४९ला 'वाझकई' या तामिळ चित्रपटातून सिनेसृष्टीत तिचं पदार्पण झालं. त्यानंतर तिचा 'जिवितम' हा तेलगू चित्रपट आला. हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील दोन दशकांवर आपली पदचिन्हे ठेवून असलेली ही अभिनेत्री, चित्रपटसृष्टीतील नृत्यशैली बदलणारी पहिली नायिका ठरली. वैजयंतीचा पहिला हिंदी चित्रपट होता १९५१चा 'बहार'. या हिट चित्रपटानंतर १९५३च्या 'लड़की' चित्रपटांत ती किशोर'दांसोबत दिसली. 'लड़की'ने तिला बऱ्यापैकी व्यावसायिक यश दिलं. त्यानंतर; १९५४ला प्रदर्शित झालेल्या तिच्या 'नागीन' चित्रपटाने यशाची पहिली पायरी रचली. त्यातील 'मन डोले मेरा तन डोले...'चं संगीत चाहत्यांच्या मनावर गारूड घालून गेलं.

'नागिन'ची गाणी रसिकांना लुभावून गेली खरी, तरी वैजयंतीच्या अभिनयाला दाद मिळावी असा चित्रपट अजून यायचाच होता. झालं; १९५५ला बिमलदांचा 'देवदास' आला. आणि चित्रपटसृष्टीच्या इतिहासात आपलं नाव ठळकपणे लिहूनही गेला. बंगालची सुपरस्टार सुचित्रा सेन त्यामध्ये पारोच्या भुमिकेत होती, आणि वैजयंती चंद्रमुखीच्या! आपापल्या भुमिकेशी समरसून गेलेल्या त्या दोघींच्या अभिनयाची जुगलबंदी हीच एक मोठी पर्वणी होती. वैजयंतीने साकारलेल्या चंद्रमुखीला चाहत्यांनीच नाही तर समीक्षकांनीही कौतुकाची थाप दिली. सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पहिला पुरस्कार तिला घोषित झाला, पण तिच्या मानी स्वभावाने तो नाकारला. तिचं म्हणणं होतं की, चंद्रमुखीची व्यक्तिरेखा ही पारो पेक्षा कुठंही कमी नव्हती, मला पुरस्कार द्यायचाच असेल तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा द्या! पण ते शक्य नव्हतं. १९५५चा सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार नुतनला 'सीमा' चित्रपटासाठी घोषित झालेला होता. 'देवदास'नंतर १९५६-५७ला 'नई देहली' आणि 'नया दौर' प्रदर्शित झाले. 'नया दौर'ने तर इतिहासच रचला.

त्याचं कथानक तर सुंदर होतंच, शिवाय आशा-रफींच्या अप्रतिम गाण्यांनी आणि ओ.पीं.च्या बहारदार संगीताने चित्रपट माईलस्टोन ठरला. 'उड़े जब जब जुल्फें...' म्हणणारी साधी-सोज्वळ रजनी शहरातीलच नाही तर गाव गल्लीतील चाहत्यांच्या मनात जावून बसली. बी. आर. चोप्राच्या निर्देशन कौशल्याने हा चित्रपट असा काही फिल्मांकित झालाय की, बघत राहावं! १९५७लाच बलराज साहनी सोबतचा तिचा 'कठपुतली' आला. त्यातल्या वैजयंतीने साकारलेल्या पुष्पाचंही कौतुक झालं. त्यानंतर 'साधना' चित्रपटावर वैजयंतीने पुन्हा आपल्या अभिनयाची मोहोर उमटवली. दमदार कथानक आणि काळाच्या कसोटीवर उतरलेली साहिरची आशयसंपन्न गाणी 'औरत ने जनम दिया मर्दों को...' / 'आज क्यों हम से पर्दा है...' / 'कहो जी तुम क्या क्या...' / 'संभल ये दिल...' ने वैजयंतीचं स्थान रसिक चाहत्यांच्या मनात आणखीनंच घट्ट केलं.

वैजयंतीने सर्वात जास्त चित्रपट दिलीप कुमार सोबत केले, त्यामुळे आपोआपच त्या दोघांना बराच काळ एकत्र काम करावं लागलं. दिलीप कुमारकडूनच ती उर्दू आणि भोजपुरी भाषा शिकली. ही जोडी पुन्हा १९६१च्या 'गंगा जमना'मध्ये दिसली. अवधी भाषा बोलत हनुवटीवर गोंदण मिरवणारी ''गंगा जमना'ची गावंढळ धन्नो अविस्मरणीयच म्हणायला हवी! ती जेव्हा 'ढूँढो ढूँढो रे साजना...' म्हणते तेव्हा तिच्या कानातील बाळी शोधायचा मोह नकळत आपल्यालाही होतो. आणि ती जेव्हा 'दो हंसों का जोड़ा...' गावू लागते तेव्हा आपल्याही डोळ्यांतली आसवं घरंगळू लागतात. एकोणीसशे अठ्ठावन्नला आलेल्या तिच्या 'मधुमती'ने तर चाहत्यांचं काळीजच चोरुन नेलं. बिमल रॉयचं दिग्दर्शन लाभलेल्या या चित्रपटात दिलीप कुमारच्या साथ-संगतीने वैजयंतीचा अभिनय रानोमाळ बहरला. पर्वतराजींमधून घुमणारं तिचं, 'आजा रे.. परदेशी...' हे डोंगर-दऱ्यांनीच नाही तर झाडा-माडांनी, नदीच्या उसळत्या धारांनी आणि धुक्यात विहरणाऱ्या वाऱ्यानेही ऐकलं. बिमल रॉयनी हे गाणं खूपच कल्पकतेने आणि कौशल्याने फिल्मांकित केलंय. 'मधुमती'चं फिल्मांकन हे नैनितालच्या उंच-सखल टेकड्यांमध्ये करण्यात आलं होतं. तिथल्या दगडांवर अनवाणी नृत्य करताना पाय घसरुन वैजयंतीच्या पायाला एकदा दुखापतही झाली होती.

शैलेन्द्रच्या लेखणीतून उतरलेली अवीट गाणी आणि सलीलदांचं श्रवणीय संगीत... 'मधुमती'ला इतिहासाच्या पानांवर घेवून गेलं. दिलीप कुमार, प्राण आणि जॉनी वॉकरचा या चित्रपटातला अभिनय सुद्धा तितकाच तगडा होता. मग, फिल्मफेअरच नाही तर; राष्ट्रीय पुरस्कारावरही या चित्रपटाने मोहोर उमटवली. आणि या चित्रपटाच्या यशाने वैजयंती स्टारडमच्या शिखरावर विराजमान झाली. असं म्हणतात की, जिगरच्या पार जाणारा तिचा तीर त्यावेळी दिलीप कुमारलाही घायाळ करुन गेला होता.

'बहारों फुल बरसाओ....' या गाण्यात,
'नज़ारों हर तरफ़ अब तान दो एक नूर की चादर
बड़ा शर्मिला दिलबर है, चला जाये ना शरमा कर...'
हसरतजींनी सुद्धा शर्मिला दिलबर; अशी हटके उपमा वैजयंतीला दिलीये. आणि 'ज्वेल थीफ'मधला देव आनंदसोबतचा तिचा दाट धुक्यातला तो रोमांस, तो बरं कसा विसरता येईल? काळजात प्रीतरस होवून वाहात असलेलं तिचं ते, 'दिल पुकारे...' निव्वळ लाजवाब होतं. विजय आनंद निर्देशित 'ज्वेल थीफ' हा देव सोबतचा वैजयंतीचा अतिशय हिट चित्रपट! यातील, 'आसमां के नीचे...' गाण्याच्या वेळीचा तिचा तोरा आजही पुन्हा पुनः बघावा वाटतो. प्रेमातल्या तिच्या त्या अनघड हरकती आपल्या प्रेयसीत का नाही? असं उगाचच वाटून जातं. 'होठों में ऐसी बात...' हे गाणं म्हणजे तिच्या नृत्य निपुणतेचा एक अफलातून अविष्काराचंय! आज इतक्या वर्षांनंतरही हे गाणं वैजयंतीच्या त्या नृत्यासाठी बघितलं आणि ऐकलं जातं. सचिन देव बर्मननी या गाण्यात लोकवाद्यांचा अतिशय प्रभावीपणे वापर केला आहे.

'ऐसा मेरा ज्वाला सा तन लहराये
लट कहीं जाये, घूँघट कही जाये...' मजरूहच्या शब्दांना लागलेली खड्गाची धार लताच्या आवाजाने आणखीनंच लखलखती केलीये. दामिनीचं चैतन्य देहात भरल्यासारखा वैजयंतीचा तो नृत्याविष्कार एक मापदंड बनून गेलाय. या गाण्याशिवाय वैजयंतीची ओळखच अपूर्ण आहे.

'मेरे पास आओ नजर तो मिलाओं...' म्हणणारी 'संघर्ष'मधली मुन्नी अजूनही फिरत असते माझ्या इर्दगिर्द! राज कपूर, राजेंद्र कुमार अभिनीत 'संगम'ने तर तिला एका वेगळ्या उंचीवर नेवून ठेवलं. हसरतजींनी लिहिलेल्या 'ये मेरा प्रेम पत्र पढ़कर...' इतकंच रसिकांना शैलेन्द्रचं 'ओ मेरे सनम...' भावून गेलं. दिलीप कुमार अन राज कपूरची जबरदस्त फॅन होती वैजयंती! याबद्दल बोलतांना एकदा ती स्वतःच म्हटली होती - 'माझ्या हृदयात दिलीप कुमार आणि राज कपूर या दोघांबद्दल खूप आदर होता. मात्र, मला अजिबातच कल्पना नव्हती की, माझ्या जीवनात आणखी तिसराच कुणी येईल!'

खरं तर; 'आम्रपाली' चित्रपट आणि त्यातील गाणी तुम्हा आम्हाला आज कितीही अभिजात वाटत असली तरी, या चित्रपटाला त्यावेळी हवं तेवढं व्यावसायिक यश मिळालं नव्हतं. आणि वैजयंतीसाठी हा फार मोठा धक्का होता. आणि इथूनच एका विमनस्क क्षणी चित्रपटसृष्टीतून बाहेर पडायचा तिने निर्णय घेतला.

'देवदास' १९५५ / 'नया दौर' १९५७ / 'मधुमती', 'साधना' १९५८ / 'पैगाम' १९५९ / 'गंगा जमना', 'आस का पंछी' १९६१ / 'जिंदगी' १९६३ / 'संगम' १९६४ / 'सूरज' १९६६ / 'ज्वेल थीफ' १९६७ / 'साथी', 'दुनियाँ', 'प्यार ही प्यार' 'संघर्ष' १९६८ आणि १९६९चा 'प्रिन्स'. तिच्या हिट चित्रपटांची यादी तशी बरीच मोठी आहे. १९७०चा 'गंवार' हा तिचा शेवटचा चित्रपट! भारत सरकारचा पद्मश्री, बॉलीवूड मुव्हीजचा जीवन गौरव, तसेच तामिळनाडू राज्य चित्रपट पुरस्कारांसह चित्रपटसृष्टीचे, आणि देश-विदेशातील नृत्य अकादमींचे कितीतरी पुरस्कार वैजयंतीच्या नावाची शान वाढवत आहेत. सर्वात मोहक अशा या सिताऱ्याने राज कपूरचे फॅमिली डॉक्टर; डॉ. बालींशी १९६८ला विवाह केला होता. डॉ. बाली हे आधीच विवाहित होते, आणि तीन मुलांचे पिता सुद्धा!

चित्रपटसृष्टीला हाताच्या अंतरावर ठेवूनही आयुष्य जवां-रंगीन करणारी ही अभिनय संपन्न महानायिका, माझ्या शब्दांच्या पलीकडे आजही विहरतेय, आपल्या आवडत्या नृत्यकलेशी प्रामाणिक राहून समरसून जगतेय. 'तस्वीरें मोहब्बत थी जिस में....'चा शीशा स्वतःच्याच हाताने तोडणारी ती... तिने पुन्हा कधीही मागे वळून पाहिलं नाही, की त्या झगमग चित्रपटसृष्टीचा तिला पुन्हा कधी मोह झाला नाही. आणि मला वाटतं, तिच्या विचारांचं हेच ठामपण तिला आजही सर्व सर्वश्रेष्ठतेकडे घेवून जातंय. अवघ्या देहावर चांदणं लपेटून असलेली ही 'जान-ए-तमन्ना', ही वैजयंती... मेहबूब म्हणावं; तर तिलाच, दिलबर म्हणावं तर तिलाच! खरं तर, सिनेमातल्या या अभिनायिका कोण लागतात आम्हा रसिकांच्या?... अडीच तीन तासांचा चित्रपट, पण त्यातल्या कलाकारांशी आपण नकळत रिलेट होत असतो. पुरुष असला तर नायकांमध्ये स्वतःला बघतो, आणि स्त्री असली तर मग मनोमन तीच त्या चित्रपटाची अभिनायिका होवून जाते.

खचितच कधी भेटलेल्या या सोयऱ्यांचे, डोळ्यांनी न दिसणारे हे धागे असे काही जोडले गेलेयेत की, वर्षोनुवर्षे त्या नात्यात आम्ही स्वतःलाच लुटत राहातो. कधी त्यांच्या अप्रतिम अभिनयाने नटलेल्या आवडीच्या चित्रपटांच्या आठवणीत, वा कधी त्यांनी अभिनीत केलेल्या एखाद्या संगीतमय सुंदर गाण्यात! चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील वैजयंती मला आजही तेवढीच आठवत असते, मात्र; तिची आठवण जेव्हा जास्त सतावते तेव्हा कॉम्प्युटरच्या छोट्याशा पडद्यावर लावत असतो मी तिचा 'आम्रपाली', आणि ऐकत बसतो तिच्याही आवडीचं ते गीत -


'तुम्हें याद करते करते, जायेगी रैन सारी
तुम ले गये हो अपने, संग नींद भी हमारी...'

**संदर्भः विकिपीडिया, यु-ट्युब, इंटरनेट मुव्ही डेटाबेस.**

## तुम्ही वसंत!

ओसाड माळरानावर स्वकर्तृत्वाने
बारमाही हिरवी बाग
फुलविणारे तुम्ही वसंत!
कर्ज, शोषण नापीकी यामध्ये
गुदमरणाऱ्या शेतकऱ्यांना
वाट दावणारे तुम्ही वसंत!
त्या वाटेने यश न आल्यास
मला चौकात फाशी द्या
अशी भावनिक साद घालून
आपलसं करणारे तुम्ही वसंत!
रोहयो, कृषी क्रांतीचे जनक
सामान्य कष्टकरी, कृषकांचा
आधार अन आभाळ होते,
अंतरंगी कृषी भक्ती
सामान्यांची शक्ती तुम्ही वसंत!
अजातशत्रू, कुशल नेतृत्व
भटक्या माणसाला दिलासा,
वसंतराव तुम्ही हिरवा वटवृक्ष
टवटवीत सौजन्यमूर्ती तुम्ही वसंत्
कला-साहित्य प्रेमी, निसर्ग पूजक
पाऊसधारा बरसल्या की,
आनंदाने पेढे वाटणारे
मोत्यांची कणसं पाहून
हरवून जात होते
गहूली आले की,
रोपट्यांना कुरवाळणारे तुम्ही वसंत्
राजकारणातले संत
तुम्ही वसंत! तुम्ही वसंत!!

-प्रा. रमेश वाघमारे
पुसद जि. यवतमाळ






## श्रीकृष्ण जन्माष्टमी

ठेविले कैदेत बहिणीस कंसाने
येईल पोटी पुत्र आठवा
करूनी टाकील नाश तुझा
क्रुर कंसाचा भरे पापाचा ठेवा...

एका रात्री चमत्कार जाहला
देवकीच्या पोटी पुत्र जन्मला
आनंद होई माता पित्याला
कसे तोंड देऊ कंस मामाला...

विचार करून सोडती मथुरेला
यमुनेला रात्रीत मोठा पुर आलेला
नसे जीवाची पर्वा ओलांडे यमुना
सुखरुप जाई बाळ गोकुळाला...

आनंद जाहला साऱ्या गोपीकांना
नंदा घरी बाळकृष्ण जन्मला
मिळे यशोदाची माया,ममता
खोड्या काढत नंदलाल वाढला...

दुष्टांचा कर्दनकाळ जाहला
गोपीकांना नाचवू लागला
कंस मामाचा वध केला
त्रिखंडात तुझा जयघोष जाहला...

-सीमा मंगरूळे तवटे
वडूज सातारा

## जात



उच्चवर्णिय शिक्षकाच्या
माठातलं पाणी पिला,
नऊ वर्षाचा चिमुकला
जीवानिशी गेला.

दलित होता म्हणून
काय गुन्हा त्याचा झाला?
जातीवादापायी त्याचा
नाहक बळी गेला.

पुन्हा एकदा घुमू लागलेत
जातीयतेचे वारे,
तरी आपण देत आहोत
आज स्वातंत्र्याचे नारे.

नावालाच राहिलाय फक्त
सर्वधर्म समभाव,
माहित नव्हतं मला
पण आज कळालं राव.

जीव घेण्यास माणसाचा
करते ती आघात,
खरंच सांगा माणसापेक्षा
मोठी आहे का जात?

-ऋषिकेश बालासाहेब सुरवसे
रा.छ.संभाजी नगर सोनपेठ
मो.८४११९४७९९६

## कृष्णाची राधा

कृष्णाशिवाय कशी राहिली राधा
प्रेमाला झाली दोघांच्या बाधा
सोडून जावे लागले राधेला
रासक्रीड़ा कृष्ण अन मथुरा

प्रेम काय असते शिकवले
जगाला तरी न लोका उमगले
प्रेमाच्या विरोधात कितिक गेले
जिव घेण्या न मागे पुढे पाहिले

अमर ती प्रेमकहानी झाली
राधा कृष्णाला न कधी भेटली
पण नेहमी त्याच्या नावात ती
मात्र फक्त राधाच बसली

प्रेम करण्या सफल म्हणतात
राधा कृष्णाची पूजा करतात
रुखमनी स्वयंवर बघावे वाचून
प्रेम मिळवावे विश्वास ठेऊन

घरात मुर्ती राधा कृष्णाची
असावी रोज न चुकता तिची
पूजा ही सर्वांच्या हातून व्हावी
भांडण तंट्याला वाट करून द्यावी

-कविता चव्हाण,
जळगाव



## सुखी जगावे...!

आव्हाने पेलण्यासाठी होऊ नये लाचार,
सुखी जगण्याचा करावा नेहमी विचार.

निर्भिडपणे संकटाला सामोरे जावेत
खडतर सस्त्यामधून मार्ग काढावेत,
आयुष्याला भिडताना सदा व्हावे हुषार
सुखी जगण्याचा करावा नेहमी विचार.

कधीही आकाशाला गवसणी घालताना
अन् दुःखाच्या मार्गावर पायी चालताना,
जगाच्या मनावरती कोरावे सुसंस्कार
सुखी जगण्याचा करावा नेहमी विचार.

कोठेही जावे, संकटे पिच्छा सोडत नाही
त्यावरी मात केल्यावरच मिळते काही,
त्यासाठी थोरांचे घ्यावे थोडे-थोडे आचार
सुखी जगण्याचा करावा नेहमी विचार.

उकल झाल्यास जीवनाचे सार कळते
कठीण आव्हानेही यशाकडेच वळते,
मनामध्ये हर्षानंदाचे उडते तुषार
सुखी जगण्याचा करावा नेहमी विचार...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४

## रक्ताची नाती

का? असे शब्द
काळजाला भिडले
रक्ताची नाती
का न तयास कळले

किती या जीवाचा
मनी अट्टाहास धरू
माळ माझी, मणी माझे
यासी कसे वेगळे करू

एवढी नाती बांधूनी
क्षणात ती विखुरली
मनी खंत वाटे या जीवा
माणसे अशी का? वागू लागली

का ? असे घडते हे मन
मनाशीच साद घाली
नको ते हेवे दावे
नको त्या आठवणी

मनासी या नको दूखावू,
हे मन गुंतव
दुसऱ्या क्षणामधी
दुसऱ्या क्षणामधी...

-सौ.भाग्यश्री दायमा

## बाळकृष्ण

गोकुळ नगरी
देवकीच्या पोटी ,
बाळकृष्ण घाली
यशोदेच्या ओटी....

श्रावण मासात
या वद्य अष्टमी ,
येई जन्मोत्सव
कृष्ण जन्माष्टमी...

सण आनंदाचा
होई जन्म काळ,
यशोदा नंदाचा
मनोहरी बाळ...

गवळणी नारी
घाली पाळण्यात ,
मोहन मुरली
गुंग हसण्यात...


काला अष्टमीला
गोपाल काल्याचा,
गोपाळांची रास
हा दही हंड्यांचा...

सौ. सुवर्णा पवार,
इचलकरंजी

# लहानग्यांचे चित्रपट (Pahuna, A way home, सावन, तहान)

आधुनिक केसरी

पहिलाच एक नेपाळी सिनेमा Pahuna (CFAI) पाहायला सुरू केला. नेपाळातल्या खेड्यात राहणारी काही कुटुंबे गाव सोडून निघतात. सामानसुमान बांधून घेतात. एक छोटी आठ-नऊ वर्षांची मुलगी, तिचा सहा-सात वर्षांचा भाऊ, आई व तान्ह्या धाकट्या भावाबरोबर इतर ओळखीच्या लोकांच्या सोबतीने चालत निघतात. बंदुकीच्या गोळीबारात त्यांचे वडील अचानक जखमी झाल्याने आई त्यांच्यासह मागेच थांबते. तीन भावंडे मात्र सोबतीने पुढे जातात. रात्री एका आडोशाला मुक्काम पडतो. टोळक्यातला आजोबा मुलांना भीतिदायक गोष्टी सांगतो. ही भावंडे त्याला घाबरतात आणि इतरांची नजर चुकवून तान्ह्या भावासह वेगळी वाट पकडतात. जंगलातला रस्ता सिक्कीमला जाणारा असतो. तो सोडून हे तिथेच एक मोडकी बस दिसते, त्यात राहतात. तान्ह्या बिशालची काळजी घेणारे दोघे अमृता व प्रणय अगदी जबाबदार पालकासारखे वागू लागतात. त्याचे थंडीपासून रक्षण करताना त्याला खाऊ घालणे, झोपवणे, आपले जेवण बनवणे, भांडी-कपडे धुणे या कामांत ते एकमेकांना मदत करतात. बसमध्ये चांगले बस्तान बसल्यावर थोडे लांबवर फिरून स्वतःसाठी काम शोधतात. त्यांना सहृदय माणसे कामही देतात. दोघे आपल्या कामाच्या वेळा जमवून घेऊन लहानग्या बिशालला सांभाळून राहतात. शेवट काय होतो ते netflix वरच पाहण्यात गंमत आहे.




A way home नावाच्या कोरियन सिनेमाने तर अगदी खिळवूनच ठेवले आम्हा सगळ्यांना. त्यातली वाकलेली म्हातारी आजी न बोलता, न रागावता-चिडता साताठ वर्षांच्या नातवाला खुलवण्यासाठी मोठ्या कष्टाने काय काय करते आणि नकळतपणे नातू त्यातून आयुष्यभराची प्रेमाची ठेव जमवतो. त्या खेड्यात वीज नसते, शहरी सोयी नसतात, त्याच्या व्हिडिओ गेमसाठी सेलसुद्धा मिळत नाहीत. तरीही कंटाळा न येता तो मुलगा तिथे दोन महिने आनंदात राहतो. त्या वातावरणातून इतरांसाठीही आपण काही करावे हा धडा तो शिकतो. बाजारातून तो बसने आधी घरी पोचतो अन् आजी नंतर हळूहळू चालत येते तो प्रसंग फार हृद्य आहे. शेवटी त्याची आई त्याला घेऊन जायला आल्यावर आजी आता एकटीच राहणार याची काळजी त्याला वाटायला लागते, हेही साध्याशा हालचालीतून समजते. जरूर पाहावा असा हा सिनेमा.

नेटफ्लिक्सवर 'सावन' नावाचा सिनेमा पाहिला. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्या मधल्या वाळवंटी प्रदेशातले लोकजीवन दुष्काळ, समाज, राजकारण आणि दहशतवादी यांमुळे कसे भरडून निघते ते दिसते. एका अपंग लहान मुलाचे संकटातून मार्ग काढत पुढे जात राहण्याचे धैर्य आणि बुद्धी यांचे वास्तवावर आधारित असे कथानक उत्कंठा वाढवते. ॲक्टिंग नाहीच, खरे घडलेलेच आहे असे वाटत राहते. 'तहान' चित्रपटाचा नायक तहान नावाचा हुशार काश्मिरी मुलगा आहे. तो त्या बर्फाळ प्रदेशात हरवलेलं त्याचं गाढव शोधत असतो. त्या शोध-प्रवासात त्याला कोण कोण भेटतं, काय काय घडतं हे पाहणे मनोरंजक आहे. त्याची आई, मोठी बहीण आणि आजोबा तहानच्या वडिलांचा सरकारी यंत्रणेमार्फत तपास करत असतात. मग ते कुटुंबाला पुन्हा भेटतात का ? तहान त्यासाठी काय करतो, हे पडद्यावरच पाहावे.



**चित्रपट परीक्षण**



नंदिनी देशमुख, संपर्क क्र. 9850018610

## पैसा झाला मोठा

माणूसकीचे मूल्य हरवले खोट्याला ना तोटा
माणूस आता लहान आणि पैसा झाला मोठा

घाम गाळल्या कष्टाचा ना होई गाजावाजा
पोशिंदा तो उभ्या जगाचा नावाचा हो राजा
दलाल बांधी इमले त्याच्या खिशात साऱ्या नोटा
माणूस आता लहान आणि पैसा झाला मोठा

दर्शन घेण्या तुझेच देवा, लाच मंदिरी लागे
धनपेटीच्या गर्दीमध्ये भक्त राहतो मागे
भावफुलांची ओंजळ सुकते पण नाण्यांचा साठा
माणूस आता लहान आणि पैसा झाला मोठा

आपुलकीला आडव्या आल्या श्रीमंतीच्या जाती
स्नेहभावना विरू लागल्या गरीबास ना नाती
सत्कर्माचा बंद मार्ग,डाव्यांना हजार वाटा
माणूस आता लहान आणि पैसा झाला मोठा..

माणूसकीचे मूल्य हरवले खोट्याला ना तोटा
माणूस आता लहान आणि पैसा झाला मोठा...

-भाग्यश्री खुटाळे, फलटण.

# विचित्र परीक्षा

आधुनिक केसरी

बऱ्याच दिवसानंतर बादशाहाला आपल्या सरदारांची विचित्र परीक्षा घेण्याची लहर आली. त्याने आपल्या सरदारांना मांजरीची गोजिरवाणी पिल्ल दिली. तो म्हणाला आज पासून बरोबर सहा महिन्यांनी हि पिल्ल घेऊन दरबारात यायच आहे. ज्याचे मांजर श्रेष्ठ ठरेल त्याला बादशाह कडून मोठ बक्षीस दिल जाईल.
प्रत्येक सरदार आपलयाला मिळालेल्या मांजराचे पिल्लू घेऊन घरी गेले. घरातल्या माणसांना त्यांनी बादशाहाने ठेवलेल्या बक्षीसाबद्दल सांगितले. मांजराला चांगली मिठाई व दुध खाऊ पिऊ घाला अशी घरतल्या माणसांना सूचना दिली.
प्रत्येक सरदाराच्या घरी मांजरांचा खुराक चालू झाला. हळू हळू मांजराच्या अंगावर तेज येऊ लागल. ती चांगली गुबगुबीत दिसू लागली. मात्र बिरबलान आपलयाला मिळालेल्या मांजराला असा खुराक दिला नाही. घरातल्या साध्या अन्नावर त्याला वाढववील. उंदीर पकडायला शिकवलं. बिरबलाचे मांजर उंदीर पकडण्यात तरबेज झाले. मात्र ते हडकुळे राहिले.



अकबर बादशहाने एक चांगला दिवस ठरवून सर्व सरदारांना आपआपली मांजर दरबारात घेऊन यायला सांगितले. प्रत्येक जन आपआपली मांजर घेऊन दरबारात आला. अकबरान सर्व मांजरा वरून नजर फिरवली. बिरबलाच्या हातातील हडकुळे मांजर पाहून बादशाहाला हसू आले. आपले हसू दाबीत बादशहा म्हणाला "बिरबल सर्व सरदारांची मांजर गुबगुबीत दिसत असताना तुझे मांजर हडकुळे का?"
बिरबल आपल्या मांजरी वरून हात फिरवत म्हणाला, "खाविंद आपण मांजराची परीक्षा तर घ्या." उंदीर पकडन हे मांजराचे काम आहे. त्यात ते पटाईत असायला हवे. बादशाहने मान हलवली आणि नोकराला दरबारात उंदीर सोडायला सांगितले. पंधरा वीस उंदीर दरबारात धाऊ लागले. प्रत्येक सरदाराने त्या दिशेने आपली मांजर सोडली. बिरबलाच्या मांजराने तर बिरबलाच्या हातातून उडी मारली. ते उंदराच्या मागे सुसाट धावत सुटले. त्याने दोन तीन उंदीर मारले देखील. इतर गलेलठ्ठ मांजरे फक्त आपल्या गोंडेदार शेपट्या फुगवून तशाच जागेवर बसून पाहून लागली. त्यांनी फक्त आपल्या मिशा फेंदारल्या होत्या आणि अंग फुगविले होते. सरदार त्यांना पुढे ढकलत होते. परंतु जागेवरून हलण्याची त्यांची तयारी नव्हती. बादशहाने बिरबलच्या मांजराला श्रेष्ठ ठरवून बिरबलाला भल मोठ बक्षीस दिल.

## सायकल माझी...!



सायकल मज
आवडे भारी,
प्रवासाची चिंता
मिटते सारी.

धूर सोडत
नाही ती कधी,
शाळेत नेई
वेळेच्या आधी.

पेट्रोल-डिझेल
लागत नाही,
पायंडल मारले की
धावत राही.

हरणावाणी ती
वेगाने पळते,
अडथळा दिसला
की लगेच वळते.

प्रदूषणाची ती
टाळते हानी,
सायकल माझी
फारच गुणी...!

## पोळा...!

आयुष्यभर राबणाऱ्या
बैलांचा सण आहे पोळा,
छन्-छन् वाजे बैलांच्या
गळ्यात घुंगरांच्या माळा.

रेशमी मखमली झुली
चढविले अंगावरती,
रंगीत फुगे अन् गोंडे
बेगडी ही शिंगावरती.

हौशा-छबिल्या, सर्ज्या-राज्या
साऱ्यांना मस्त सजविले,
वादयांच्या तालासुरावर
साऱ्या गावात मिरविले.

धन्याच्या दारात बैलांची
होतीया सन्मानाने पूजा,



ऐटीमध्ये चाखती बैलं
गोड पुरणपोळीची मजा.

सण एक दिन असते
ओझे ओढती वर्षभर,
मुके जीव हे राबतील
पुन्हा धन्याच्या शेतावर...!

## रंगारी श्रावण...!

धावुन आला रंगारी श्रावण
आनंदित झाले तन-मन

हिरवी झाली सारी तनु
मनमोहक दिसे इंद्रधनु

सृष्टी दिसते किती छान
पाहतांना हरपते भान

मैदानात खेळती मुले
जणू देवाघरची फुले

श्रावणात फिटते हौस
मागे ऊन, पुढे पाऊस

श्रावणाची गंमतच न्यारी
मोहरून जाई सृष्टी सारी...!

अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374





# गळित झाली काया । हें चि लळित पंढरीराया ॥

**तुकारामनीती**
**भाग 22**



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**तुकोबांची गाथा ही मानवी जीवनाविष्काराच्या विविध अंगांचे आणि संसारिक उत्सवांचे अनुभूतीपूर्ण ताकदीने प्रकटीकरण करते. संत तुकारामांच्या गाथ्यात वारकरी सांप्रदाय आणि तत्कालीन विविध लोककलांचा वारंवार उल्लेख येतांना तुकोबांचे अभंग त्या लोककला सुद्धा कशा समाजाच्या प्रबोधनाचे अविभाज्य अंग होत्या (?) हे वारंवार अधोरेखित करतांना आढळून येतात. कोणताही साहित्याविष्कार हा त्या त्या कालखंडाचे प्रतिनिधित्व करतांना भविष्याचा सार्वकालिक परामर्श घेऊन समकालीन परीपेक्षामध्ये समाज आणि संस्कृतीचे विविधांगाने लेखन-विवेचन करत असतो. त्याच अनुषंगाने जगद्गुरू तुकोबांचे अभंग सुद्धा वारकरी सांप्रदाय, त्यातील विविध पैलूंचे दर्शन घडवत असतांना भजन-कीर्तन-प्रवचन आणि साधर्म्याने माणसाच्या जगण्या-वागण्याबरोबरच अंतर्बाह्य शुद्धीसह भक्ती-शक्तीचे मागणे मागत असतात. तुकोबाराय हे मागणे भगवान श्री पांडुरंगाकडे मागतांना त्यांच्या समोर पंढरीच्या पांडुरंगाबरोबरच "देव रोकडा सज्जनी" या न्यायाने ते सज्जन लोकांकडे सुद्धा दान मागत आहेत हे दुर्लक्षून चालणार नाही ! याच अनुषंगाने आपण "तुकाराम नीती" या सदरांतर्गत तुकोबांच्या अभंगांचे विश्लेषण करत असतांना त्यांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून विविध विषय मोठ्या चातुर्याने हाताळतांना त्यात सहजतेने माधुर्याचे सिंचन केल्यामुळे हे अभंग उपदेश करत करत भक्तिरसाची सुरम्य उधळण करत जातात ! या विविधरंगी उधळणीत वाचक-रसिक-श्रोता कधी मंत्रमुग्ध होऊन त्याची ब्रह्मानंदी टाळी लागते (?) याचे भानही रहात नाही ! हीच तुकोबांच्या अभंगांची सर्वकालीन जादू आजही समाजमनावर तेवढ्याच ताकदीने अधिराज्य करतांना पाहून हृदयमंदिर तुकोबांसमोर शतदा नतमस्तक होते !**

मागील कांही भागात आपण वासुदेव, वैद्यगोळी, कावड आदि प्रकरणातील अभंग-विषयांचे संक्षिप्त विवेचन करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर सौऱ्या, वाघा प्रकरणाचे अभंग तुकोबांनी लिहिलेले आढळून येतात. त्यानंतर गाथ्यात अत्यंत महत्वाचे अकरा "लळित" अभंग येतात. लळितम्हणजे, "एक पारंपरिक मराठी नाट्यप्रकार, नारदीय कीर्तनपरंपरेत या प्रकाराचा समावेश करतात. विशेषतः कोकणातल्या, गोव्यातल्या नारदीय कीर्तनपरंपरेत लळिताचे स्थान अनन्यसाधारण आहे. नवरात्र, कार्तिकी एकादशी, माघ शुद्ध चतुर्थी, देवीचे नवरात्र, विविध देवस्थानांचे उत्सव यांसारख्या धार्मिकउत्सवप्रसंगी संबंधित देवतेच्या प्रीत्यर्थ नऊ, सात किंवा पाच दिवस कीर्तन, प्रवचन, भजनादी कार्यक्रम करण्यात येतात. शेवटच्या दिवशी पहाटे उत्सवदेवता सिंहासनावर बसली आहे असे मानून तिच्या दरबारात अठरापगड जातींची सोंगे हजेरी लावतात व कीर्तनकारासमवेत मागणे मागतात. याला ‘लळित’ म्हणतात. ही सोंगे त्या त्या प्रांतांतील संप्रदायांनुरूप असतात. ती त्या त्या देवतेजवळ मागणे मागून झाल्यावर प्रसाद मागतात. मग तो श्रोत्यांना वाटतात. काही ठिकाणी उत्सवाच्या वेळी भक्तांची वा जमातींची निरनिराळी सोंगे घेऊन नाट्यप्रवेशाप्रमाणे ती सादर करतात. त्यालाही लळित म्हणतात." (https://vishwakosh.marathi.gov.in/३१७६०/) या शिवायलळितम्हणजे, "महाराष्ट्रातील भक्तिनाट्य. अभिनीत भारूडे म्हणजेच लळित. सोंग आणून केलेले कीर्तन अशीही लळिताची व्याख्या केली जाते. दशावताराचे लळित, सांप्रदायिक लळित, कीर्तनाचे लळित, नामसप्ताहाचे लळित, काल्याचे लळित आणि क्रीडास्वरूपी लळित असे लळिताचे सहा प्रकार अभ्यासकांनी सांगितले आहेत." (https://marathivishwakosh.org/१७८४६/) अशा दोन विविधांगी व्याख्या मराठी विश्वकोशात आढळून येतात. वारकरी कीर्तन-भजनात टाळ-मृदंगाच्या सुमधुर नादाने काय अलौकिक अनुभूती येते ( ?) याचे वर्णन खुद्द संत ज्ञानेश्वर महाराज करतांना लिहितात,

**टाळा टाळी लोपला नाद । अंगोअंगीं मुराला छंद ।**
**भोग भोगितांची आटला भेद । ज्ञान गिळोनि गावा गोविंदू गा ॥**

अशी आनंदानुभूती येऊन ज्ञानी माणूसच भावविभोर होऊन हरिभजनी दंग होऊ शकतो याचे हे सर्वोच्च उदाहरणच आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये ! याच अनुषंगाने तूकोबांनी लळित प्रकरणातील अकरा अभंगात विविध प्रकारच्या मागण्या केलेल्या आढळून येतात. या अभंगातील सहावा अभंग

**कथेची सामुग्री । देह अवसानावरी ॥ 1 ॥**
**नको जाऊं देऊं भंगा । गात्रें माझीं पांडुरंगा ॥ धृ ॥**
**आयुष्य करीं उणें । परी मज आवडो कीर्तन ॥ 2 ॥**
**तुका म्हणे हाणी । या वेगळी मना नाणीं ॥ 3 ॥ (शा.अ.गाथा अ.क्र. 472)**

म्हणजे ईश्वराजवळ केलेली उच्च कोटीची मागणी आहे. प्रस्तुत अभंगात मानवी देहंच सर्व कृती-उक्तीचे उगमस्थान असून याच शरीररूपी साधनाच्या आधारे आपण आपल्याला हवे ते धेय्य गाठू शकतो. 'नर अगर करणी करे तो नर का नारायण हो जाये' ही मानवी शरीराची प्रचंड शक्ती अधोरेखित केली आहे. याच अनुषंगाने आपले शरीर हेच सर्वोच्च साधन असून याचे अंतर्बाह्य शुद्धीकरण अत्यावश्यक आहे, ज्याप्रमाने आपण केवळ आरसा स्वच्छ करून चालणार नाही, तोंड धुवूनही चालणार नाही, तर माणसाला अंतर्मनाने निर्मळ व्हावे लागेल. त्याचवेळी या शरीराला आपल्या आयुष्यापेक्षाही जास्त भजन-कीर्तन आवडू शकते आणि जर असे झाले नाही तर ती सर्वांत मोठी हानी असेल हे नमूद करायला तुकोबाराय विसरत नाहीत. तुकोबांच्यालळित प्रकरणात विशेषतः आपण ईश्वरीशक्तीपुढे कसे क्षीण असून त्याने दिलेले हे वैभव त्याच्याच भक्तीसाठी का विनियोगात आणू नये ( ?) हा सरळ साधा प्रश्न तुकोबाराय उपस्थित करतात आणि त्याला एका एका अभंगाद्वारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात.

**गळित जाली काया । हें चि लळित पंढरिराया ॥ 1 ॥**
**आलें अवसानापासीं । रूप राहिलें मानसीं ॥ धृ ॥**
**वाइला कळस । तेथें स्थिरावला रस ॥ 2 ॥**
**तुका म्हणे गोड जालें । नारायणीं पोट धालें ॥ 3 ॥ (शा.अ.गाथा अ.क्र. 473)**

हा अभंग माणसाची केविलवाणी अवस्था प्रकट करतो आणि ज्याप्रमाणे एखादा अपराधी राजासमोर तोंडामध्ये तृण धरून शरण येतो त्याप्रमाणे तुकोबाराय पांडुरंगाला शरण येतांना दिसतात. लळिताचे हे सर्वच अभंग तूकोबांनी आपल्या प्रगल्भ काळात म्हणजेच वयाच्या 40-41 व्या वर्षी लिहिले असावेत ? तुकोबांच्या अनेक अभंगात मानवी जीवनाची क्षणभंगुरता वारंवार समोर येतांना या अभंगांमध्ये शरीराला काळाच्या मर्यादा स्पष्ट करतांना 'आता आपण आपला जीवरूपी कळस ईश्वरपायी अर्पण केला असून यानंतर सर्वच रस निरस झालेत, संपूर्ण आयुष्य गोड झाले आहे, जीवाच्या सर्वच भुका संपल्या असून माझे सर्वस्व ईश्वर झाले आहे' ही सर्वोच्च अनुभूतीपूर्ण भावोत्कटता तुकोबाराय इथे व्यक्त होतांना



दिसतात. लळिताच्या अभंगात तुकोबा ईश्वर समर्पण करून त्याच्याशी अपरोक्ष संवाद साधतांना लिहितात,

**पतित पतित । परी मी त्रिवाचा पतित ॥ 1 ॥**
**परी तूं आपुलिया सत्ता । मज करावें सरता ॥ धृ ॥**
**नाहीं चित्तशुद्धि । स्थिर पायांपाशीं बुद्धि ॥ 2 ॥**
**अपराधाचा केलों । तुका म्हणे किती बोलों ॥ 3 ॥ (शा.अ.गाथा अ.क्र. 476)**

ही सर्वांगाने हतबलता तुकोबाराय व्यक्त होतांना आपले सर्वस्व अर्पण करतांना दिसतात. काया-वाचा-मनाने ईश्वर भक्ति कशी असते ? याचा सर्वोच्च दाखला म्हणजे तुकोबांचे जीवन आणि त्यांचे लळिताचे अभंग आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये !

संत तुकोबाराय यांचे सर्वच अकराही लळिताचे अभंग वाचल्यानंतर तूकोबांनी आपल्या नैसर्गिक स्वभावाप्रमाणे इतर लळित कलाप्रकार जसे की विविध सोंगे आणणे, नाटक करणे, त्याद्वारे श्रोत्यांना काहीतरी मागणे या सारख्या प्रकारांना छेद देऊन त्यांनी त्यांचे वेगळ्याप्रकारे लळित ईश्वरांप्रती सादर केले आहे हे लक्षात येते. त्याचे कारणही त्यांच्याच लळिताच्या अकराव्या अभंगात सापडते.

**उभारिला हात । जगीं जाणविली मात ॥ 1 ॥**
**देव बैसले सिंहासनीं । आल्या याचका होय धनी ॥ धृ ॥**
**एकाच्या कैवाडें । उगवे बहुतांचें कोडें ॥ 2 ॥**
**दोहीं ठायीं तुका । नाहीं पडों देत चुका ॥ 3 ॥ (शा.अ.गाथा अ.क्र. 477)**

ईश्वर कुठे नाही ? आंतर्बाह्य, जळी-स्थळी-काष्टी-पाषाणी संपूर्ण चराचरात त्याचे अस्तित्व असून तुकोबांच्या जीवनातील संपूर्ण भेद मावळला आहे हे लक्षात येते ! तुकोबांचे हे लळित विशेष आहे, याचे कारण म्हणजे कोणत्याही क्षणभंगुर-नश्वर गोष्टी तुकोबा ईश्वराकडे मागत नाहीत. शेवटी कोणतेही वाङ्मय असो लेखक अथवा कवीच्या अनुभूतींनी ते ओतप्रोत भरलेले असते हे विसरून चालणार नाही ! लळिताचे अभंग हे तुकाराम गाथ्यातील विशेष प्रकरण कुणीहीसहज वाचल्यास तुकोबांची अवस्था काय होती हे लक्षात आल्याशिवाय रहात नाही ! प्रचलित आणि कालबाह्य प्रथांना छेद देण्याच्या तुकारामांच्या स्वभाव वैशिष्ट्याप्रमाणे या अकरा अभंगात त्यांनी पारंपारिक लळितातील सोंगे-ढोंगे मोडीत काढून एक नवा विचार लोकांसमोर चिंतनाकरिता ठेवला आहे हे लक्षात येते. लळित परंपरा ही अगदी संत नामदेव-संत ज्ञानदेवांपासून चालत आलेली असून

**जे जे दिसे भासे नामेवस्तुची असे । तुजवीण न गमे अन्य काही सायासे ॥**
**मी तूं पर हे हि जेथे नाही सघर । निष्टंकि पदी जडले ज्ञानेश्वर ॥**

याद्वारे ईश्वराकडे आपल्या जीवनाला उच्च विचारांचे कोंदन लाभून माणसाचाच कसा देव होईल ( ?) यासाठी मागणे मागण्याची प्रथा असल्याचे ज्ञानदेवांच्या या लळित आरती वरून लक्षात येते. तेंव्हा, तुकोबांच्या या अकरा लळित अभंगाच्या अवलोकनानंतर माणसाने देवाकडे काय मागावे ? माणसाचे जीवन-जगणे अत्यंत क्षणिक-नश्वर असून आपल्या जीवनाला विश्वकल्याणाच्या उच्च विचारांची सुवर्ण झळाळी देऊन जीवन कृतार्थ करावे ! कोण दिवस येईल कैसा ? या तुकोक्तीप्रमाणे एका क्षणात होत्याचे नव्हते होते हे माणसाने विसरू नये ! त्यासाठी सर्वांगाने गळीत होऊन, ईश्वरापुढे नतमस्तक होऊन हे लळिताचे मागणे ईश्वराकडे करावे ! असे झाल्यास खऱ्या अर्थाने तुकोबांच्या अकरा अभंगांचे सार्थक होऊन प्रत्येक व्यक्ती "विश्वकल्याण" ही सर्वोच्च भावना आपल्या हृदयांत साठवून संपूर्ण जगाच्या हिताचेच चिंतन करेल ! सगळेच आनंदी असतील ! हीच आनंदानुभूती आपल्या सर्वांच्या जीवनात नांदावी या अपेक्षेसह थांबतो ! पुन्हा भेटूया, पुढील रविवारी संत तुकोबांच्या नवीन अभंगासह ! जय तुकोबाराय !

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# मराठी गझलेच्या वेलीवर कळीचा उमललेला दरवळ "एक कैफियत"

आधुनिक केसरी

**कवी, गझलकार, कादंबरीकार लोकप्रिय साहित्यिक प्रा.डॉ. बाळासाहेब लबडे यांचा "एक कैफियत" गझल संग्रह महाजन पब्लिकेशन ने प्रकाशित केलेला आहे. महाद्वार आणि मुंबई....बंबई... बॉम्बे.. या दोन प्रथितयश कवितासंग्रहांनंतर त्यांचा हा तिसरा कवितासंग्रह व पहिला गझल संग्रह आहे. समीक्षा, कविता, कथा, कादंबरी, असा त्यांचा प्रवास सुरू असतानाच त्यांनी मराठी गझल क्षेत्रातही पाऊल टाकले आहे. नाविन्याच्या कोणत्याही खुणा नसलेला हा त्यांचा पहिला गझलसंग्रह गझलविधा व गझल परंपरेला समृद्ध करणारा आहे यात शंकाच नाही. अत्यंत संयमी तरिही टोकदार भाषा, समृद्ध खयाल, सूक्ष्म निरीक्षण व उत्तम चिंतन हा मुळातच त्यांच्या लिखाणाचा मूळगाभा राहिलेला आहे.**

वेगवेगळ्या आशयगर्भ प्रतिमा उभा करून एक निराळेच साहित्यविश्व उभे करण्यात यशस्वी झालेले लेखक म्हणून त्यांनी आपली स्वतःची ओळख निर्माण केलेली आहे. वेगवेगळ्या साहित्य प्रकारांमध्ये लीलया लेखन करत त्यांनी आपले चौदा ग्रंथ प्रकाशित केलेले आहेत. त्यांना सदर लेखन-प्रपंचाकरिता महाराष्ट्रातून जवळपास 23 राज्यस्तरीय व मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. "एक कैफियत" ह्या गझल संग्रहामध्ये वापरलेली गझलेची भाषाही प्रभावी, प्रासादिक, सहज, सोपी व टोकदार आहे. त्यांची गझल उपरोध, उपहास, घेऊन येत आहेच त्याच बरोबर ती आशयसंपन्न व विषय संपन्न देखील आहे. शब्दकळा स्पष्ट आहे आणि लवचिक ही आहे. गझलेतील गझलीयत वाखानण्याजोगी आहे. पहिलाच संग्रह असून देखील त्यामध्ये तंत्र, मंत्र रसपूर्णता, माधुर्य, खयालांची खोली नावाजण्यायोग्य आहे. रचना तंत्राचे कौशल्य साध्य करत असताना गझलेच्या आशयाकडे लक्ष देत त्यांनी मांडणी केली आहे. गझलेच्या छंद वृत्तांचा व इतर सर्व तांत्रिक बाबींचा अभ्यास करून सदरची कैफियत मांडण्यात लबडे सर यशस्वी झालेले दिसतात. गझल केवळ बांधकाम नव्हे तर कसदार आशयाचे, परिपूर्ण शब्दांचे सुंदर असे लेणे असते याचे भान त्यांनी पहिल्या संग्रहात राखल्याचे जाणवते आहे. गझलेची नजाकत, तिचे सौंदर्य, आशयगर्भता, तिची पेशकश, एकेका शेरातील स्वतंत्र काव्य, शेरांचा राबता अशा एकूणच गझलेबद्दलच्या बऱ्यापैकी बाबींचा अभ्यास करून ते गझल लेखनाकडे वळालेले दिसतात.

त्यांच्या गझला या राजकीय, सामाजिक व शेतीच्या व्यवस्थांवर प्रकाश टाकणाऱ्या असून प्रहार ही करतात. त्यामध्ये उपरोध, उपहास व टीकाही ठासून भरलेली आहे. ग्रामीण जीवनाचे चित्र व चरित्र मांडण्याचा केलेला त्यांचा प्रयत्न वाखाणण्यायोग्य आहे व उल्लेखनीय आहे. ग्रामीण प्रतिमा व प्रतिकांचा वापर करत एकूणच गावगाडा, व्यवस्थेविषयीची आखणी व बांधणी काही गझलांतून केल्याचे दिसते. प्राध्यापक लबडे सर हे मुळातच मुक्तछंदात कसदार लिहिणारे कवी असल्याने त्यांच्याकडे समृद्ध खयाल आहेत. त्यामुळे त्यांच्या गझलवर त्यांच्या कवितेची सावली पडलेली दिसते. वेगवेगळी वृते हाताळत त्यांनी अनेक नवनवीन संकल्पना यामध्ये आणल्याचे दिसते आहे. अनेक गद्य पुस्तकातून व मुक्तछंद कवितेतून त्यांनी आपली ओळख निर्माण केलेली आहेच तसे ते गझल क्षेत्रातही आपली नाममुद्रा उठवतील याची खात्री वाटते.

सहज, साधी, सोपी व रोजची बोलली जाणारी भाषा ही त्यांची गझलभाषा होते आहे हे महत्त्वाचे आहे .त्यामुळे त्यांचे शेरही साधे सोपे व सहजपणे आल्याचे दिसतात...

**"आज नाही फार काही मागणे माझे दयाळा**
**रंजल्यांना हात तू दे सांगणे माझे दयाळा"**

असा गझलेचा मतला त्यांच्यातील संवेदनशील कवीचे दर्शन घडवतो. शिवाय त्यांची ईश्वराप्रती असणारी श्रद्धाही दर्शवतो व रंजल्या गांजलेल्या माणसांना आज कोणी वाली नाही तेव्हा तूच परमेश्वरा दयाळा त्यांना हात दे व त्यांचे दुःख दूर कर ही विश्वात्मक मागणी करताना ते दिसतात. तसेच...




**"वरवर जशी खरी नसतात माणसे**
**जर खोदली भुते असतात माणसे"**

हा शेर त्यांच्या अस्वस्थ काळजाचा पुकारा वाटतो. माणसांच्या अंतरंगात शिरून, परकाया प्रवेश करून माणसाच्या खऱ्या वृत्तीचा शोध घेतात आणि खऱ्या खोट्याची खरी निवड करतात तेव्हा त्यांना काही माणसांमध्ये लपलेली अघोरी वृत्ती अशा शेरांतून मांडावी वाटते. त्याही पुढे जाऊन ते शासकीय व्यवस्थेचे चित्रण करताना म्हणतात की,

**"येरझारा मारुनी थकलो आता मी**
**आणला सरकारने हा फेस बापू..."**

व्यवस्थेवर बसलेली धूळ झटकून टाकल्याशिवाय सामान्य माणसाचे अडलेले काम पुढे सरकणार नाही. ही दिरंगाईची, ही विलंबाची धूळ जमा करणारी नोकरशाही व नोकरशाहीचे पोषण करणारी राज्यकर्त्यांची जमात त्यांना चपराक मारताना त्यांनी बापूंना म्हणजे महात्मा गांधींना साक्षीदार केले आहे ही सूचकता हा शेर दाखवतो. सर्वसामान्य माणसाचे जगणे मेटाकुटीला आणणारी ही येरझारा व्यवस्था कधी संपेल कोण जाणे...

**"हे कुणी कापले हो मुळांना**
**ओल मातीत हैराण झाली"**

मातीच्या आतल्या मातीची ओल ही आईच्या मायेची ओल असते. एखादं झाड जर मुळापासून छाटून टाकलं तर मातीला आपलं मूळ नव्हे तर मूल छाटल गेल्याचं दुःख होतं व मातीच्या आतील ओल हैराण होते हे सांगणारा एक अत्यंत संवेदनशील असा हा शेर असे अनेक शेर या संग्रहात आहेत...

**"विठ्ठला झालो भुकेचे टाळ आम्ही**
**टांगतो वरवर गळ्याला माळ आम्ही"**

या शेरात विठ्ठलभक्तांची भुकेने होणारी अगतिकता ही दिसते आणि वरवर माळ घालून फिरणारांचा दांभिकपणा ही दिसतो. असे अनेक शेअर या संग्रहात आहेत जे सामान्याला बोलतही करतात आणि मूकंही करतात, सुन्नही करतात आणि विषन्नही करतात. तसेच अनेक शेरांचे आकाश खूप मोठे आहे, विस्तीर्ण आहे. शेराच्या दोन ओळीच्या विटेवर प्राध्यापक लबडे सरांनी आपली कैफियत उभा केली आहे. त्यांच्या कैफियतीचे मला काही आवडलेले शेर...

**"जाहली बरबाद शेती आमचीही**
**गंजलेल्या नांगराचा फाळ आम्ही..."**
**"गुणगुणत येउन भुंग्यांनी बसावे**
**परत चाफ्याचा फुलो मकरंद माझ्या,."**
**"पोसते ते भांडवलदारा कधीचे**
**नागड्यांना मारते सरकार आहे..."**

"बाकी काही नाही एकच करतो आहे माणुसकीचा देवारा मी भरतो आहे.."

**"कोण नाही कुणाचे खरे सांगतो**
**जीव हा एकटा एकटा चालतो.."**
**"द्यायचे कोणास पैसे**
**मी हवा दाबून घेतो .."**
**"एवढेच मागतोय मना**
**कोवळ्या फुलात वास..."**
**"चल खंड पाडू साऱ्या जगाचे**
**तेव्हा नकाशा साकार होतो..."**
**"पायी निघालो**
**स्वर्गात आम्ही..."**
**"चांगले नाही असे गंधाळणे**
**यायचा डोळ्यांवरी त्याने बहर..."**

असे एकाहून एक सरस शेर व अनेक उत्तम गझला असलेला प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे सरांचा "एक कैफियत" हा गझलसंग्रह वेलीवर नुकत्याच उगवलेल्या कळी सारखा आहे. त्यांच्या गझलेचे पुढे फूल होईल व गझल प्रांतात दरवळेल अशी आशा करतो...

सुधाकर इनामदार
9421122017

# नितळ आणि प्रवाही काव्यानुभूती



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**सृष्टीतील सर्व गोष्टी या पंचमहाभूतापासूनच बनलेल्या आहेत असे आपण म्हणतो. ती पंचमहाभूते म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश. पैकी आप महाभूत म्हणजेच पाणी. मानवी जीवनात पाण्याचं महत्त्व किती आहे, हे सर्व जाणतात. हे पाणी नदी, ओढे, धबधबा, तलाव अशा विविध माध्यमातून प्रवाहित होत असते. जलचक्रातील महत्वाचा दुवा म्हणजे समुद्र. समुद्र कोणाला नाही आवडत ? अथांग, निळाशार समुद्राच्या समोर बसल्यावर मनाला मिळणारी मनःशांती अनुभवणं म्हणजे स्वर्गसुखच ! समुद्राची विविध रूपे आपण पाहिली आहेत. शांत, संयमी समुद्र, त्याच्या धावत येणाऱ्या लाटा, समुद्राची गाज, रौद्र रूप धारण केलेला समुद्र आणि बेधडक उसळणाऱ्या लाटा, ज्याने जनजीवनच विस्कळीत होते. ही निसर्गाची रूपे मानव पाहत आला आहे. या लाटा एकामागून एक येत राहतात आणि किनाऱ्याला स्पर्शून जातात. हा किनारा म्हणजे समुद्राला मिळालेला संथपणा किंवा त्याची लक्ष्मणरेषा म्हणा.**

समुद्र म्हंटला की आठवण होते ती 'सागरा प्राण तळमळला' या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या या स्फूर्तिदायक कवितेची. 'समुद्र कोंडून पडलाय' ही वसंत आबाजी डहाके यांची कविता असो की बा.भ. बोरकर यांची 'समुद्र बिलोरी ऐना' ही कविता असो यातून निसर्गाचे सुरेख दर्शन घडते. समुद्र सगळयांनाच अशी भुरळ घालत असतो; म्हणूनच तर समुद्रावर अनेक गीतरचना निर्मिल्या गेल्या. 'हा सागरी किनारा, ओला सुगंध वारा' असो की; 'सागर किनारे दिल ये पुकारे' यासारखे गीत असो; या गीतांमधून सागराचं हळवं रूप झळकते.

कवी कॅप्टन वैभव दळवी यांचं समुद्राशी वेगळे नाते आहे. वयाच्या १८ वर्षी ते भारतीय नौदलात रुजू झाले आणि आयुष्याच्या प्रवासाला सुरुवात झाली. तेथे त्यांच्या सोबतीला होता अथांग समुद्र. लहानपणापासून घरात साहित्यिक वातावरण असल्याने त्यांच्यातील कवीमनाला स्फूर्ती मिळाली. मनातल्या भावना हळुवारपणे कवितेच्या रूपात कागदावर उमटू लागल्या. कवीच्या मनीचं प्रतिबिंब त्याच्या काव्यात उत्तम उतरतं. जहाजावर कर्तव्यावर असताना त्यांच्या आजुबाजूला होता निळाशार समुद्र, उसळणाऱ्या लाटा, समुद्राची गाज, आकाशाची निळाई आणि समुद्रातून दिसणाऱ्या बेटांचा, किनाऱ्यावरचा निसर्ग. त्यामुळेच त्यांच्या कवितांमधून तो समुद्र, निसर्ग डोकावतो, संवाद साधतो. लेखक, कवी यांच्या आजूबाजूच्या विश्वात ज्या गोष्टी असतात; त्यांचा उल्लेख त्यांच्या लेखणीतून साहित्यात उतरतो म्हणूनच साहित्य हा समाजमनाचा आरसा आरसा असतो.

कॅप्टन वैभव दळवी यांचा 'निळाईची गाज' हा पहिलाच कवितासंग्रह. यातील कविता मानवी जीवनातील निसर्गाचं स्थान विशद करणाऱ्या आहेत. डिंपल पब्लिकेशनने हा कवितासंग्रह प्रकाशित केला आहे. या कवितासंग्रहातील कविता वाचल्यानंतर जाणवलं की; या कवितांमध्ये फक्त समुद्राची, आकाशाची निळाईच नाही तर सोबत तरल मानवी भावनांची सहजता, निसर्गाचं दर्शन, देशाभिमान, निसर्गाप्रती कृतज्ञता, जलाधारांची रूपे आणि त्याच बरोबर मनाला लाभलेली प्रगल्भता, मायेची सावली अशा विविधांगी भावना, संवेदना व्यक्त होत जातात. त्यांच्यावर कवितेचे झालेले संस्कार, वडिलांकडून मिळालेले प्रोत्साहन आणि कुटुंबाची मिळालेली साथ त्यांना इथवर घेऊन आली. एकीकडे व्यापारी नौदलातील जबाबदारीची नोकरी होती तर दुसरीकडे कवितेत रमणारे त्यांचे मन त्यांना सतत खुणावत होतं. या दोन्हीची योग्य अशी सांगड घालून कॅप्टन वैभव दळवी या काव्यसंग्रहातून रसिकांना कवितेतील समुद्रसफर घडवीत आहेत.

'निळाईची गाज' या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता मनाची ओढ वाढवणारी आहे. कवितेतील आशय सहज मनाचा ठाव घेतो कारण ओघवत्या शैलीतल्या आणि प्रवाही अश्या ह्या कविता आहेत; ज्या एका ठिकाणी न थांबता सातत्याने प्रवाहित राहून पुढे पुढे मार्गक्रमण करत भावनांचा ओलावा टिकवून ठेवतात.

**'सागरा माझे नाते तुझ्याशी, नाते दिगंत आहे**
**ह्या प्रवाही जीवनाला, माझ्या न अंत आहे'**

कवी कॅप्टन वैभव दळवी यांच्या 'गाज' ह्या कवितेतील ह्या ओळी कवीचं समुद्राशी असलेलं अतूट नातं दर्शवतात. या कवितांमधून समुद्र, लाटा, आकाश, पाऊस, विजा, वादळ या शब्दप्रतिमा उत्तमरित्या त्यांच्या काव्यात रूजवलेल्या आहेत. 'आरक्षण' ही कविता डोळ्यात अंजन घालणारी आहे. जातीपातीच्या फेऱ्यात अडकलेल्या समाजाला खडबडून जाग आणणारी आहे.

**"लाटांवरती सूर मारतो, मी स्वच्छंदी पक्षी रे**
**आभाळावर कोरत असतो, मी स्वप्नांची नक्षी रे"**

'नाविक' या कवितेतुन निसर्गाच्या विविध रंगाची उधळण अनुभवायला मिळते. अथांग अशा सागरात जीवाची बाजी लावणाऱ्या नाविकाचं मनोगतच ह्या कवितेत अवतरले आहे. अनुस्वाराच्या बदलत्या स्थानामुळे शब्दांची होणारी गंमत आणि त्या भावनांचा बदलता अर्थ 'अनुस्वार' कवितेमधून उमगतो. पाऊस कधी संथ पडतो तर कधी मुसळधार, कधी पूर येतो कधी दुष्काळ, या जलधारा कधी मनाला गारवा देतात, कधी ह्याच कोसळणाऱ्या जलधारा आयुष्य उद्ध्वस्त करतात, तेव्हा कवीला प्रश्न पडतो; पावसाला नेमके काय म्हणावे? हीच मनाची घुसमट, पडलेले प्रश्न, शंका 'पाऊस देव की दानव' या कवितेतून मांडल्या आहेत.

या कवितासंग्रहातील माझ्या मनाला भावलेला भाग म्हणजे अस्सल मालवणी कविता. कोकण म्हंटलं की लाल चिऱ्याची कौलारू घरे, नारळ -सुपारीच्या बागा, समुद्रकिनारा आणि जेवणात भात आणि मासे सोबत मालवणी भाषेचा गोडवा. 'म्हावरा' या कवितेतून कवीने मालवणी खाद्यपदार्थांची खमंग ओळख करुन दिली आहे. मालवणी खाजा, खडखडे लाडू, मासे, कुल्र्या, शिंपली, कुलथाची पिठी, भात, भाकरी, सोलकढी




अहाहा.. तोंडाला पाणी सुटले! ही कविता वाचताना नक्कीच कोकणची सफर केल्याचे आनंद अनुभवायला मिळतो. निसर्गरम्य कोकण, तेथील खाद्यसंस्कृती, हवामान, राहणीमान, लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचं परिपूर्ण दर्शन घडवणारी 'माझो कोकण' ही कविता वाचनीय आहे. 'तिला ऐकतो मी' या कवितेतून कवीचं हळवं, आठवणीत गुंतलेलं मन एकांतात सागराशी संवाद साधतं,

**"समुद्रा तुझी बासरी ऐकतो मी**
**तिचे सूर गाजेतूनी ऐकतो मी"**

त्या सागराच्या अस्तित्वातूनच 'ती' च्या अस्तित्वाची गाज कवी ऐकतो आहे, तिला स्मरतो आहे. या कवितेतून एकाच वेळी प्रेम आणि विरह  आणि या अस्वस्थ मनाला सावरणारा सवंगडी अर्थात हा समुद्र यांचा त्रिवेणी संगम पाहायला मिळतो.

या कविता संग्रहातील सगळ्याच कविता इतक्या अंतर्मुख करणाऱ्या आहेत, की जितके लिहू तितके कमीच.. यातील कविता फक्त प्रेमभाव व्यक्त करत नाहीत तर ह्या कवितांमधून कवी निसर्गाप्रती आपल्या कर्तव्याची जाणीव, देशाप्रती आदरभाव, समाजातील विसंगती, समाजात वाढत चाललेला ढोंगीपणा यावर सुद्धा  भाष्य करत आहेत. 'देश म्हंजी काय र भाऊ?' ही कविता नागरिकत्व, त्याच्याशी निगडीत जबाबदऱ्या, भारतीयत्वाची भावना अधोरेखित करणारी आहे. देशाप्रती असणाऱ्या कर्तव्याची जाणीव करून देणारी अशी ही कविता आहे.'कोण लागतो रे तो तुमचा' ही कविता तर मनाला सुन्न करून जाते. भारतीय उपलष्कर प्रमुख लेफ्ट. जन. ए के भट्ट यांनी भारतीय सैन्याच्या वतीने सन्मान पत्र देऊन या कवितेचा गौरव केला आहे.

सर्वसामान्य नागरिक जेव्हा शांत झोपेत असतात तेव्हा देशाच्या सीमेवरील जवान मात्र डोळ्यात तेल घालून देशाचं रक्षण करण्यास तत्पर असतो. आयुष्याची शाश्वती नसतानाही अनेक तरुण सैन्यात रुजू होतात, भारतमातेचे रक्षण करताना छातीवर गोळ्या झेलतात, सियाचेन सारख्या उत्तुंग हिमशिखरावर अत्यंत प्रतिकूल नैसर्गिक हवामानाचा सामना करत खडा पहारा देणाऱ्या शूर वीर जवानांचं खडतर आयुष्य, त्यांच्या देशाप्रती असलेल्या भावना, अभिमान, या कवितेतून झळकतो. या कवितासंग्रहातील कवितांमध्ये निळाईची सुरेख रंगसंगती पसरलेली आहे.

कवितासंग्रहाचे शीर्षक किती मनोवेधक आहे! 'निळाईची गाज'.. शांत, नितळ, अथांग,निळाशार असा हा समुद्र, त्यावर निळे आकाश त्याच्या या निळ्या रंगाची शीतलता मनाला मनःशांती प्रदान करते. या 'निळाईची गाज' कवितेच्या माध्यमातून नक्कीच रसिकांपर्यंत पोहोचेल.

'निळाईची गाज' या कवितासंग्रहाला ज्येष्ठ कवी, गीतकार अरुण म्हात्रे यांची प्रस्तावना लाभली आहे. कवितासंग्रहाचे समर्पक मुखपृष्ठ नंदन जोशी यांनी साकारले आहे. आतील रेखाचित्रे विजयराज बोधनकर यांनी रेखाटली असून मलपृष्ठ सजावट राजलक्ष्मी बोधनकर यांनी केली आहे आणि ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे यांनी काव्यसंग्रहाची केलेली पाठराखण म्हणजे दुग्धशर्करा योग ! ही सागर निळाई कवितेतून अनुभवण्यासाठी, ही गाज मनात उतरवण्यासाठी हा कवितासंग्रह रसिकांच्या संग्रही असायलाच हवा !

# १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीचे सातारा जिल्ह्यातील वडूजचे नऊ हुतात्मे

आधुनिक केसरी

**९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबई येथे अनेक स्वातंत्र्यसेनानीला अटक झाल्याच्या निषेधार्थ पेटून उठणारा संपूर्ण भारतातील एकमेव अग्रेसर जिल्हा म्हणजे सातारा जिल्हा होय. सातारा जिल्हा 'करो या मरो' या गांधीजींच्या हाकेला प्रतिसाद देऊन क्रांतीच्या वेदीवर पुढे निघालेला हा तत्कालीन जिल्हा होता, या जिल्ह्यातील सामान्य माणसाच्या अंतकरणांमध्ये असंतोष पेटला होता, मुळात हा असंतोषाचा जिल्हा आहे, येथे देशाचे जन मन ओळखण्याच्या सतत आंतरीक प्रेरणा आहेत, उद्याचे भान असणारा हा ऐतहासिक परंपरा लाभलेला जिल्हा आहे.**

तेव्हा सातारा जिल्हा नव्हता, उत्तर सातारा व दक्षिण सातारा असा तो जिल्हा होता, उत्तर साताऱ्याच्या या जिल्ह्याने भारत छोडो ही हाक ऐकली होती, आणि ९ ऑगस्ट १९४२ ते २६ जानेवारी १९४३ या काळामध्ये २३ वेळा या जिल्ह्यामध्ये हरताळ बंद पाळण्याच्या सामूहिक घटना लोकांनी केल्या होत्या. १६७ प्रभात फेऱ्या लोकांनी काढल्या होत्या व १४५ जाहीर सभा घेतल्या होत्या. या कालावधीमध्ये २४ ऑगस्ट ते १० सप्टेंबर ४२ या कालखंडात विविध तालुक्यांच्या कचेऱ्यांवर सहा मोर्चे काढणारा हा सातारा जिल्हा होय. क्रांतीच्या या संघर्षात कीर्तने,भजने व पोवाडे या लोकगीतांतील गाण्यालाही  इथले लोक विसरले नव्हते, हा भूमिगतांचा वावर असलेला जिल्हा होय, या जिल्ह्यामध्ये प्रचंड गोपनीय पत्रके काढणे आणि ती वाटणे ही त्याकाळातील या जिल्ह्याची सामान्य देश भक्तीची बाब झाली होती. ४२च्या लढ्यातील या सातारा जिल्ह्यामध्ये लोकांच्या जनजागृतीचे माध्यम व साधन म्हणजे रेल्वे पाडणे, आश्चर्यकारक बाब म्हणजे, बिसुर, भिलवडी, किर्लोस्करवाडी, कराड, शेनोली, ताकारी ही रेल्वे स्टेशन त्या काळामध्ये घातपाताची केंद्रे बनली होती, सात वेळा रेल्वे पाडण्यात आल्या होत्या, दहा वेळा त्या यशस्वी देखील झाल्या होत्या, रेल्वे स्टेशन जाळणे, गाड्या लुटणे आणि अपघात घडवणे हे भूमी गटांचे स्वातंत्र्यसेनानींचे ब्रिटिश राज्यकर्त्या विरुद्धचे हे आंदोलन हिंसकतेकडे गेले होते, रुपांतरीत जाहले होते. तत्कालीन संवादाची साधने, तत्कालीन असलेल्या टेलिफोन व टेलिग्राफच्या तारा तोडणे ही स्वातंत्र्याची कृती ठरवली गेली होती, या संयुक्त साताऱ्याच्या आंदोलकांनी 1१४६ ठिकाणच्या टेलिफोनच्या तारा तोडल्या तसेच ३८३ टेलिफोनचे खांब उखडून टाकले आणि ५४३ इन्सुलिटर्स फोडून टाकले होते, ४२ च्या आंदोलनात क्रांतीची ही छोटी छोटी कृती ही सामान्य नागरिकांच्या दृष्टीने अथक धाडसाची गोष्ट बनली होती, किंबहुना याच मार्गाने आंदोलन पुढे निघाले होते.

महात्मा गांधींना आपल्या हिंसक आंदोलनाच्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील या घातपाताच्या कारवायांची काळजी वाटत होती, म्हणून गांधी हे नेहमी सातारा जिल्ह्यातील आंदोलकांना शस्त्र खाली टाका, सत्याग्रहात सहभागी व्हा, असे आवाहन करण्यासाठी प्रयत्नशील होते, ते अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन यांच्यामार्फत बैठका घेऊन हा संदेशही त्यांनी पोहोचवले होते. ब्रिटिशांची कार्यालय असलेल्या जिल्ह्यातील सरकारी इमारतींना घातपात घडवणे, ३३ वेळा अशा इमारती फोडण्यात आल्या होत्या, त्या सहा वेळा जाळण्यात आल्या होत्या, पोस्ट सेवा खंडित करण्यात आली होती, पोस्टाच्या पिशव्या व पत्र पेट्या पळवून नेण्यात आल्या होत्या, पोस्टाच्या गाड्या लुटण्यात आल्या होत्या, एक पोस्ट कार्यालय हि जाळण्यात आले होते. सातारा जिल्हा हा भूमिगतांचा जिल्हा होता, इथे गुप्त पत्रके वाटणे, ती प्रसिद्ध करणे ही सर्वात जास्त कृती त्या कालखंडात केली जात असे, हे काम स्वातंत्र्य सेनानी करत होते, पत्रके छापणे, पत्रके वाटणे ही स्वातंत्र्याची कृती बनली होती, असा या सातारा जिल्ह्याचा हा इतिहास वंदनीय आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना ज्या जिल्ह्याने सर्वात जास्त वडूजच्या भूमिने हुतात्मे पत्करले आणि स्वातंत्र्यसैनिकांनी आपली आयुष्य या वेदीवर अर्पण केले, ते शेकडो स्वातंत्र्यसेनानी वडूच्या मोर्चाने आणि हुतात्म्यांच्या रक्त बलिदानाने स्वातंत्र्य उत्तर काळातही अपार दुःखी झाल्याचे आढळून येते, त्या वडूजच्या मोर्चाचे यशोगाण स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या राष्ट्रभक्तीच्या प्रदर्शनीय निकषाच्या कालखंडात समजावून घेणे खूप महत्त्वाचे ठरते आहे.

८ ऑगस्ट १९४२ सातारा जिल्ह्यातील भूमिगतांनी आंदोलनाची रणनीती ठरवण्यासाठी घेतलेल्या त्या गुप्त बैठकित २४ऑगस्ट १९४२ रोजी बाबुराव चरणकर बर्डे मास्तर, जोशी काका, गणपतराव पाटील इतर भूमिगत नेत्यांनी शिराळा पेट्यातून प्रशासनाचे उच्चाटन केले होते, अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे एस एम जोशी, सुर्वे, अच्युतराव पटवर्धन या समाजवादी विचारधारेच्या नेत्यांबरोबर सातारा जिल्ह्यातील भूमिगतांचे संबंध होते, ते एकमेकांशी संवाद साधून होते. ऑगस्ट १९४२ मध्येच रेठरे बुद्रुक या ठिकाणी एक व्यापक बैठक स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली होती, त्यामध्ये आंदोलनाची पुढील रणनीती ठरली होती, घातपाताच्या कारवाया व निदर्शनात्मक कार्यक्रम व गोपनीय प्रचार पत्रके हे कार्यक्रम वेगाने पुढे चालले होते, पुढे भूमिगतांच्या सामूहिक निर्णयातून वडूज आणि इस्लामपूरचा मोर्चा निश्चित करण्यात आला होता.

एक नोव्हेंबर १९४३ रोजी यशवंतराव चव्हाण यांचे साथीदार किसनवीर येरोड्याचां जेल फोडून चार साथीदारा सह बाहेर आले होते. या सर्व आंदोलकांच्या मध्ये एकसळ गावचे दादासाहेब साखळकर, इंदोलीचे दिनकर निकम, यांच्याशी किसनवीर यांचा संबंध होता. किसनवीर यांच्यासोबत तुरुंग फोडण्यामध्ये पांडू मास्तर बोराटे हेही होते, त्यामुळे जे गट तयार करण्यात आले त्यात पांडू मास्तर बोराटे यांचा गट व कुंडल गट व वसंतदादांचा सांगली गट यांचे एकत्रित बैठका त्या कालखंडामध्ये घेण्यात आल्या होत्या, आणि पुढील आंदोलनाची सप्टेंबरमधील रणनीती ठरवण्यात आली होती.

३ सप्टेंबर १९४३ तासगावचा मोर्चा यशस्वी झाला होता, त्याची यशोगाथा अतिव गौरवाची नागरिकांच्या मनामध्ये पोहोचली होती, सप्टेंबर ४२ मध्ये अनेक लोक जनजागृती करीत होते, रामभाऊ नलावडे, माणिकचंद जोशी, बंडोपंत लोंमटे, बापू कचरे, गौरीहर सिंहासने यांनी प्रचाराचा सपाटा लावला होता, त्यातच जयराम स्वामीचे वडगाव या ठिकाणी स्वातंत्र्यसेनानी हे मुक्कामाला होते, नऊ सप्टेंबर १९४२ हा वडुच्या मोर्चाचा दिवस ठरवण्यात आला होता, परशुराम घारगे यांची निवड प्रचारक गटाने मोर्चासाठी केली होती. १९४० च्या सत्याग्रहात आपणाला सहभाग घेता आला नाही याची मनात बोचणी बाळगणाऱ्या परशुराम घारगे यांनी मोर्चाचे नेतृत्व करण्याचे मान्य केले होते, मुळात परशुराम घाडगे यांचा जन्म खटाव येथे झाला होता त्यामुळे आपण खटावडूच्या मातृभूमीसाठी मोर्चाचे नेतृत्व करतो आहे या निष्ठेमुळे त्यांची तगमग वाढली होती, नऊ सप्टेंबर १९४२ रोजी बैलगाडीत बसून, डोक्यावर गांधी टोपी घालून, हातात काँग्रेसचा झेंडा घेऊन परशुराम घारगे वडूजच्या कचेरीकडे निघाले, बंदी हुकुम होता, आपणास पकडले जाईल हे त्यांना माहीत होते. म्हणून तुरुंगात उपयोगी पडणारे कपडे, किरकोळ वस्तू त्यांनी सोबत घेतल्या होत्या. ठरलेल्या वेळेप्रमाणे खेड्यातून जवळपास २००० पेक्षा जास्त मोर्चेकरी काठ्या, दगड, कुराडी भाले ही शस्त्रे घेऊन वडूच्या वेशी जवळ जमा झाली होती, राष्ट्रीय गाणी म्हणत होती, घोषणा देत होती, ठीक अडीच वाजता मोर्चा कचेरी जवळ आला, घोषणा वाढू लागल्या, स्वातंत्र्याचा जयघोष ऐकून तत्कालीन मामलेदार हे कार्यालयाच्या बाहेर येऊन बसले पीएसआय मेंढेगिरी यांनी मोर्चाला सांगितले खबरदार पुढे येऊ नका मोर्चा ३० यार्ड व अंतरावर पुढे आला होता, घारगे यांच्यासोबत बंडोपंत लोमटे होते, परशुराम घारगे यांनी मामलेदारांना सांगितले. सरकारी कचेरीवर झेंडा लावण्याची आमची इच्छा आहे, मामलेदार म्हणाले 'झेंडा लावू देणार नाही तुम्ही परत जाणे बरे'.

क्रांतीवीर ते मान्य करीत नव्हते, 'हवे तर तुम्ही आमच्यावर लाठीमार करा किंवा आम्हाला कैद करा किंवा तुम्ही आमच्यावर गोळीबार करा आम्ही एक तसूभरही मागे फिरणार नाही' असे म्हणत ते कार्यालयाच्या दिशेने जाऊ लागले, मोर्चेकऱ्यांची निडर वृत्ती पाहून मेंढेकरी म्हणाले, 'परत फिरा परत फिरा' मोर्चेकरी दहा फूट अंतरावर जवळ आले असता मेंढीगिरीने अंतिम सांगितले, 'तुमच्यावर गोळ्या झाडण्यात येतील' ऐकून पुन्हा जमाव संतप्त झाला, नाही म्हणू लागला, मेंढीगिरीने आपल्या रिवाल्वर मधून नऊ गोळ्या आणि जमावावर उपस्थित असलेल्या पोलिसांनी बंदुकीतून ३८ गोळ्या मोर्चावर झाडल्या मोर्चेकरी मागे गेले, परशुराम घारगेनी मात्र दोन गोळ्या छातीत झेलल्या होत्या, उजव्या हातात झेंडा धरला होता डावा हात छातीवर तसाच होता, परशुराम घारगे जमिनीवर कोसळले होते, त्यांच्यासोबत होतात्म स्विकारलेले स्वातंत्र्यसेनानी किसन बंडू भोसले, रामू कृष्णा सुतार, बाळकृष्ण दिगंबर खटावकर, बलभीम हरी खटावकर, सिजू भिवा पवार, खशाबा मारुती शिंदे हे धारातीर्थी पडले त्यांच्यासह २३ मोर्चेकरी जखमी झाले होते, त्यात रामचंद्र बाळा घाडगे, अशोक बंडोपंत लोमटे, धोंडीराम रामचंद्र लोमटे, शिधा तुकाराम घारगे, आनंदा श्रीपती गायकवाड, लक्ष्मण जयराम गायकवाड, मारुती सिधू माने, शंकर श्रीपती घारगे, रघुनाथ हरी कांबळे, पांडुरंग दत्तात्रेय वडगावे, जगन्नाथ बाळा पंत, अरविंद बंडोपंत लोमटे, उद्धव गोविंद लोमटे, अंतु तुकाराम गुरव, दादा मारुती घारगे, गोविंद राजू न्हावी, नवी उस्मान शिकलगार, ज्योती हरी भोसले, सिद्धू केसू मोरे, जगु मारुती यादव आणि काशिनाथ न्यानोबा टाकने हे जखमी झालेले स्वातंत्र्य सेनानी सातारच्या रुग्णालयात उपचार घेऊन बरे झाले होते.

भारताचे माजी राजदूत आप्पासाहेब पंत यांच्या पत्नी नलिनी पंत या डॉक्टर असल्याने त्या तात्काळ वडूजला जखमी लोकांच्या उपचारासाठी गेल्या होत्या, तुमच्या मोर्चेकऱ्याच्या विचारपूस करण्यासाठी व भेटण्यासाठी गेलेल्या नलिनी पंत यांना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी भेट नाकारली होती हा इतिहास जिवंत आहे.

स्वातंत्र्याच्या वेलीवर सातारा जिल्ह्यातील वडूजच्या नऊ हुतात्म्यांनी जे बलिदान दिले त्या शहीद स्वातंत्र्यवीरांना संपूर्ण भारत देश कोटी कोटी अभिवादन करील, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना हुतात्म्यांना अभिवादन ही राष्ट्रभक्तीच ठरते, पण स्वातंत्र्य हे पुन्हा सामान्यांच्याकडून अतिसामान्य, तळातील भारतीय नागरिकांच्या हातात जाणे ही ७५ वर्षाच्या मधील कृती घडली नाही, स्वातंत्र्याने दिले काय ? आमच्या हाती आले काय? अश्या असंतोषाच्या घोषणा बहुसंख्य समाज,पीडित वर्ग देत आहे. त्यांच्या न्यायासाठी हे स्वातंत्र्य ईस्ट इंडिया कंपनी कडून मिळविले आहे ते कार्पोरेट इंडियन कंपनी यांच्या हातात जावू न देणे हेच या वडुजच्या नऊ हुतात्म्यांच्या स्मृतीला अभिवादन करताना दृढ संकल्प सर्व भारतीय करतील तरच ते कृतार्थ ठरेल.

**शिवाजी राऊत**

# ‘अष्टदीप’


आधुनिक केसरी

**विश्वास सरांनी लिहिलेले "अष्टदीप" हे अत्यंत प्रेरणादायी आणि मनोवेधक पुस्तक नुकतेच वाचले. एका विशिष्ट वयोगटाची अर्थात विद्यार्थ्यांची मानसिकता बदलण्याच्या उदात्त हेतूने कांही निवडक भारतरत्न पुरस्कार विजेत्यांचे चरित्र असलेले हे पुस्तक असावे असा माझा समज होता. किंबहुना पुस्तकाचे मुखपृष्ठ बघून मला तसे वाटले, मात्र पुस्तकाचे अंतरंग कळल्याबरोबर हा समज निव्वळ गैरसमज होता असे कळले! हे पुस्तक सर्व वयोगटाच्या भारतीयच नव्हे तर अशा प्रत्येक व्यक्तीसाठी आहे ज्यांना भारताचे अंतरंग जाणून घ्यायचे आहे! या देशाच्या परमपवित्र मातीतून अस्सल मोती कसे जन्माला येतात हे या पुस्तकाच्या वाचनातून कळते. यातील व्यक्ती कुणा एका प्रांताचे, भाषेचे, व्यवसायाचे किंवा आर्थिक दर्जाचे नाहीत. विविधतेत एकता हा भारताचा एकमेकाद्वितीय सद्गुण या पुस्तकात प्रकर्षाने जाणवतो. किंबहुना प्रत्येकाचे वैशिष्ट्य नजरेत ठळकपणाने भरावे हाच लेखकाचा हेतू दिसतो. भारतमातेच्या चरणी विविध रंगांची व विविध गंधांची सुमने अर्पण करावीत, हा अनवट विचार या पुस्तकाच्या देशभक्तीने भारलेल्या लेखकाच्या विचारात दिसतो.**

चारित्र्यवान व्यक्तींचे चरित्र लेखन लिहिणे कांही नवीन नाही पण त्यातल्यात्यात सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळालेल्या भारतातील आठ गौरवान्वित व्यक्तींविषयी लेखन करणे विश्वास सरांसारख्या सिद्धहस्त लेखकालाच शक्य आहे. तारीखवार जन्म, मृत्यू, इतर सन्मान आणि असाच कागदी गोषवारा म्हणजे चरित्र नव्हेच, किंबहुना त्यापलीकडे जाऊन अतिसामान्य कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक विपन्नता, पारंपारिक बंधने, सामाजिक विरोध इत्यादी प्रतिरोधांवर मात करीत या लोकोत्तर व्यक्तींनी मळलेल्या वाटा सोडून आपल्या लक्ष्याकडे जाणारा काटेरी मार्ग कसा पादाक्रांत केला हे महत्वाचे आहे. या सर्व मुद्द्यांचे त्या त्या व्यक्तीच्या चरित्र लेखनात प्रतिबिंब असायला हवे आणि या अनुषंगाने स्फूर्तिदायक आणि प्रेरणादायी चरित्रलेखन करायला हवे. बहुतेक वेळी आपल्यास त्या व्यक्तींचा खडतर प्रवास माहित नसतो, दिसते ते फक्त त्यांच्या प्रसिद्धी आणि सन्मानाने लखलखणारे तेजःपुंज प्रकाशाचे वलय! परंतु या प्रकाशाच्या वाटा त्यांना सहज गावल्या नाहीत, तिथवर पोचायला खाचाखळग्यांनी आणि काटेरी निवडुंगांनी भरलेली वाट चालतांना त्यांचे पाय रक्तबंबाळ नक्कीच झाले असणार. या आठ सन्मानित व्यक्तींच्या याच खडतर प्रवासाचे विस्तारित चित्रण या पुस्तकाचे मुख्य वैशिष्ट्य आहे असे मला वाटते. लेखनस्वातंत्र्याचे निकष लावूनही या जगप्रसिद्ध व्यक्तींच्या प्रतिमेला कुठेही तडा जाऊ नये, मात्र त्या व्यक्तीच्या जीवनातील वादग्रस्त बाबी, गैरसमज, जनमानसात सामान्यतः रुजलेल्या कल्पना यांचाही परामर्श लेखकाने घेतलेला आहे, तेही आवश्यकता असल्यास सप्रमाण लेखन करून! माणूस जितका प्रसिद्ध तितकी त्याच्या विरोधात सामग्री उपलब्ध असणारच. यात लेखकाचा खरा कस लागतो. या आठ व्यक्तींचा कालखंड बघता हे काम लेखकाने अत्यंत हिरीरीने आणि निगुतीने केले आहे असे वाटते. प्रत्येक लेखाच्या शेवटी दिलेली संदर्भांची यादी लेखनाची पारदर्शकता दर्शवते. मात्र लेखकाने या संदर्भापलीकडे जाऊन त्या व्यक्तींच्या मनातले गूज ओळखले कसे आणि पुस्तकात चितारले कसे हा प्रश्न मला पडला! कांही ठिकणी तर आपण त्या व्यक्तीची प्रकट मुलाखतच बघतोय असे जाणवत होते. ही लेखकाची कल्पनेची भरारी नसून, हे अत्यंत मेहनतीने, विचारपूर्वक आणि मुद्देसूद लिहिलेले रसाळ वाङ्मय आहे. आजवर भारतरत्न या पुरस्काराने सन्मानित ४८ व्यक्तींमधून नेमक्या त्याच आठ व्यक्ती कां निवडल्या याचे उत्तर लेखकाने देणे मला तरी अपेक्षित नाही, मात्र ज्या व्यक्ती त्यांनी निवडल्या, त्यांच्या चरित्रलेखनात त्यांनी यत्किंचितही कुसूर केला नाही, उलट याच व्यक्ती कां, याचे उत्तर त्यांचे चरित्र वाचूनच सापडते. लेखकाच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा मुद्दा आहेच, पण माझे मत आहे की भविष्यात सरांनी टप्प्याटप्प्याने या सर्वांचेच व्यक्तिचित्रण लिहावे आणि अष्टदीप या पुस्तकाच्या मालिका लिहाव्यात.

या पुस्तकात जी अष्टरत्ने आहेत त्यांची नांवेच किती आदरणीय आहेत बघा. मंडळी, त्यांच्या नावाआधी लागलेली बिरुदावली आणि अर्थवाही शब्द (अनुक्रमणिकेत आहेत तसेच) म्हणजे त्यांच्या नांवासोबत असलेली अविभाज्य मानाची पदवी आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाची अति संक्षिप्त रूपरेखा समजावी. निश्चयाचा महामेरू महर्षी धोंडो केशव कर्वे, द्रष्टा अभियंता सर विश्वेश्वरैया, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल, द्रष्टा उद्योगपती जे. आर. डी. टाटा, निर्मळ चारित्र्याचे धनी (साधी राहणी, उच्च विचारसरणी असलेला नेता) लालबहादूर शास्त्री, अजातशत्रू नेता अटलबिहारी बाजपेयी, आनंदघन लता मंगेशकर आणि उज्ज्वल भारताचे स्वप्न पाहणारा द्रष्टा वैज्ञानिक डॉ. अब्दुल कलाम.

या आठही व्यक्तींमधील मला जाणवलेला समसमान गुण म्हणजे देशभक्ती, आपल्या भारतभूमीला सर्वस्व वाहून टाकायची जबरदस्त उर्मी! त्यासाठी कितीही कष्ट, वेदना, मेहनत आणि जिवापाड प्रयत्न करण्याची दुर्दम्य आकांक्षा. ‘भारत माझा देश आहे, त्यासाठी मी हे करणार आणि ते करणार’ या वल्गना करणाऱ्या आजच्या वाचाळवीरांच्या पार्श्वभूमीवर, या व्यक्तींचे बावनकशी सोन्याहून पिवळे असे व्यक्तिमत्व उजळून दिसते. त्या लखलखीत प्रकाशात न्हाऊन निघण्याचा आणि नवचैतन्याने बहरून येण्याचा अनन्यसाधारण अनुभव घ्यायचा असेल तर हे पुस्तक आधी वाचावे, नंतर त्याचे मनन आणि चिंतन करून




या व्यक्तींचे विचार प्रत्यक्षात जगणे, या पायऱ्या जमेल तशा आणि जमेल तितक्या चढाव्या! असे केल्यास लेखकाच्या या चरित्रलेखनाला न्याय मिळेल असे मला वाटते.

प्रत्येक व्यक्तीची शिकवण न्यारी अन निराळी, महर्षी कर्व्यांनी विधवांचे केलेले सामाजिक पुनरुत्थान व स्त्रीशिक्षणाचा रोवलेला पाया हे महाराष्ट्राच्या सीमा भेदून अखिल देशात फैलावले. सर विश्वेश्वरैयांनी निर्माण केलेली बांधकामाची आधुनिक तीर्थक्षेत्रे आजही दिमाखात उभी आहेत आणि आजच्या तकलादू बांधकामांना आव्हान देताहेत. लोहाला प्रतिष्ठा मिळवून देणारे लोहपुरुष म्हणजे भारताच्या अखंड साम्राज्याचे निर्मातेच! सत्तेचा माज आणि स्वायत्ततेचे विखारी स्वप्न बाळगणारे आणि भारताचा लचका तोडायच्या हेतूने आटोकाट स्वार्थी प्रयत्न करणारे तब्बल ५६५ संस्थानिक एका छत्राखाली आणणारे एकमेव सरदारांचेही सरदार वल्लभभाई पटेल! ऐश्वर्यसंपन्न असूनही निरलस आणि निरभिमानी, समाजकार्यात नंबर एक असे जे. आर. डी. टाटा, बस नाम ही काफी है, असा ब्रँड! साधी राहणी आणि उच्च विचारांचे धनी, आजच्या जगातल्या राजकारण्यांच्या संदर्भात आणि चौकटीत न बसणारे असे एकमेव पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, सर्वपक्षीयांची निष्ठा अन आदर ज्यांना प्राप्त होता असे कविमनाचे हळवे पण तितकेच खंबीर पंतप्रधान अटलजी, वेगळ्या जडणघडणीतले सर्वप्रिय वैज्ञानिक अब्दुल कलाम यांसारख्या रत्नांचे चरित्रलेखन या पुस्तकात केलेले आहे. शेवटी अति आदराने उल्लेख करते तिचा, जी आहे आपल्या सर्वांची लाडकी स्वरमाऊली लता मंगेशकर! तिचे चरित्र वाचावे, तिची स्वर्गीय गाणी ऐकावी हे ठीक, पण ती 'लता' म्हणून घडली कशी याचे सांगोपांग वर्णन म्हणजे या पुस्तकाचा मेरुमणी! माळेत जसे मोती ओवतात आणि शेवटी मध्यभागी जसे रत्नजडित पदक जोडतात, तद्वतच लेखकाने या पुस्तकात लता दीदींची प्रदीर्घ कारकीर्द वर्णन केली आहे. यात जणू भारतीय सिनेसंगीताचाच सांगीतिक प्रवास आपण करतोय असे वाटते. लेखकाची संगीताची उत्तम जाण आणि लतादीदींवरील अपार भक्ती या भागात अधोरेखित झाली आहे. हा पुस्तकाचा सर्वात मोठा भाग आहे. माझ्यासारख्या लताभक्त आणि संगीतप्रेमींसाठी ही खास पर्वणीच आहे. मित्रांनो, लेखकाने या आठ व्यक्तिरेखांचा शोध घेता घेता आदर्श विचारांचे लक्ष लक्ष दीप उजळून टाकलेत, असा अनुपमेय अनुभव मला हे पुस्तक वाचतांना आला. या दिव्य प्रकाशमय वाटेवर आयुष्याची वाटचाल नक्कीच प्रेरणादायी होईल असे वाटते. विश्वकर्मा पब्लिकेशन यांनी जुलै २०२२ मध्ये प्रकाशित केलेले हे पुस्तक संग्रही ठेवावे आणि इतरांना देखील वाचायला प्रेरित करावे असे मी आवाहन करते.

**डॉ. मीना श्रीवास्तव**
**ठाणे नं. ९९२०१६७२११**


# विद्यार्थी घडवताना...

आधुनिक केसरी

**मुले खेळत असताना त्यांचे नीट निरीक्षण केले तर आपल्याला लक्षात येईल की, उच्च विचारप्रक्रिया मुलं सहजपणे करीत असतात. बोलताना मात्र मुलं लाजतात, घाबरतात. अनेकदा त्यांच्या मनात काय चालू आहे हे सांगण्याचा प्रयत्न करतात पण मोकळेपणानं व्यक्त होत नाहीत. मुलांच्या मनातील विचारांची गुंतागुंत बोलता-बोलता उलगडत जाते खरी, पण नेमक्या शब्दात त्यांना बोलता येत नाही. जगताना आपल्याला बोलणे हरघडी उपयोगी पडते. बोलूनच आपल्या मनातील भावना व्यक्त करता येतात. 'बोलणे' हे शिक्षणाचे प्रमुख साधन आहे. दिवसभर घडलेल्या घटना, अनुभवलेले प्रसंग त्यांच्या बोलण्यातून स्थिर व पक्के होत असतात. मुलं एकमेकांशी बोलत असताना एकमेकांना समजूनही घेतात, खुलुन बोलतात पण तेच मोठ्या माणसांशी, आपल्या गुरुजींशी बोलताना बोलणं राखून ठेवतात. यासाठी 'संवाद' होणं फार महत्त्वाचा आहे. संवादामध्ये एकाने बोलणे, दुसऱ्याने समजून ऐकणे आणि प्रतिसाद देणे इथे बोलण्याचे एक आवर्तन पूर्ण होते. पण कधीकधी हे कामापुरतं होतं. संवादामध्ये केवळ बोलणे अभिप्रेत नसून ऐकून घेणे आणि प्रतिसाद देणे हे अपेक्षित असते. गुरुजी-मुलं, मुलं-मुलं यांच्या बोलण्यातील समजपूर्वक भावना एकमेकांपर्यंत पोहोचल्या तर 'ह्या हृदयीचे त्या हृदयी'पोहोचले असे म्हणता येईल. शिकण्याच्या प्रक्रियेत 'संवादाला' अनन्यसाधारण महत्त्व आहे किंबहुना संवाद नसेल तर खरे शिकणे घडणारच नाही. वर्गात संवाद हवा. संवादातूनचं खूप मोकळी होतात मुलं.**

वर्ग पहिलीत प्रवेशित झालेल्या नव्या मुलांसोबतचा संवादसेतू मला कसा उभारत आला त्याविषयी...

काही दिवस एकमेकांसोबत खेळून मुलांची एकमेकासोबत चांगली मैत्री झाली होती. एकमेकांसोबत ते आता चांगल्या पद्धतीने संवाद साधू लागले होते. माझ्या व मुलांच्या संवादांमध्ये एक महत्त्वपूर्ण अडचण म्हणजे मुलांची भाषा. मुलं आपल्या आईची भाषा (बंजारा) बोलत होते. यापूर्वी मी मोठ्या मुलांसोबत संवाद साधलेला असल्यामुळे मला त्यांच बोलणं लक्षात येत होतं. पण मी मराठीतून बोललेलं त्यांना लक्षात यायचं नाही. मला एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगावी लागायची. त्यामुळे आमचा हा संवाद अपुराच राहायचा. मुलांच्या आणि माझ्याभाषेतील फरकामुळे मुलं संभ्रमात पडायची अधून मधून मी त्यांच्या बोलीभाषेतील शब्द, वाक्य बोलले की ती लगेच ऐकायची. आपली बोलीभाषा मुलांना जवळची वाटायची. हे लक्षात आलं आणि एक युक्ती सुचली. आपणच मुलांची भाषा शिकायची आणि सुरू झालं माझंही शिकणं. माझ्या शाळेतील मोठ्या वर्गातील गणपत, रेश्मा, शुभम, जया आदी मुलं माझे गुरुजी झाले. या मुलांकडून मी वर्गात दररोज बोलण्यास आवश्यक असलेली वाक्य बंजारा भाषेतुन लिहून घेऊ लागलो. मुलांशी बोलताना त्याच वाक्यांचा वापर करू लागलो. आणि नवलंच घडलं. मुलं उत्तम प्रतिसाद देऊ लागले. पण मोजक्याच वाक्यांचा वापर दिवसभर करणं अवघड जाऊ लागलं. दररोज मुलांकडून एका वहीमध्ये उद्या मला काय बोलायचं हे मी त्यांना मराठीत सांगायचं आणि मोठ्या वर्गातील मुलांनी ते बंजारा भाषेमध्ये असलेलं मला मराठीत लिहून द्यायचं. दुसऱ्या दिवशी तेच वाक्य मी वाचून मुलांसोबत संवाद साधायचा. भाषेतील मातृत्व मुलांना आकर्षित करायचंत्यामुळे मुलं अगदी माझ्या जवळ येऊ लागली आणि बोलता बोलता मी हळूहळू त्यांना मराठीतही बोलण्याचा प्रयत्न करू लागलो. खरंच किती ताकद असते मायबोलीत! जी परक्यालाही आपलंसं करते! अशा पद्धतीने 'संवादाचा सेतू' उभारणीचं काम मूळ धरू लागलं. एकदा अचानक मला दोन-तीन दिवस प्रशिक्षणासाठी बाहेर जावं लागलं. त्यामुळे मी शाळेत आलो नाही. शाळेत परत आल्यानंतर वर्गात प्रवेश करताच कल्याणी समोर आली आणि म्हणाली,



"मास्तर, तू दोन दिवस शाळेत का आला नाहीस?, आम्हाला अजिबात करमल नाही." लगेचच इतरही मुलं म्हणू लागले, गुरुजी, "तू दोन दिवस का आला नाहीस? तू कुठे गेला होतास? आम्हाला पण करमल नाही..." हे ऐकून मी स्तब्ध झालो. आणि या लेकरांकडेच पहात राहिलो. माझा माझ्या कानांवर विश्वासच बसेना. माझ्या मनातील गुरुजी ओला चिंब झाला. एक तर हे चिमुकले माझ्याशी अगदी हक्कानं बोलू लागली होती आणि दुसरी गोष्ट म्हणजे मी न येण्यामुळे यांना करमत नव्हतं. हे यांनी प्रामाणिकपणे मला सांगून टाकलं होतं. आपली कुणाला तरी खरंच किती गरज आहे, आपली कुणीतरी आतुरतेने वाट पाहतं यापेक्षा आणखी काय हवं ! मी माझ्या या लेकरांच्या मनातील एक प्रेमाचा कोपरा जिंकला होता...


संवादाचा सेतू उत्तमपणे बांधला जात होता. लहान मुलं खरं तर कुणालाही सहजासहजी स्वीकारत नाहीत; पण मला त्यांनी स्वीकारलं होत. कल्याणी आणि मुलांच्या प्रश्नांना नेमके काय उत्तर द्यावं हे ही मला सूचेना... मी त्यांना बसायला सांगितलं आणि सविस्तर कुठे गेलो होतं ते सांगितलं. पण दोन दिवसात मी नसल्यामुळे लेकरांची माझ्याविषयीची भावना आणि माझं नसणं त्यांच्यासाठी किती उणीव आहे हे त्यांनी मला दर्शवून दिलं.

'पाच-सहा वर्षाच्या तीस-चाळीस मुलांना वात्सल्याने गुंफून ठेवणं ही शिक्षकी पेशातील सर्वात अवघड गोष्ट आहे' परंतु तीच अवघड गोष्ट आता माझ्यासाठी फार सोपी झाली होती मुलं आता माझी झाली होती अन, मी मुलांचा झालो होतो. संवादाचे दोन तट आता एकत्रित आले होते. भाषेतील व नात्यातील दुरावा आता संपला होता. 'मुलांत कार्य करायचं म्हणजे मुलांच्या आई-बाबाप्रमाणे विश्वास निर्माण करायला पाहिजे'. असा विश्वास मी कल्याणी, अर्जुन, करण, कार्तिक, प्रतीक, रेश्मा, ममता, पायल, नम्रता, इंद्रजीत, यश, शितल आदी सर्व मुलांमध्ये निर्माण केला होता. आता दररोज वर्गात आल्याबरोबर पहिला तास हा 'संवादाचा' तास ठरू लागला. वर्गात आल्याबरोबर प्रत्येकाला मला काहीतरी सांगायचं असतं. प्रत्येकजण मला सांगण्यासाठी अगदी अतुर असतो. आल्याबरोबर पहिल्या मुलापासून ते शेवटच्या मुलाचं ऐकून घेईपर्यंत हा संवादाचा तास चालू राहतो. कुणाला त्यांच्या घरी आलेल्या पाहुण्यांची गोष्ट सांगायची असते, तर कोणाला त्यांच्या घरी गाईने पिलाला जन्म दिला आहे, कुणाच्या घरी शेळीने पिल्लू दिलं आहे ते किती गोड आहे, त्या पिल्लाचे नाव कसं आम्ही छकुली ठेवलं आहे. तर कुणी बाजारातून काहीतरी आणलेलं असतं ते मला दाखवायचं असतं, किती रुपयांना आणलं तेही सांगायचं असत. कुणाला फुलाविषयी तर, कुणाला गावातल्या भांडणाविषयी सांगायचं असत. कुणाला नवीन घेतलेल्या कपड्या विषयी तर कुणाला गावात लांडगा आला व शेळी उचलून घेऊन गेला असं कितीतरी प्रत्येकाला सांगायचं असतं आणि हे सर्वजण मला सांगत असतात. यावेळी इतरही हे सर्व ऐकायलेले असतात. यातून संवादाच्या सेतूची एक एक दोर आपोआप गुंफत जात होती. 'आपलंही कुणीतरी ऐकून घेणार आहे, आम्हालाही कुणीतरी समजून घेतंय ही त्यांची खूप मोठी भावना मी समजून घेतली होती." आणि प्रत्येक मुलाचं बोलणं ऐकून घेऊन त्याच्याशी संवाद साधत होतो. दररोज सकाळी पहिल्या तासिकेत मी श्रोत्याच्या भूमिकेत असतो. त्यामुळेच या लेकरांना आपला गुरुजी म्हणजे एक 'हक्काचं अभिव्यक्तीपीठ' आहे याचयी खात्री पटली होती. कुठलीही गोष्ट आपल्याला सांगता येईल आणि ते सांगता येण्याचं एकमेव विश्वासाचे ठिकाण म्हणजे आपले गुरुजी आहेत असं त्यांना वाटू लागलं. मुलाचं मोकळं होण्याचं ठिकाण मला होता आलं. या मुलांच्या डोक्यातील अनेक सर्जनशील, अफाट कल्पना ऐकून पुन्हा एकदा मी बालपनात येऊन मी माझं बालपण जगतोय किंबहुना त्यापेक्षा आणखी खूप मोठा 'आनंदाचा सोहळा' उपभोगतोय असंच मला वाटतंय. मुलांचं आपलं एक वेगळं विश्व असतं आणि त्या विश्वातील गोष्टीचं मन भरून आनंद घेण्याचे भाग्य फक्त गुरुजीला लाभला आहे.' प्रत्येक मुलाबरोबर एकदा तरी वैयक्तिक बोलणं महत्त्वाचं आणि गरजेचं असतं. 'शिक्षकांशी बोलताना मुलांनी स्वतः बद्दल सांगाव. त्यांची आवड-नावड, इच्छा, त्यांच्या कुटुंबाविषयी व इतरही अशा अनेक गोष्टी मुलांनी मोकळेपणाने सांगाव्यात. तेव्हाच आपण प्रत्येक मूल जिंकू आणि असं प्रत्येक जिंकलेलं मूल संवादाच्या सेतूवर मनातील अभिव्यक्ती उत्तमपणे मांडू शकेल. संवाद हा फक्त दुसऱ्या व्यक्तीशी होत नाही, तर पुस्तकांशी, अनुभवांच्या दृश्यांची, चित्रांशी मनातल्या मी स्वतः शी होत असतो. आपला आपल्याशी होणारा संवाद हा जेवढा समृद्ध आणि प्रमाणिक तितका इतरांशी होणारा संवाद परिणामकारत असू शकतो. संवाद साधणारी मनं तयार करता आली पाहिजेत. आपल्याला मुलं कळली पाहिजे. त्यासाठी संवाद महत्वाचा असतो. आणि 'चांगला संवाद करू शकणे' ही अतिशय उत्तम क्षमता आहे. जी अनेक क्षमतांच्या समनव्यातुन संवाद क्षमता तयार होते. गुरुजी आणि मुलांत संवादाचा सेतू उभा राहिल्यास प्रत्येक मुलं शिकण्याचा आनंदायी प्रवास उत्तम करू शकतो.

एका ठिकाणी प्रवीण दवणे म्हणतात, "मुलांच्या प्रभातकाळी जिला मुलांची दुपार कळते ती आई, तोच गुरु.."

**युवराज माने**
**जि.प.प्रा. शाळा, पारडी**
**ता.सेलू जि. परभणी**

# स्वातंत्र्याची ७५ वर्षे; पुढे काय ?



डॉ. श्रीनिवास खांदेवाले
संपर्क क्र. ७४४७५६१५४४

आधुनिक केसरी

**१५ ऑगस्ट १९४७ रोजी हा देश स्वतंत्र झाला. आज आपण आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. अनेकांच्या बलिदानाने आणि त्यागाने हे स्वातंत्र्य मिळाले. अथक परिश्रमानंतर आपण जगाच्या नकाशावर आज ताठ मानेने उभे आहोत. अनेक संकटे आली आणि गेली पण हा देश या देशाचे स्वातंत्र्य आणि लोकशाही अबाधित आहे. विकासाचे अनेक टप्पे आपण पार केले आहेत. पुढे अनेक आयाम आहेत. अनेक संकटे आपल्यासमोर आ वासून उभी आहेत. या सर्वांवर आपण मात करू. भारतीय स्वातंत्र्यदिन चिरायू होवो. जय हिंद....!**

सुमारे १५० वर्षांच्या ब्रिटिश साम्राज्यातील गुलामीनंतर देश १९४७ मध्ये स्वतंत्र झाला. यंदा या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जात आहे. अशा प्रसंगी साहजिकच एक प्रश्न निर्माण होतो तो असा की स्वातंत्र्य मिळण्याच्यापूर्वी जो शोषित समाज होता. त्याच्या आकांक्षा काय होत्या. त्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण काय काय करू शकलो, काय काय करू शकलो नाही आणि भविष्यात आपण काय करू इच्छितो याचा आढावा घेणे अपिहार्य आहे. आज लोक ज्या स्थितीत जगत आहेत त्यांचे मुख्य प्रश्न कोणते आणि नंतरच्या पिढ्यांना आपण समस्यामुक्त जीवन देऊ शकतो की नाही आणि ते कसे द्यावे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. सर्वांत आधी एक गोष्ट अधोरेखित होणे आवश्यक आहे की, आर्थिक, राजकीय, सामाजिक प्रश्न हे मानव निर्मितीतच आहेत ते सोडविण्याची जबाबदारी त्या समाजाची आहे. प्रश्न एवढाच आहे आपण ते प्रश्न स्पष्टपणे मांडतो की नाही आणि ते सोडविण्याची क्षमता निर्माण करतो की नाही.

**१५० वर्षे शोषणाची**

इंग्लंडमध्ये आणि युरोपमध्ये १७५० च्या आसपासची औद्योगिक क्रांती निर्माण झाली. तिने संथगती उत्पादनाच्या ऐवजी यंत्रगतीने उत्पादन वाढविण्याची किमया आणि क्षमता प्राप्त केली.
त्याचा परिणाम असा झाला की तेवढ्याच वेगाने चालणाऱ्या औद्योगिकरणाला एकीकडे भांडवल, दुसरीकडे त्या वेगाने उत्पादनाची संसाधने उपलब्ध करून तिसरीकडे त्याच वेगाने उत्पादित वस्तू देशात किंवा जगात विकणे श्रृंखला निर्माण झाली. ज्या श्रृंखलेवर इंग्लंड व युरोपमध्ये आजही दिसणारी सुबत्ता नफ्याच्या रूपात कमावली गेली. त्या सुबत्तेचे ओझे ब्रिटिश समाजावर कमी आणि त्यांनी हस्तगत केलेल्या साम्राज्यातील लोकांवर अधिक होते. उदाहरणार्थ सतत तांत्रिक प्रगती करून उत्पादनाचा वेग वाढविण्यात प्रगती म्हटले गेले. इतक्या वेगाने सर्व जगातून उत्पादनाची संसाधने मिळविण्यात कार्यक्षमता म्हटले गेले आणि त्यातून ब्रिटीश आणि युरोपीयांमध्ये जगातील संपत्ती ओढून आणण्याला विकासातील अंतिम उद्दिष्ट मानले गेले. त्याचा एक अंश भारतात चालण्यासाठी त्यांनी येथून विदर्भाच्या कापसासोबत उत्पादनाची साधने नेली आणि तेथे त्यापासूनच पक्का माल तयार करून वसाहती देशांनाच नफ्याने विकला. या सगळ्या गोष्टी करता त्यांना भारतात सध्या वेगवान रेल्वे असावी, कृषी संशोधन असावे, आयात निर्माण करण्यासाठी चांगली जहाजे असावी, या सगळया व्यवहारांना पूर्ण करण्याकरता बँकिंग, विमा व्यवस्था असावी आणि हे सगळे चक्र चालविण्यासाठी इंग्रजी भाषेतून ज्ञान घेणारा श्रमिक प्रशासक वर्ग असावा हे साहजिकच होते तेच घडले. यालाच त्यांनी भारताची प्रगती म्हटले आणि भारतातल्या एका मोठ्या लोकसंख्या गटाने हे मान्यही केले परंतु अंतिमतः निर्माण झालेल्या संपत्तीचे समाजातील कोणत्या लोकसंख्या गटाला किती हिस्सा मिळतो यावरून त्या देशात निर्माण झालेल्या परिस्थितीचे आकलन होते. ते आकलन असे की, पूर्वीचे औद्योगिकरण बंद पाडून ब्रिटिशांच्या उद्योगांना सेवा देणारे औद्योगिकरण निर्माण करणे, त्यांना हव्या त्या शेती पिकांना प्राधान्य देणे आणि औद्योगिकरण न करता प्रशासकीय शैक्षणिक प्रणालीना प्राधान्य मिळणे हे १५० वर्षे घडतच गेले. परंतू त्याच बरोबर स्वयं निर्णय आणि स्वातंत्र्य मागणारे लोक, पक्ष, संघटना हे ब्रिटिश साम्राज्याला सतत विरोध करीत राहिले आणि शस्त्रधारी विरोध शक्य नसल्याने अहिंसेचा आधारावर लढत राहिले. हे त्या काळाचे वैशिष्ट्ये आहे. १९१४-१८ च्या प्रथम ज्या विभूती येतात. प्रथम ब्रिटनने भारतातील कारखाने युद्ध आणि युद्धेतर सामग्री निर्माण करण्यासाठी वापरले आणि जनतेला सैनिक म्हणून वापरले. याचाच संताप म्हणून स्वातंत्र्याची मागणी अधिक धारधार झाली आणि त्याची पहिली पायरी म्हणून १९३५ चा भारत सरकार कायदा पारित करून प्रादेशिक पातळीवर लोकांनी निवडलेली सरकारे आणि त्यांना स्वायतत्ता ही पायरी गाठली गेली. दुसरे महायुद्ध १९३९ मध्ये सुरू झाले आणि त्यात भारताला ब्रिटनने संमती शिवाय आपल्यासोबत ओढले म्हणून भारतीय लोकांनी भारतीय नवदलानेसुद्धा स्वातंत्र्याचा उद्घोष चालूच ठेवला. सरकारच्या दडपशाही धोरणाचा विरोध म्हणून १९४२ मध्ये भारतीय जनतेने ब्रिटिशांना (चले जावे) असे ही सांगितले. (१९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपले तोपर्यंत भारतीय जनतेचा असहकार आणि संघर्ष इतर वसाहती देशांसोबतच) इतका वाढला होता की ब्रिटीश सरकारला आपण या प्रसंगी चालवू शकणार नाही असे कळून चुकले होते आणि म्हणून त्यांनी



भारताला स्वातंत्र्य देण्याची प्रक्रिया सुरू केली.

**स्वातंत्र्यानंतर ही ५० वर्षे (नवे आर्थिक धोरण)**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जी महत्त्वाची आर्थिक सामाजिक प्रश्न देशात होते ते असे १) देशाच्या धार्मिक आधारावर झालेल्या फाळणीमुळे देशात निर्माण झालेली अशांतता. २) धार्मिक असहिष्णुता आणि पाकिस्तानातून येणाऱ्या लोंढ्यांचे भारतात पुनर्वसन कसे करायचे आणि देशाच्या विकासाचे चक्र जनतेपुढे ठेवलेल्या मानचित्रानुसार सुरू करणे शोषिक भारताने १५० वर्षे किंवा अधिक स्वातंत्र्य अनुभवले नसल्यामुळे त्यातून निर्माण होणारा समाज कसा असेल त्यासाठी आमलात स्वतःमध्ये काय बदल घडवून आणावा लागेल याचे चित्र धुसर किंवा अस्पष्ट होते. मात्र लोकांच्या मनात आशा आकांक्षा होत्या, की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इथे भारत निर्माण होईल. (उदाहरणार्थ प्रस्तुत लेखक तालुक्याच्या गावी राहात असताना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सगळे काही छान छान होईल असे ऐकत आल्यामुळे १४ ऑगस्टच्या रात्री स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १५ ऑगस्टला हेच धुळीचे रस्ते हिच मातीची घरे हेच पाहून प्रस्तृत लेखकही पालकांना विचारू लागला. स्वातंत्र्याचे काय झाले आणि अनुभव नसल्यामुळे पालकही हेच सांगू शकत होते की आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. परंतु वैचारिक पातळीवर आणि देश पातळीवर भविष्यातला पुढील विकास मार्ग ठरविणाऱ्या दृष्टीने दोन मानचित्रे होती. एक रशिया मधील १९१७ च्या राज्यक्रांतीसमोर नंतर स्वयंनिर्णयाला तत्त्वावरती जो विकास झाला व देशातील संपत्ती देशातील लोकांसाठीच उपयोगात आणली जाऊ लागली तेव्हा सामान्य जनतेला शिक्षण, आरोग्य व्यवस्था, घरे आणि नवीन औद्योगिक रोजगार यांच्यामुळे ज्या प्रकारचे श्रेष्ठ बनविण्यात आले ते पाहून जगातील सर्व लोक आणि भारतातील तत्कालीन मातृत्व नेतृत्वसुद्धा प्रभावित झाले होते आणि त्यातून पंचवार्षिक योजना राबवून मुख्यतः सार्वजनिक क्षेत्राच्या आधारे आश्वासित आर्थिक विकास घडवून आणणे असे एक समाजवादाचे चित्र होते. दुसरे चित्र गांधीजीच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पना आणि त्यावर आधारित विकास असे चित्र उपलब्ध होते. त्यापैकी कोणते चित्र निवडावे हा प्रश्नही समाजापुढे होता. परंतु दारिद्र्याने पिडलेल्या बहुसंख्य जनतेच्या आकांक्षाला भिडलेल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी मोठे, मध्यम व लहान उद्योग स्थापन करून, वस्तु उत्पादन वाढवून लोकांना समाधानकारक रोजगार आणि आर्थिक जीवन मिळविण्याचा दृष्टीने समाजवादी मानचित्र निवडले गेले. परंतु खाजगीक्षेत्र पूर्णपणे नष्ट न करता सार्वजनिक क्षेत्राला प्रधान भूमिका आणि खाजगी क्षेत्राला दुय्यम भूमिका अशी मिश्र धोरण प्रगती अमलात आणली गेली. ती प्रणाली १९९२, ९३ मध्ये बदलली गेली व त्या जागी पगारावर आधारीत धोरण प्रणाली आणली गेली आणि आता 'नवे आर्थिक धोरण' असे म्हटले गेले. त्यात नवीन काय होते. असे विचारल्यास विकासाचा समाजवादी आश्रय जावून पगारावर अवलंबून विकास यातील फरक, असे म्हणावे लागेल. मधल्या समाजवादी धोरणाच्या काळात पाकिस्तान बरोबर लढली गेलेली दोन युद्धे, चीन बरोबर लढले गेलेले एक युद्ध, आवर्षणासारख्या नैसगिक आपत्ती आणि काही राजकीय पक्षांच्या समाजवादाला विरोध यांचा परिणाम म्हणून १९८०-९० या काळात अर्थव्यवस्थेकडे पूर्ण दुर्लक्ष होऊन नेहमी आयात केल्या जाणाऱ्या मालाची विदेशी चलनातील किंमत देणे सुद्धा कठीण झाले आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीकडे विदेशी चलनातील कर्ज मागितल्याबरोबर (युरोप अमेरिकेचे प्राबल्य असलेल्या संस्थेकडून) १९९१-१९९२ नंतर सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व कमी करून बाजार आणि खाजगी क्षेत्र याला प्राधान्य देणारी आर्थिक प्रणाली स्वीकारावी लागली. त्यामुळे समाजवादी आर्थिक धोरणाचे, विस्तृत जनक कल्याण आश्वासित विकास आणि उत्पन्नातील विषमतांवर नियंत्रण या काळातून भारतीय समाज बाहेर पडला. १९९५ मध्ये जागतिक मुक्त व्यापाराचा करार पारित होऊन (गॅट करार) भारतात संमिलीत होऊन १९९७ च्या आसपास (समाजवादी आशयाची ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतर) तेव्हापासून भारतीय अर्थव्यवस्थाही जागतिक अर्थव्यवस्थेचा भाग बनली आणि 'अधिक जागतिकीकरणाच्या प्रश्नांवर उपाय' अशा युगामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेने प्रवेश केला.

(१९९२-२०२२) जागतिकीकरणाची ३० वर्षे १९९२ च्या मुक्त व्यापार आणि मुक्त अर्थव्यवस्था ही स्वीकारताना असे सांगितले गेले होते की त्यापासून पूर्ण रोजगार ते उत्पादन वाढ, उत्पन्न वाढ यांचे फायदे देशातील सर्व जनतेला मिळतील. याचा आढावा १९९२ ते २०२२ या काळा करता घेतल्यास असे दिसून येते की, अनियंत्रित उत्पादन व्यवस्था निश्चितपणे काही लोकांना उत्पादन वाढ करण्यास प्रोत्साहन देते. त्यातून काही रोजगार निर्माण होतो. परंतु १९९२ च्या आधीची नियोजनाची अर्थव्यवस्था आणि त्याचे रोजगार उत्पन्न हे फायदे वगळले तर फक्त फायदे आज किती आहेत हे पाहिले तर कदाचित चिंता वाटू लागते. देशाची आयात निर्यात वाढली परंतु नियमित आयात देणे जास्त राहिली आणि नियतीच्या रूपाने घेणे कमी राहिले आणि विदेश व्यापाऱ्यात नेहमीच तूट राहिली. निर्यात करण्यासाठी सुद्धा आयात वाढवावी लागली. रोजगार हा सतत कमी जास्त होत राहिला आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप हे बाजारातील आर्थिक शक्तीवर सोडून दिल्यामुळे बाजारातील आर्थिक शक्तीवर गेल्या ३० वर्षात उत्पन्न विषमता केवळ वाढत राहिली असेच नव्हे तर भारतातील विषमता जगातल्या अनेक गरीब व श्रीमंत देशातल्या लोकांपेक्षा जास्त आहेत व त्याकडे लोकांचे लक्ष व नियंत्रण नाही असे स्पष्ट दिसत आहे. १९९२ च्या आधी देशातच औद्योगिकरण वाढवावे म्हणून आत्मनिर्भरता हे तत्त्व स्वीकारून गेले होते आणि त्यामुळे मोठ्या उद्योगांच्या यांत्रिकी - तांत्रिकी गरजा पूर्ण करण्यासाठी देशातील तरुणांचे कारखाने निघू लागले होते. (पुणे येथील पिंपरी चिंचवड ते औद्योगिकीकरण याला साक्ष आहे.) परंतू १९९२-९३ नंतर सर्वच विदेशी यंत्र तंत्राना मुक्त प्रवेश निर्माण झाल्या बरोबर त्यांच्या कमी किंमतीमुळे देशातील छोटे व मध्यम उद्योग गडगडले व आजही सुक्षम-लघू - मध्यम उद्योग देशापुढील आर्थिक संकट बनले आहे. आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या २०२२ च्या वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक या अहवालानुसार (जानेवारी-डिसेंबर २०२२ कॅलेंडरनुसार) करता. जागतिक उत्पादनाला दर ०.४ टक्केनी कमी होईल असे म्हटले आहे. निश्चितपणे या जागतिक बदलांचा प्रभाव भारतीय निर्यात आणि उद्योग यावर पडेलच परंतू सामान्य माणसाचा रोजगार आणि त्याचे उत्पन्न हे सुद्धा प्रमाणात होईल हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या अर्थाने जगातील तिसऱ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था जागतिकीकरणाचा खुंट्याला बांधली आहे व त्यात गुरफटते आहे असे दिसते. मात्र अमेरिका व युरोपच्या अनेक देशांनी मुक्त जागतिकीकरण त्यांचाकरता हिताचे नाही म्हणून त्यातून माघार घेतली आहे व आपापल्या सोयींप्रमाणे जागतिक व्यापार संघटनेला ओढून द्विपक्षीय किंवा छोटे गटांचे व्यापार करात करीत आहे. त्यातून प्रश्न असा उद्भवतो की स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी सुद्धा भारताचे आर्थिक धोरण काय असावे हे आपण निश्चित करू शकलो नाही. त्यातही मर्यादित जमीन आणि अतिरिक्त लोकसंख्या यांच्या विकासाचे नवीन प्रारूप (मॉडेल) तयार करण्याऐवजी भारत कदाचित आंधळेपणाने भरपूर जमीन व मर्यादित लोकसंख्या असलेल्या देशांचे आर्थिक प्रारूप राबवत आहेत असे दिसते.

भारतातील वित्तीय नियोजनाची अवस्था काय आहे. याचे एक ठळक उदाहरण पाहिले तर ते मोठ्या उद्योजकांची कर्जे (माप ही नाही) निर लेखित करीत आहे. आणि सामान्य माणूस रोजच्या जगण्यासाठी धडपडत आहे. ही विडंबना आपण पाहात आहोत. दि. २ ऑगस्ट २०२२ रोजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी राज्यसभेत अशी माहिती दिली की, प्रस्थापित सरकारने गेल्या ५ वर्षात सुमारे १० लाख कोटी रुपयांची कर्ज निर्देशित केली आहे. त्याचा तपशील असा.

**रुपये लाख कोटीमध्ये**


**२०१७-१८ - १.६१**
**२०१८-१९ - २.३६**
**२०१९-२० - २.३४**
**२०२०-२१ - २.०३**
**२०२१-२२ - ३.५७**

यांनी असेही सांगितले की २०१८-१९ पासून हेतु पुरस्पर कर्ज बुडविणाऱ्यांची माहिती राखून ठेवण्यात आली आहे आणि चार वर्षात अशा कर्ज बुडव्यांची संख्या १०३०७ पोहोचली आहे. ही सगळी कर्जे सार्वजनिक क्षेत्रातील बँकेकडून मोठ्या उद्योकांनी घेतलेली कर्जे आहे. म्हणजेच ही कर्जे जनतेच्या ठेवींमधून बँकेद्वारा मोठ्या उद्योजकांना दिली गेली. अंतिमतः हा सगळा तोटा बँकांचा म्हटला तरी सर्वसामान्य जनतेचा झाला आहे, अशी सामान्य लोकांच्या पैशाची उधळपट्टी, स्वातंत्र्याची ७५ वर्षे कोणाची आहे, हे आपल्याला स्पष्ट दर्शवित होते. मात्र नवनवे तंत्रज्ञान अधिक स्वयंचलित होत आहे आणि गुंतवलेल्या भांडवलाच्या प्रमाणात रोजगार निर्माण करीत आहे म्हणून अशा अर्थव्यस्थेला घटत्या रोजगाराची अर्थव्यस्था असे म्हटले जाते.

वरील आधारावर असे दर्शवितो की, प्रचंड लोकसंख्या मर्यादित जमीन शिष्टाचार करणारी तांत्रिक व्यवस्था आणि मोठ्या उद्योजकांना दिलेले बेछूट आर्थिक स्वातंत्र्य यामधून सामान्य माणसाच्या हाती काय पडत आहे तर बेरोजगारी आणि गरीबी स्वातंत्र्यापूर्वी पाहिलेली स्वप्ने आज ७५ वर्षानंतरही स्वप्ने राहात आहेत की काय हे ही तपासून पाहणे आवश्यक आहे. पण एक गोष्ट निश्चित आहे की प्रगती करण्यासाठी समाज जेवढा सुसंगत असेल, सुजान असेल, तर्कनिष्ठ असेल तर त्याला सर्व जनतेला बरोबर घेऊन चालणारे व त्यांना आर्थिक न्याय देणारे स्वतःचे असे कालसंगत प्रारूप (मॉडेला) विकसीत करावे लागले. संविधान निर्मात्यांनी ज्या प्रकारवर भारतीय समाज कल्पित होता त्यात आर्थिक, सामाजिक न्यायाचे तत्त्वे हे प्रमुख होते. ७५ वर्षांच्या आगमनानंतर तसेच जाणवत आहे की कदाचित आपण पदभ्रष्ट झालो का? त्यासाठी देशभर गंभीर चर्चा होऊन आर्थिक सामाजिक धोरणांची दिशा पुन्हा ठरवण्याची वेळ आली आहे का हे ही तपासले पाहिजे.

असीम त्यागांनी मिळालेले स्वातंत्र्य अनेक अर्थांनी चिरायु होवो ही, शुभकामना.

**(टीप : लेखक हे नागपूर येथे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आहेत.)**




आधुनिक केसरी

# चतु:सूत्रीतून गणिताचा पाया मजबूत


**अ) गणिताची मूलभूत संकल्पना : संख्यांचे प्रकार**



श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568


12) संयुक्त संख्या : एकपेक्षा मोठ्या असणाऱ्या आणि मूळसंख्या नसणाऱ्या सर्व संख्यांना संयुक्तसंख्या म्हणतात किंवा दोन किंवा दोनपेक्षा जास्त विभाजक असणाऱ्या संख्यांना संयुक्तसंख्या म्हणतात.
उदा. 4, 6, 15, 48, 55, 36... इत्यादी.
13) अपर्णांक संख्या : एका वस्तूचे किती समानभाग केले व त्यापैकी किती भाग घेतले हे सांगणे म्हणजेच अपूर्णाक होय

<u>त्यापैकी किती भाग घेतले</u>



अपूर्णांक = एका वस्तूचे किती समान भाग केले आकृतीवरून
अपूर्णांक = अंश/छेद = 3/4
उदा. 3/2, 8/15, 25/9 .... इत्यादी.

लक्षात ठेवा : 1) आणि २ या संयुक्तसंख्या नाहीत.
2) '4' ही सर्वात लहान (सुरुवातीची) संयुक्तसंख्या आहे.
3) अपूर्णांक लिहिताना अंश आडव्या रेषेच्या वरती लिहितात.




4) अंश म्हणजे एका वस्तूचे केलेल्या समान भागापैकी किती भाग घेतले.
5) अपूर्णांकाचा छेद आडव्या रेषेच्या खाली लिहितात.

**ब) गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच :**

**प्रश्न :** रिकाम्या जागा भरा.
1) संयुक्त संख्यांना .............. विभाजक असतात?
2) ............... या संयुक्तसंख्या नाहीत?
3) .............. ही सुरुवातीची सर्वात लहान संयुक्तसंख्या आहे ?
4) अपूर्णांक = .............. असते.
5) एका वस्तूचे किती समान भाग केले हा अपूर्णांकाचा .............. असतो?

**क) उखाणा**
1) क्षेम श्ब्दाचा समानार्थी शब्द आहे हित,
'1" आणि "2" या संयुक्तसंख्या नाहीत.
2) जरब शब्दाचा समानार्थी शब्द आहे धाक,
एका वस्तूचे किती समान भाग केले व त्यापैकी कीती भाग घेतले हे सांगणे म्हणजेच अपूर्णांक.

**ड) कविता : क्रमांक 9**

(क्रमशः)

# निसर्गाचा उत्कट अलंकार- साद निसर्गाची...



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904


आधुनिक केसरी

**जे जे मानवनिर्मित नाही त्याला आपण निसर्ग म्हणू शकतो. पाणी, हवा, अग्नी, पृथ्वी आणि आकाश ही तत्त्वे निसर्गात आढळतात. त्यांचे स्त्रोत वेगवेगळे आहेत. जसे नद्या, समुद्र, डोंगर, जमीन, सूर्य, झाडे जे जे आपल्याला आसपास डोळ्यांनी दिसते आणि दिसत नाही त्या सर्वांचा मिळून निसर्ग तयार होतो. अशी एक व्याप्त व्याख्या निसर्गाची करता येईल.आता मानवी जीवन आणि निसर्ग यांचा संबंध आपण पाहूया. निसर्गात वेगवेगळे ऋतु असतात, त्यानुसार आपल्या शेजारील वातावरण आणि हवामान बदलत असते. पाऊस पडतो, ऊन असते, थंडी जाणवते हे सर्व बदल जगण्यासाठी आवश्यकच आहेत. निसर्ग म्हणजे निखळ आनंद ! असे असले तरीही प्रत्येक टप्प्यात निसर्गात होणारे बदल अक्षरशः थक्क करुन टाकणारे असतात. आपण निसर्गातील जे वेगळेपण पाहिलेय, अनुभवलेय ते वाचकांपर्यंत पुस्तक रुपाने यावे यासाठी लेखक जितेंद्र पराडकर यांनी खऱ्या अर्थाने निसर्गाला साद घातली.**

जे.डी.पराडकर हे तीस वर्षे पत्रकारिता करतांना ठराविक कालावधी नंतर कथा, लेख लिहीण्याकडे लेखक अधिक लक्ष देवू लागले. वाचकांना नेहमीच काहीतरी वेगळं असं वाचायला देतांना निसर्गाकडे पहाण्याची लेखकाची नजर बदलली आणि त्यांनी निसर्गाच्या प्रत्येक ऋतू बदलातील बारकावे टीपले. निसर्गावर लिहीताना लेखक नेहमीच पर्यावरणाच्या होणाऱ्या ऱ्हासाकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्ग मानवाला विविध प्रकारे इशारे देत असताना माणूस मात्र सोयीस्करपणे याकडे दुर्लक्ष करत असल्याने याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. असे असले तरी निसर्गातील सर्व आनंददायी घटकांवर लेखन करावे, यासाठी लेखकाचे मन नेहमीच निसर्गाकडे धाव घेत असते. लेखन करणे आता त्यांना सरावाने खूप सोपे वाटते, मात्र हेच लेखन पुस्तक रुपाने वाचकांसमोर यावे असा अनेक वाचकांचा सातत्याने आग्रह सुरु असल्याने लेखकाने २०१४ साली "कवडसा" हा पहिला कथासंग्रह स्वतः प्रकाशित करुन छपाई आणि वितरण याचा अनुभव घेतला.

परिणामी नव्याने पुस्तक छपाई करण्याचे धाडस त्यांच्यात होत नव्हते. अखेरीस त्यांच्या लेखनाचे मनापासून कौतुक करणाऱ्या कालनिर्णयच्या जयेंद्र साळगांवकर यांनी त्यांना पुणे येथील चपराक प्रकाशनच्या घनःश्याम पाटील यांच्याकडे पाठविले. चतुरस्र, परखड, रास्त, कर्तव्यदक्ष या चार अर्थपूर्ण शब्दांच्या पहिल्या अक्षरातून घनःश्याम पाटील यांनी "चपराक" प्रकाशनची स्थापना केली. जी व्यक्ती प्रकाशनाचे नाव निवडतानाही एवढा खोलवर विचार करते, ती व्यक्ती किती चतुरस्र असेल हे लक्षात आले. बोलण्यासह स्वभावातील नम्रपणा आणि लेखकाला सन्मान देणारे प्रकाशक म्हणून घनःश्याम पाटील यांची ओळख आहे. या व्यक्तीकडे असणारा स्पष्टवक्ते पणा ही चपराकची खरी ताकद आहे. लेखकाचे नाव पाहून नव्हे तर, लेखनाचा दर्जा पाहून चपराक पुस्तक प्रकाशित करते, असे धडधडीतपणे केवळ घनःश्याम पाटीलच सांगू शकतात. आमच्यासारख्या अनेक नवोदीतांना 'चपराक' मुळे खरी ओळख मिळाली आहे.

लेखक जितेंद्र पराडकर ऊर्फ जे.डी.पराडकर यांचे लेख, कथा वाचल्यानंतर घनश्याम पाटील यांनी चपराक आपले केवळ एक नव्हे तर, पाच पुस्तके एकापाठोपाठ एक प्रकाशित करेल हा शब्द पाटील सरांनी या लेखकाला सर्वांसमोर दिला. लेखन करणाऱ्या व्यक्तीसाठी आपले सर्व साहित्य एकत्र होवून वाचकांना वाचायला मिळणार याचा खूप आनंद मोठा असतो. पुस्तकाच्या छपाईत काहीतरी नावीन्य आणणे ही चपराकची खासियत आहे. धाडसाने आजवर न झालेले प्रयोग करुन एक नवा आदर्श समोर ठेवण्यासाठी घनःश्याम पाटील सतत अस्वस्थ असतात. लेखन दर्जा मनासारखा असला की, प्रसंगी स्वतः खोट खाऊन पुस्तके प्रकाशित करणारा असा दुसरा संपादक मी पाहिला नाही. लेखकाचे निसर्गावर खास प्रेम आणि योगायोग पहा चपराक तर्फे पहिले पुस्तक निसर्ग विषयक लेखांवर आले. जी गोष्ट आपण अंतर्मनापासून करतो त्याला हा असा न्याय मिळतो, असे लेखक पराडकर आवर्जून सांगतात. पुस्तकाचे मुखपृष्ठ, नांव ठरवणे यासाठी लेखकाला पाटील सरांनी पूर्ण स्वातंत्र्य दिले. लेखकाचे स्नेही सतीश डिंगणकर यांनी पुस्तकाला "साद निसर्गाची" हे नाव सुचवले आणि निसर्ग चित्रकार मित्र विष्णू परीट यांनी या पुस्तकाचे सुंदर मुखपृष्ठ तयार केले. "साद निसर्गाची" हे निसर्ग विषयक लेखांचे जे.डी. पराडकर यांचे पुस्तक साहित्य क्षेत्रात एक वेगळा आयाम देणारे ठरत आहे. निसर्गविषयक असंख्य वाचंकांची पुस्तकाची मागणी यानिमित्ताने पूर्ण होणार आहे. चपराक प्रकाशनने 'साद निसर्गाची' या पुस्तकाची अप्रतिम मांडणी केली आहे. निसर्ग तसेच मानवी स्वभावाचे उत्तम निरीक्षण व आकलन करत जे.डीं यांचे लेख या पुस्तकाद्वारे आपल्या भेटीस आले आहेत. हे पुस्तक म्हणजे निसर्गाचा उत्कट अलंकार आहे, याच अनुभव घेण्यासाठी हे पुस्तक वाचायलाच हवे.




# दक्षिणच्या कलाकारांची हिंदी प्रेक्षकांमध्ये वाढली क्रेझ



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**दाक्षिणात्य कलाकारांच्या लोकप्रियतेचे आणि यशाचे कारण म्हणजे त्यांच्या चित्रपटांप्रती संपूर्ण समर्पणाची भावना. चित्रपटाच्या कथेसोबतच त्याची अभिनय क्षमता प्रेक्षकांना त्याच्याकडे आकर्षित करते. ज्याप्रमाणे प्रेमाला भाषा नसते, तसे सिनेमालाही भाषा नसते. चित्रपट चांगला बनवला गेला असेल तर प्रेक्षक आपोआप त्याकडे आकर्षित होतात. अलीकडच्या काळात दक्षिण भारतातील कलाकारांची लोकप्रियता उत्तर भारतात सातत्याने वाढत आहे. करण जोहरच्या 'लायगर' या चित्रपटाचा नायक विजय देवरकोंडा सध्या चांगलाच चर्चेत आहे. देवरकोंडाचा हा चित्रपट अजून रिलीज व्हायचा आहे. असे असूनही तो जिथे जातो तिथे हजारो लोक त्याला पाहण्यासाठी गर्दी करताना दिसत आहे. देवराकोंडाही त्याच्या लोकप्रियतेने थक्क झाला आहे. विजय सांगतो की तो त्याच्या दक्षिणेतील हिट चित्रपटांमुळे हिंदी प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय आहे. हिंदी भाषिक प्रेक्षकांनी यूट्यूबवर त्याचे सिनेमे पाहिले आहेत आणि त्याच्या अभिनयाचे वेड लागले आहे.**

'लायगर'च्या भूमिकेसाठी तो खूप मेहनत घेत आहे. त्याचा चित्रपट प्रेक्षकांना नक्कीच आवडेल याची त्याला खात्री आहे. 'लायगर' मधील त्याची व्यक्तिरेखा अतिशय आक्रमक आहे. विजयप्रमाणेच 'पुष्पा' फेम अल्लू अर्जुन आणि 'बाहुबली' फेम प्रभास देखील हिंदी चित्रपटात येण्यापूर्वीच प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय झाले होते. प्रेक्षकांनी प्रभास आणि अल्लू अर्जुनला डोक्यावर घेतले.1981 मध्ये ज्यावेळेला दाक्षिणात्य अभिनेता कमल हसनने 'एक दुजे के लिए' या चित्रपटातून हिंदी चित्रपटांमध्ये पदार्पण केले होते, तेव्हाही त्यांना प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले होते. तसेच प्रेक्षकांमध्ये साऊथचे अभिनेते रजनीकांत, अरविंद स्वामी आणि आर माधवन यांचीही क्रेझ होती. रजनीकांत यांच्या 'रोबोट' चित्रपटाने तर सर्वच स्तरावर धुमाकूळ घातला होता. 'बाहुबली', 'केजीएफ', 'पुष्पा', 'आरआरआर' यांसारख्या दक्षिणच्या अनेक सुपरहिट चित्रपटांनी यशाचे झेंडे गाडले आहेत. 'बाहुबली 2' ने 1949 कोटी रुपयांचा विक्रमी व्यवसाय केला आहे. त्यापाठोपाठ 'केजीएफ 2' ने 1228 कोटी आणि 'आरआरआर' ने 1131 कोटी रुपयांचा बिझनेस केला आहे. या सगळ्यांच्या सर्वात पुढे एकट्या अमिरखानचा 'दंगल' चित्रपट आहे. याने 1968 कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. शाहरुख खान, सलमान खान, अक्षय कुमार किंवा अजय देवगण यांनाही जे जमलं नाही ते दाक्षिणात्य कलाकारांनी केलं



आहे. या यशानंतर दाक्षिणात्य कलाकारांचा बॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करण्याकडे कल वाढला आहे. आता दक्षिणचा अकील एनैनी, मामूट्टी अभिनेत्री साक्षी वैद्यसोबत 'एजंट' चित्रपटात काम करताना दिसणार आहे. या चित्रपटात ॲनी 'रॉ एजंट'च्या भूमिकेत ॲक्शन करताना दिसणार आहे. दक्षिण अभिनेता एनैनी 'दसरा' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे, ज्यात त्याच्यासोबत राष्ट्रीय पुरस्कार विजेती कीर्ती सूरज दिसणार आहेत. हा चित्रपट 2023 मध्ये रिलीज होणार आहे.

दक्षिणेतील रवी तेजादेखील 'टायगर नागेश्वरा राव' या चित्रपटातून हिंदी चित्रपटात प्रवेश करणार आहे. या चित्रपटाची कथा 'टायगर नागेश्वर राव' नावाच्या खतरनाक दरोडेखोराच्या व्यक्तिरेखेवर आधारित आहे. आणखी एका 'हनुमान' चित्रपटातसुद्धा तेजा मुख्य भूमिकेत दिसणार आहे. दक्षिणेतील आणखी एक दिग्गज बालम कोंडा श्रीनिवास 'छत्रपती'च्या रिमेकद्वारे बॉलिवूडमध्ये प्रवेश करणार आहे. दक्षिण प्रेक्षकांचा लाडका अभिनेता थलपथी विजय 'थलपथी 67' मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याच चित्रपटात समंथा पोलीस इन्स्पेक्टरच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. 'प्रोजेक्ट के' हा एक विज्ञान चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून जो भविष्यातील जगाविषयी माहिती देतो. यामध्ये प्रभास, अमिताभ बच्चन आणि दीपिका पदुकोणसोबत असणार आहेत. याशिवाय प्रभास 'आदि पुरुष' या चित्रपटातही दिसणार आहे. अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा' चित्रपटाच्या प्रचंड लोकप्रियतेनंतर आता 'पुष्पा पार्ट 2' देखील लवकरच चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यामध्ये अल्लू अर्जुनच्या ॲक्शनचा थरार प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. 'आरआरआर' फेम ज्युनियर एनटीआर 'एनटीआर 30' या ॲक्शन ड्रामा चित्रपटात दिसणार आहे. राम चरण 'आरसी 15' चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात त्याची अभिनेत्री कियारा अडवाणी असणार आहे.

एकीकडे बॉलीवूड कलाकार फ्लॉप होता असताना दक्षिण कलाकार मात्र उत्तर भारत पट्ट्यात यशाचे शिखर गाठताना दिसत आहेत. या प्रेक्षकांना त्यांच्या चित्रपटांची आतुरता लागली आहे. हे चित्रपट नक्कीच यशाचा झेंडा गाडतील, अशी चर्चा आहे. गेल्या आठवड्यात अमिरखानचा 'लाल सिंह चड्डा' प्रदर्शित झाला होता, मात्र हा चित्रपट आठवड्याभरात केवळ 50 कोटींची कमाई करू शकला आहे. 160 कोटींच्या या चित्रपटाला तब्बल 100 कोटींचा फटका बसण्याची शक्यता आहे. 'अक्षय कुमारचा 'रक्षाबंधन' देखील तिकीट बारीवर फारसा कमाल करू शकला नाही. आठवड्याभरात 40 कोटींचा बिझनेस या चित्रपटाने केला आहे. हा कसा तरी आपला खर्च काढू शकेल असे म्हटले जात आहे. अमिरखानचा 'लाल सिंह चड्डा' चांगला चित्रपट असल्याचे बोलले जात आहे, मात्र सोशल मीडियावरील बहिष्कारामुळे या चित्रपटाला फटका बसला असल्याचे बोलले जात आहे. याचे कारण काहीही असले तरी बॉलिवूड कलाकारांना यापुढे दर्जा असलेले चित्रपटच प्रेक्षकांसमोर आणावे लागणार आहेत. कोरोना काळानंतर बॉलीवूड आधीच कालांवडला आहे. त्यात दाक्षिणात्य कलाकारांचा बॉलिवूडमध्ये शिरकाव झाल्याने प्रेक्षकांना दर्जेदार चित्रपट पाहायला मिळत आहेत. दक्षिण चित्रपटांच्या रिमेकवर जगणाऱ्या बॉलिवूडला आता पर्याय मिळाला आहे. दक्षिण कलाकारांनीच बॉलिवूडवर स्वारी केल्याने हिंदीतील दिग्गज कलाकारांसमोर आव्हान उभे राहिले आहे.

# ज्ञानराज जन्मला; गीता ज्ञानमार्ग केला खुला




प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**श्रावणाची वद्य अष्टमी. याच दिवशी मथुरेत कंसाच्या बंदिवासात कृष्ण जन्मला. त्याला जन्मभर खस्ताच खाव्या लागल्या. वणवण फिरावे लागले. वनवासात असल्यासारखे जिणे तो जगला. कृष्ण खरे तर राजा. परंतु उग्रसेनाला त्याने आधी व नंतर आपल्या मोठ्या भावाला बलभद्र अर्थात बळिराम किंवा बलरामाला राज्य दिले. मथुरेचे साम्राज्य बलरामाला मिळाले. कृष्ण अधिकारी असूनही तो अलिप्त राहिला. याच दिवशी ज्ञानियाचा राजा जन्मला.संत ज्ञानेश्वरांचा जन्म देखील श्रावण वद्य अष्टमी या दिवशीच झाला. जसे भगवान श्रीकृष्णाने भगवद्गीता सांगितली. तेच ज्ञान ज्ञानदेवांनी समस्त मराठी जनतेला दिले. ज्ञानदेवांना जन्म ज्या झोपडीत झाला ती झोपडी ज्ञानदेवाला ज्ञान ऊर्जा देत होती. त्याच झोपडीत ज्ञानदेवांनी पाठीवर मांडे भाजले. ज्ञानदेव जगावर रागावले असता लहानग्या मुक्ताईने ताटीचे अभंग लिहून ज्ञानदेवांबरोबरच समस्त मानवजातीलाच उपदेश केला.**

संत ज्ञानदेवांनी भागवत संप्रदायाचा विस्तार केला. त्यांनी सर्वसामान्यांना भगवद् भक्तीचे द्वार खुले केले. भागवत धर्माची मुहूर्तमेढ रोवून त्यांनी आबालवृद्धांसह मुली बाळींना देखील भागवत धर्मात सामावून घेऊन त्यांना भक्ती उपासनेचा मार्ग खुला करून दिला.

संत ज्ञानदेवांना आळंदीच्या ब्राह्मणांनी मुंजीचा अधिकार दिला नाही. त्यांना पैठणहून अर्थात प्रतिष्ठान नगरीहून शुद्धिपत्र आणण्यास फर्मावले. तेव्हा ही चारी भावंड पैठणला पोहोचली. त्यांनी पैठणला जाऊन आळंदीच्या ब्राह्मणांचा आदेश त्यांना ऐकवला. त्यावेळी पैठणच्या ब्रह्मवृंदाने देखील त्यांची नालस्ती केली. टिंगल केली. ज्ञानदेवांनी सर्वच प्राणिमात्रात एकच ब्रह्मतत्त्व असते. एकच परमात्मा सर्वांच्या ठायी वास करतो असे सांगताच. त्यावेळी तिथून पाणी वाहणाऱ्या रेड्याला घेऊन एकजण जात होता. सर्व प्राणिमात्रात एकच ब्रह्म असते तर हा रेडा वेद मंत्र म्हणू शकेल का, असे विचारता क्षणाचाही विचार न करता ज्ञानदेवांनी का नाही, असे म्हटल्यानंतर ब्रह्मवृंद पुन्हा तिरस्काराच्या नजरेने पाहत राहिला. मग दाखव रेड्याकडून वेदमंत्र वदवून दाखव अशी आज्ञा करताच ज्ञानदेवांनी त्या रेड्याच्या अंगावरून हात फिरवला आणि त्या रेड्याची विनवणी केली. तेव्हा तत्काळ त्या रेड्याने वेद मंत्र म्हणायला सुरुवात केली. 'अग्निमिळे' हा वेदमंत्र अगदी अस्खलित म्हणून दाखवला. तेव्हा पैठणचे ब्राह्मण चकितच




झाले. अहो ज्ञानदेवा, तुम्ही तर प्रत्यक्ष परब्रह्म आहात, तुम्हाला शुद्धिपत्र कुणी द्यायची. आमचा तो अधिकार नाही, असे सांगितले. तरीही ज्ञानदेवांनी विनवणी करताच त्यांना शुद्धिपत्र लिहून दिले. नेवासा येथे जाऊन संत ज्ञानेश्वर महाराजांनी तपसाधना केली. तेथे राहून ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी अर्थात भावार्थ दीपिका नावाच्या ग्रंथाची निर्मिती केली. पंढरपूर येथील श्री पांडुरंगाची भक्ती केली. अनेकांना पांडुरंगाच्या भक्तीला लावले. त्यांनी हरिपाठ लिहिला. देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । हा पहिलाच अभंग. त्यात किती गहन अर्थ भरला आहे. असे अठ्ठावीस अभंग आहेत. या हरिपाठात अख्खा परमार्थ समजावून दिला आहे. मितभाषी ज्ञानदेवांनी हा नवा भक्तिमार्ग सर्वांना खुला करून दिला.

नाथ संप्रदायी असून देखील कान फाटे नसलेले ज्ञानदेव खरे हटयोगी होते. परंतु नाम संकीर्तन साधन पै सोपे असे म्हणून सोप्या मार्गाने सामान्य जनतेने जावे आणि हरिभक्तीत रममाण व्हावे, असा संदेश देणारे संत ज्ञानदेव आम्हाला त्यांच्या साहित्यातून सतत मार्गदर्शन करत राहतील.

# चिकलठाण खोकरी पुलासाठी वीस लाख रुपयांना लावला चुना

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील चिकलठाण येथील चिकलठाण-वडाळी रस्त्यावर खोकरी पुलाच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने पुरहानी कार्यक्रमा अंतर्गत 20 लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून मात्र शाखा अभियंता पठाण व गुत्तेदार यांच्या निष्काळजीपणामुळे या कामांमध्ये अफरातफर झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

इस्टेमेटमध्ये खोल खोदुन फाऊडेशन पक्के करून पाईपच्या आजुबाजुला पॅक करून गजाचा वापर करून अश्या अनेक गोष्टी करायला हव्यात परंतु अश्या गोष्टी न केल्यामुळे या पुलाला तडे जाण्यास सुरुवात झालेली दिसुन येत आहे. पुलावरील गट्टु लात मारली की पडण्यास सुरवात झाली आहे. सर्व काम निष्कृष्ट दर्जेचे झाले आहे, असे पुला शेजारील शेतकरी बोलत आहेत व आम्ही सर्व शेतकरी एकत्र येऊन

**मी स्वत: कामावर जाऊन शहानिशा केली आहे. इस्टीमेटप्रमाणे आम्ही गुत्तेदाराकडुन काम करुन घेतलेले आहे. गुत्तेदारांनी कामाच्या पैश्यासाठी मागणी केली आहे. वरिष्ठ अधिकारी याबाबत निर्णय घेतील.**

**एम.एम. पठाण, शाखा अभियंता**





**आमच्याकडे डोंगर भाग असल्याने नदी नाले वसंडुन वाहतात असेच निष्कृष्ट दर्जाचे काम झाल्याने तो पुल केव्हाही मोडकळीस येऊ शकतो. खुलताबाद तालुक्यात दर्जेदार काम होते मग कन्नड तालुक्यात का होत नाही.**

**बाळासाहेब देशमुख, वयोवृध्द शेतकरी**



**पाईपाखाली माती मिश्रित काम सुरू होते. आम्ही सर्वांनी काम थांबवले. नंतर वरिष्ठ अधिकाऱ्याला कामावर बोलवले. वरिष्ठ अधिकारी येऊन गेल्यावर गुत्तेदारांनी पुन्हा बोगस काम करण्यास सुरुवात केली. कामाची चौकशी करूनच गुत्तेदाराला पैसे द्यावेत.**

**ज्ञानेश्वर चव्हाण, शेतकरी**

काम थांबवले. मग मुख्य अभियंता कार्यकारी अभियंता यांनी ही कामावर येऊन भेट दिल्यानंतर पुन्हा गुत्तेदाराने जैसे थे प्रमाणे काम सुरूच ठेवले. म्हणुन संबंधित गुत्तेदाराचे देयक अदा करू नये, असे ग्रामस्थाचे म्हणणे आहे.



# छत्रपती शाहू पॉलिटेक्निकमधील २४ विद्यार्थ्यांची कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड

## विविध उद्योगांमार्फत वार्षिक ३ लाखांपेक्षा जास्त पॅकेज

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक मधील २४ विद्यार्थ्यांची विविध नामांकित अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. यामध्ये इलेट्रॉनिक्स अँण्ड टेलिकॉम विभागातील वरद संजय भडगावकर याची सिमेन्स टेक्नॉलॉजि अँण्ड सर्व्हिसेस प्रा.लि मध्ये निवड झाली आहे.

तसेच इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागातील दिपक महादा पवार याची इन्फोसिस लि. या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये निवड झाली आहे आणि मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभागातील उमेश सुदाम थोरे यांची सिमेन्स लि. तसेच मुकुंद धरपले, सुमित जाधव, आकाश काळे, ऋषिकेश पाटील, अक्षय पुंड, आवेझ शेख, प्राण टेहरे, शरद वाघ, शाम यादव, विवेक यादव, ऋषीकेश देशमुख, सुरज ढवळे, रोहित गोरे, कृष्णा जाधव, झैद मीर्झा, मुळे वैशाली, सौरभ शिंदे, अजय शेजवळ यांची बजाज ऑटो प्रा.ली.या कंपनीमध्ये त्याचप्रमाणे हरियाणा राज्यातील गुरगाव व पुणे स्थित हिरो इलेक्ट्रिक या कंपनीमध्ये इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभागातील अविनाश थोरात, मयूर फलके, झुबेर पठाण, रोहन गायकवाड, सचिन घुले, विकास गोरे इ.विद्यार्थ्यांची निवड झाली असून हिरो इलेक्ट्रिकमध्ये विद्यार्थ्यांची निवड होण्यासाठी इंपेरियल सोसायटी ऑफ इंनोव्हेटीव्ह इंजिनिअर्सच्या रुपाली अग्रवाल यांचे विशेष सहकार्य लाभले या सर्व निवड झालेल्या विदयार्थ्यांना सुमारे ३ लाखांपेक्षा वार्षिक पॅकेज दिले जाणार आहे अशी माहिती कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी दिली.

सदरील निवडीबाबत बोलताना त्यांनी या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक तसेच व्यक्तिमत्व विकास, सॉफ्टस्कील डेव्हलपमेंट, अभियोग्यता चाचणी अशा विविध स्वरूपाच्या चाचण्या घेण्यात आल्या असून हे विद्यार्थी सर्व टप्प्यांवर यशस्वी झाल्याचे प्रतिपादन केले. कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकला मागील १२ वर्षाची यशस्वी परंपरा असून आजपर्यंत ४०० हुन अधिक विद्यार्थी विविध नामांकित उद्योगांमध्ये नोकरी करत आहेत यांची निवड कॉलेज मार्फत योग्य प्रशिक्षण व उच्च दर्जाचे प्रात्यक्षिक ज्ञान देऊन केली असल्याचेही त्यांनी नमूद केले. कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला योग्य प्रकारे प्रशिक्षित करून तसेच व्यवसाय अथवा नोकरी मिळवून देण्यासाठी आम्ही नेहमी प्रयत्नशील असतो, असे मत प्राचार्यांनी व्यक्त केले. सदरील निवडीबाबत संस्थेचे अध्यक्ष रणजीत मुळे, सचिव पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे तसेच सर्व विभागप्रमुख यामध्ये ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. सागर आव्हाळे, प्रा. संदीप मदन, प्रा. अनिकेत सोनवणे, प्रा. हरिष रिंगे, प्रा.सचिन काकडे, प्रा. चंद्रशेखर रहाणे, प्रा. माधव नरंगले, प्रा.विजय शेळके व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# प्राथमिक शिक्षकाकडून अंधश्रद्धा निर्मूलनाचे धडे; स्मशानभूमीत वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनातील अंधश्रद्धा निर्मूलन व्हावे यासाठी वाकद येथील शांताराम अहिरे या शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या मदतीने स्मशानभूमीत वृक्षारोपण केले. आज ती झाडे दिमाखात डौलत असून त्यांचा उपक्रम आजही सुरू आहे. इवलेसे रोप लवियेलें द्वारी, त्याचा वेलू गेला गगणावरी या उक्तीनुसार तीन वर्षापूर्वी स्मशानभूमीत लावलेली झाडे आज मोठ्या दिमाखात डौलत असून अंत्यसंस्काराला आलेल्या पाहुण्यांचा आश्रय बनली आहेत.

वाकद ग्रामपंचायतने दिलेली झाडे चार वर्षांपूर्वी वर्षी शाळा व्यवस्थापन समिती व विद्यार्थ्यांकडून स्मशानभूमीत लावण्यात आली. त्या झाडांना अंत्यसंस्काराची राख मुलांकडून झाडांना घातली. प्रत्येक शनिवारी मुलांनी स्मशानभूमीत झाडांना पाणी घातले व उत्तमरित्या वृक्षसंवर्धन केले. स्मशानभूमीच जीर्णोद्धार करतांना मोठी १० झाडे तोडावी लागल्याने विद्यार्थी हळहळले. मात्र विद्यार्थ्यांनी हतबल न होता वर्षी तेथे पुन्हा झाडे लावली आहेत. यामुळे स्मशानभूमी आज हिरवीगार तर झाली आहेच मात्र मुलांच्या मनातील स्मशानाबद्दलची भिती देखील दूर झाली आहे. विद्यार्थी अंधश्रध्देपोटी दशक्रिया पंचक्रियेचे जेवण देखील करत नव्हते. मात्र अहिरे गुरुजींनी विद्यार्थ्यासोबत जेवन करून विद्यार्थ्यांच्या मनातील शंका दूर केली. बऱ्याच विद्यार्थ्याच्या हातात गंडे, तोडे गळ्यात ताबीज दिसले. अंधश्रध्दा दूर व्हावी या उद्देशान सर्व शिक्षकांनी जाणीव, जाग्रती करत मुलांना गंडे तोडे ताबीज काढायला लावले. गावातील अंत्ययात्रा शाळेसमोरूनच जात असते. शाळेसमोरून अंत्ययात्रा जातांना प्रत्येक वर्गाची दारे बंद केली जातात. त्यामुळे विद्यार्थी भेदरलेल्या अवस्थेत दिसत. मुलांना भेटून एक पदयात्रा शिर्डी साईबाबांच्या दर्शनाला चालली होती.

निफाड येथील कॉलेजला नॅशनल कॅडेट कौर चा कॅप्टन व वाकद गावातील युवकाचे पदयात्रेत शॉक लागून दुर्दैवी निधन झाले. या युवकाच्या अंत्यसंस्कारासाठी मोठ्या प्रमाणावर नॅशनल कॅडेट कौरचे विद्यार्थी आले होते. त्यावेळी शाळेचे दरवाजे बंद न करता विद्यार्थ्यांना सुचना देऊन रांगेत बसवले. अंत्यदर्शन घ्यायला लावले. यामुळे विद्यार्थ्यांची अनाठायी भीती कमी झाली. अशा या उपक्रमशील शिक्षकाचे परिसरात कौतुक होत असून इतर शिक्षकांनीही असे उपक्रम राबवावे असे आवाहन केले आहे.



# वाढदिवसानिमित्त दोन टन चाऱ्याचे गोशाळेस दान

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** बाबरगाव येथील प्रसिद्ध उद्योजक तसेच बाबरगाव ग्रामपंचायत चे माजी उपसरपंच राजेंद्र सावंत यांच्या 51 व्या वाढदिवसानिमित्त गंगापूर येथील गोकुळ धाम गोशाळेस गुरुवार दि.18 रोजी दोन टन चाऱ्याचे दान करण्यात आले. यावेळी पत्नी मंदाबाई सावंत यांच्यासह सपक्तनिक सावंत यांनी गाईंची पूजा करत स्वतःच्या हाताने गाईंना चारा भरविला. यानंतरही गाईंच्या सेवेसाठी व चाऱ्यासाठी सढळ हाताने मदत करणार असल्याचे यावेळी सांगितले आहे.

सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात सावंत यांची उल्लेखनीय कामगिरी असल्यामुळे बॅनरबाजी तसेच फटाक्यांच्या खर्चाला टाळत सावंत यांनी अनेक जनहित कार्य केले असल्याचे ग्रामस्थांकडून सांगितले जात आहे. वीस रुपये रोजाप्रमाणे शेतमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत सावंत यांनी क्रेन सर्व्हिसमध्ये आपली गरुड झेप सिद्ध केली असल्याचे अभिष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी परीजनांनी सांगितले आहे.



या वेळी मंदाबाई सावंत, राजेंद्र सावंत, प्रदीप सावंत, सोनाली सावंत, हरिभाऊ सावंत, सोमनाथ बोरुडे, महेश सावंत, योगेश सावंत, शिवाजी सावंत, कृष्णा दंडे, दत्तू लिंभोरे, रामभाऊ जाधव, रामनाथ तुपे, विष्णू सातपुते, तसेच गोकुळ धाम गोशाळेचे व्यवस्थापक मनीष वर्मा, गणेश पुराणिक आदी यावेळी उपस्थित होते.

# अन् व्हरांड्यातच महिलेची प्रसूती; नवजात बाळाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** एका गर्भवती महिलेची व्हरांड्यातच प्रसूती झाली असून, नवजात बाळाचा मृत्यू झाला.

ही संतापजनक घटना यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील विडूळ प्राथमिक आरोग्य केंद्रात घडली. या घटनेने आरोग्य विभागाच्या कारभारावर धिंडवडे निघत आहे.

शुभांगी हाफसे ही गर्भवती महिला प्रसूतीसाठी आपल्या माहेरी विडुळ येथे आली होती. तिला प्रसूती वेदना सुरू झाल्याने तिच्या वडिलांनी 108 रुग्णसेवा वाहिकेला फोन केला होता. मात्र 2 तास वेळ लागत असल्याने त्यांनी ऑटोद्वारे पीएचसी आरोग्य केंद्र गाठले. परंतु पीएचसीत वैद्यकीय अधिकारी वा कुणीही कर्मचारी हजर नसल्याने गर्भवती महिला प्रवेशद्वाराजवळील व्हरांड्यात थांबली.

यावेळी असह्य प्रसवकळा होऊन तिथेच तिची प्रसूती झाली. त्यामुळे नवजात बाळाचा प्रसूतीनंतर दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेने आरोग्य विभागाच्या कारभाराविरुद्ध संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# डेंग्यू, मलेरियासोबतच स्क्रब टायफस म्हणतोय.. 'हम साथ साथ हैं'

## नागरिकांना सतर्क राहण्याचे आरोग्य विभागाचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

सत्य कुटे

**चिखली :** पावसाळ्यात साथरोग हात पाय पसरतात. मात्र, यंदा स्क्रब टायफसचे रुग्ण दिसायला लागल्याने जनमानसात याबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. चिखली तालुक्यात एकही रुग्ण नसला तरी आता जिल्ह्यात मात्र 'ओरिएन्शिया सुसुगामुशी' नामक बॅक्टेरियामुळे होणाऱ्या गंभीर आजाराने स्क्रब टायफसचे तब्बल 9 संशयित रुग्ण आढळून आले. मलेरियाचे 13 तर डेंग्यू व चिकनगुनियांचे 3 रुग्ण उपचार घेत असून आता या साथरोगांना स्क्रब टायपासची देखील साथ मिळत आहे. दुसरीकडे स्वाइन फ्लू ने एकाचा बळी घेतल्याने आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे. कोविड आजाराचे रुग्ण तूर्तास कमी झाले असले तरी इतर आजारांनी आता डोकेवर काढणे सुरु केले आहे. शेतकरी तर स्क्रब टायफस या आजारामुळे आता एका नव्या चिंतेत सापडला आहे. हा आजार डुकरांमुळे होत असल्याचा निष्कर्ष समोर येतो. दरम्यान खामगाव तालुक्यातील 9 रुग्णांना स्क्रब टायफस आजाराने ग्रासल्याची माहिती आहे. साथरोग नियंत्रण अधिकारी या रुग्णांना संशयित रुग्ण म्हणून संबोधत आहे. ट्रॉम्बिक्युलीड माइटचे लारव्हे, ज्याला चिगर म्हणतात ते चावल्यामुळे 'ओरिएन्टा सुसुगामुशी' हे जंतू मानवाच्या शरीरात प्रवेश करतात. जिथे




झाडीझुडूप किंवा गवत असते त्यावर हे चिगर असतात. गवत कापताना गवतावर बसल्याने किंवा ट्रेकिंग करताना ते माणसाला चावतात. मानव ही आकस्मिक होस्ट आहे. हे चिगर माइट उंदरांना चावतात आणि तिथून रोग पसरतो. मोठी माइट चावत नाही आणि ती जमिनीवरच असते. चिगर लारव्हे अतिशय सूक्ष्म आकाराचे असतात. साधारण 0.2 ते 0.4 मिलीमीटर आकाराचे. त्यामुळे ते डोळ्यांना दिसत नाहीत. ते चावण्याच्या ठिकाणी दुखत पण नाही. त्यामुळे काही चावल्याचे भान राहत नाही. चिगर चावल्यानंतर 5 ते 20 दिवसांनी रोगाची लक्षणं दिसायला लागतात. सुरुवातीला ताप, डोकेदुखी, हातपाय दुखणं, मळमळ, ओकाऱ्या आणि इतर तापाच्या रोगासारखी लक्षण असतात. त्यामुळे बऱ्याच रुग्णांमध्ये मलेरिया, विषमज्वर किंवा डेंग्यू असण्याची शक्यता वर्तवली जाते. ज्या ठिकाणी चिगर चावतो त्या ठिकाणी एक व्रण असतो, ज्याला इशर म्हणतात. हा दिसला तर रोगनिदान नक्की झालं असं समजण्यात येते. परंतु 40 टक्के रुग्णांमध्ये हा इशर दिसत नाही. कपड्याने झाकलेल्या भागात तो असला तर दिसणं आणखीच कठीण होते.या आजारासाठी प्रतिबंधक लस नाही. लवकर निदान, लोकांचे जनजागरण, उंदरांवर नियंत्रण मिळवले तर स्क्रब टायफस आटोक्यात येऊ शकतो. हा आजार उंदरामुळे होतो. उंदराच्या रक्तावर या आजाराचे किटाणू वाढतात. हे उंदीर उंच गवत, झाडा झुडपात जातात तेव्हा हे जिवाणू मानवाच्या संपर्कात आल्यानंतर हा आजार होतो. शेतकऱ्यांमध्ये याचे प्रमाण अधिक असते. कारण शेतात उंदीर बिळातून बाहेर येतात. शहरी भागात गवत वाढण्याचे प्रमाण तुरळकच आहे. या आजाराचे 9 रुग्ण सध्या रुग्णालयात उपचार घेत आहेत. हा आजार मात्र उपचाराने बरा होतो.

**स्वाइन फ्लू व स्क्रब टायफसची लस उपलब्ध**

स्वाइन फ्लू व स्क्रब टायफस या दोन्ही आजाराची लस आरोग्य विभागाकडे उपलब्ध आहे. लक्षणे बहुतांश या आजाराची व कोरोनाची सारखीच आहेत. थोडा फार बदल आहे. या आजारावर त्वरीत उपचार होत असला तरी लोणार येथे आढळून आलेल्या स्वाइन फ्लू या आजाराच्या रुग्णावर अकोला येथे उपचार सुरु आहेत. आता टायफेड हा आजारही बळावत चालला आहे. पावसाची संततधार असल्याने अनेकजण पावसात भिजल्यानेही आजार बळावले आहेत.

**स्क्रब टायफसची लक्षणे**

ताप, डोकेदुखी, स्नायुदुखी, कोरडा खोकला, न्युमोनिया सदृष्य आजार अशी लक्षणे आहे. कीटक चावल्याने खाज येते व अंगावर चट्टे येतात. दंश झालेल्या ठिकाणी जखम होऊन खपली येते. रोगाची लक्षण आढळल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

### यंत्रणा अलर्ट असून कार्यरत

**बुलढाणा जिल्ह्यात सद्यस्थितीत ९ संशयीत रूग्ण आहेत. लोकांनी घाबरून न जाता अशा प्रकारचे लक्षणे आढळल्यास तात्काळ नजिकच्या सरकारी दवाखान्यात जाऊन औषधोपचार घ्यावा. सरकारी दवाखान्यात यासाठी लागणारी औषधे मुबलक प्रमाणात मोफत उपलब्ध आहेत. वेळेत उपचार सुरू झाल्यास ह्या आजारापासून रूग्ण लवकर पूर्ण बरा होतो.**

**प्रकाश तांगडे पाटील,**
**जिल्हा साथरोग वैद्यकीय अधिकारी, बुलडाणा**

## माजी आमदाराचा भाजप प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत केलेल्या बंडानंतर राज्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलत आहेत. शिंदे यांच्या बंडानंतर महाविकास आघाडीचे सरकार कोसळले आणि आता कार्यकर्त्यांसह नेत्यांमध्येही चलबिचल सुरू झाली. शिवसेनेचे विविध पदाधिकारी शिंदे गटात सामील होत असताना सत्तेत सहभागी असलेला भाजपही सक्रिय झाला. विरोधी पक्षातील विविध नेते आता भाजपची वाट धरत आहे. आता अकोल्यात राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. कारण बाळापूर मतदारसंघाचे माजी आमदार बळीराम सिरस्कार यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला आहे. बळीराम सिरस्कार यांनी मुंबईत भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १२ ऑगस्ट रोजी भेट घेतली. त्यानंतर आज त्यांचा अधिकृत प्रवेश सोहळा पार पडला.

## जलसंधारण प्रणेते सुधाकरराव नाईक जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** तालुक्यातील खंडाळा येथील शासकीय विश्रामगृहावर दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा जलसंधारणाचे प्रणेते कै. सुधाकरराव नाईक यांच्या ८८ व्या जयंती निमित्त ४० गांव माळपठार कृती समितीच्या वतीनेविविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमात ग्रामीण भागातील अंगणवाडी अंतर्गत येणाऱ्या गावामधील कुपोषीत बालकाना सकस आहार, प्रोटीन, औषधी व कपडे (ड्रेस) वाटपाचा कार्यक्रम मान्यवराच्या हस्ते करण्यात येणार आहे.

सकाळी ९.३० ते ११.०० च्या दरम्यान प्रबोधनात्मक कार्यक्रम होणार असून सप्त खंजेरीवादक सुप्रसिध्द प्रबोधनकार, सत्यपाल महाराज यांचे शिष्य प्रबोधनकार पंकजपाल महाराज यांचा प्रबोधनाचा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी



माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंतराव पुरके राहणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार अ‍ॅड. निलय नाईक विधान परिषद सदस्य, लोकनियुक्त आमदार अ‍ॅड. इंद्रनिल नाईक, अ‍ॅड. अप्पाराव मैद अध्यक्ष भारती मैंद नागरी सहकारी पतसंस्था पुसद, अ‍ॅड. दिलीप एडतकर मुख्यसंपादक दैनिक विदर्भ मतदार, विजयराव चव्हाण अध्यक्ष जिनिंग प्रेसिंग पुसद, डॉ. व्यंकट राठोड उपविभागीय अधिकारी पुसद, बाळासाहेब माजी जि.प. उपाध्यक्ष यवतमाळ, के.डी.जाधव अध्यक्ष युवक मंडळ पुसद, माजी आमदार विजयराव खडसे, क्रांती पाटील कामारकर माजी जि.प. उपाध्यक्ष यवतमाळ, डॉ.सौ. माधवी हा माजी नगराध्यक्षा पुसद, तातुजी देशमुख माजी बांधकाम सभापती जि.प. यवतमाळ, नाना ताटेवार उपाध्यक्ष राकाँपार्टी यवतमाळ, अदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. त्याच बरोबर प्रशांत नाईक उपविभागीय कृषी अधिकारी, संजय खंदारे सेवानिवृत्त सहाय्यक वनरक्षक, दयाराम चव्हाण सेवानिवृत्त पोलिस अधिकारी व माजी जि. प. सदस्य मांगिलालदादा चव्हाण हे उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमास गजानन पिलेवाड गटविकास अधिकारी पं.स. पुसद, डॉ. जय नाईक तालुका आरोग्य अधिकारी पुसद व मान्यवरांचे सहकार्य लाभणार आहे. या कार्यक्रमास नागरीकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ४० गांव माळपठार कृती समिती व सर्वश्री सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, अध्यक्ष ग्रामसेवक संघटना, अध्यक्ष शिक्षक संघटना, पुसद व समस्त माळपठार गावकरी मंडळ तसेच आरोग्य विभाग कर्मचारी महिला बालकल्याण विभाग कर्मचारी व अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका, मदतनीस कर्मचारी वृंद यांनी केले आहे.

## घारदोन, खोडेगाव व कात्राबाद रस्त्याच्या निकृष्ट कामाची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**घारदोन :** औरंगाबाद तालुक्यातील घारदोन खोडेगाव व कद्राबाद या गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे, अशी माहिती मिळताच पाहणीसाठी बी अँड सी चे पथक दाखल झाले. सदरील रस्ता हा अत्यंत महत्त्वाचा असून आजूबाजूच्या गावांना उडणारा महत्त्वाचा दुवा आहे.

यावेळी तेथे कल्याण नाना गायकवाड यांच्यासह बी अँड सी चे सर्व इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर, गावचे नागरिक उपस्थित होते. कल्याण नाना गायकवाड यांनी रस्त्याचे काम हे उत्कृष्ट व्हावे व घोडेगाव गावातून जाणारा रस्ता हा डांबरीऐवजी सिमेंटचा करावा व लेंडी नदीवरील असलेला पुलाची उंची वाढवावी, अशी मागणी कल्याण नाना गायकवाड यांनी सदरील पथकाकडे केली.

यावेळी तात्काळ रावसाहेब दानवे यांनी लेंडी नदीचा पूल उंचावणे व गावातून जाणारा रस्ता डांबरीऐवजी सिमेंटचा करावा, असे आदेश बांधकाम विभागाच्या एसीला दिले. वेळी आलेल्या पथकाने संपूर्ण रस्त्याच्या कामाची पाहणी केली. याप्रसंगी खोडेगावचे सरपंच नारायण डिगोळे, डीजे राम तात्या सरोसे, प्रशांत ढगे, गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### एसटीडी/एच.आय.व्ही...

आधुनिक केसरी

एस.टी.आय. म्हणजे सेक्स्यूअसी ट्रान्समिटेड इन्फेक्शन, व्हीडी म्हणजेव्हेनेरल डिसीजेस आणि एसटीडी म्हणजे - सेक्स्युअली ट्रान्समिटेड डिसीजेस याची प्रमुख कारणे यौन संबंध (व्हजायनल इंटरकोर्स) अ‍ॅनल आणि ओरल सेक्स ही सांगता येतात. लक्षण न दिसल्यामुळे या आजारांचा प्रसार होतो, जी लक्षणे दिसतात त्यात योनीतून पू स्त्राव होणे, लिंगातून स्त्राव येणे, लिंग-योनी अंगावर किंवा आजूबाजूला जखमा होणे, ओटी पोटात दुखणे यांचा समावेश होतो. स्त्री गरोदर असताना असे आजार झाले तर त्याचा परिणाम निश्चितपणे बाळावर होतो. मूल होण्यासाठी सुद्धा अडथळा निर्माण होऊ शकतो. तीसपेक्षा जास्त प्रकरणाचे बॅक्टेरिया व्हायरस व पॅरासाईट यामुळे हे होतं.

बॅक्टेरियामुळे होणाऱ्या एच.टी.आय.मध्ये ( सेक्स्युअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन) क्लेमायडिया, गनोरिया आणि सीफीलीस यांचा समावेश होतो तर व्हायरल एस.टी.आय. मध्ये (सेक्स्युअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन) एच.आय.व्ही. एड्स जेनायटल हरपीस आणि जेनायटल वार्ट्स यांचा समावेश होतो. पॅरासायटीक एस.टी.आय. (सेक्स्युअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन) मध्ये ट्रायको मोनियासिस, मोड ऑफ ट्रान्समिशन (संसर्ग) हा नेहमी सेक्स, दूषित रक्त आणि पेशी, स्तनपान आणि प्रसूती यांच्यामुळे होतो.

आता यावर प्रतिबंध घालायचा असेल तर काय करावं ते पाहूया. सर्वप्रथम म्हणजे सेक्स न करणे हा उपाय पण तो केवळ अशक्य आहे आणि निसर्गाच्या विरुद्ध देखील. पण घाबरुन जाण्याचं कारण नाही. कारण यावर लसीकरणासारखा उपाय उपलब्ध आहे उदा. हिपॅटायटीस बी लस, एच.पी.व्ही. लस, जसं मी आता म्हटलं की सेक्स न करणे हा उपाय नाही पण सेफ सेक्स करणे हा उपाय मात्र नक्कीच आहे. (क्रमशः.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अ‍ॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

## गणेश मंडळांनी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करण्याचे शहर पोलिसांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आगामी ३१ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या काळात साजरा होणाऱ्या गणेशोत्सवासाठी शहरातील गणेश मंडळांनी ऑनलाइन पद्धतीने सिटीझन पोर्टलवरून नोंदणी करावी, जर गणेश मंडळांना ऑनलाइन नोंदणी करण्यास अडचणी येत असतील तर शहरातील पैठणगेट, सिडको एन ६ येथील पोलीस उपायुक्तालये व उस्मानपुरा येथील सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय या ठिकाणी मंडळांना ही नोंदणी करवून देण्यासाठी पोलीस कर्मचारी उपलब्ध असतील अशी माहिती पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांनी दिली.

google सर्च करून mahapolice.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून https://citizen.mahapolice.gov.in/citizen/MH /index.aspx हे पेज ओपन करा ganesh festival permission या ठिकाणी login करून महापालिका, महावितरण चे परवाने अपलोड करावे मंडळाचे हे अर्ज संबंधित पोलीस ठाण्यांना प्राप्त झाल्यानंतर त्याची पडताळणी करून पोलिस ठाण्याचे मार्फत गणेश मंडळांना परवानगी देण्यात येईल, असे शेवटी आघाव म्हणाले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in